◆ एप्रिल २००६
◆ वर्ष सहावे
◆ अंक चौथा

मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक : सुनील मेहता

कार्यकारी संपादक : शंकर सारडा

संपादन सहाय्य : अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

— अनुक्रमणिका —

संपादकीय - ४
साहित्यवार्ता ८
तसलिमांच्या सान्निध्यात-मृणालिनी गडकरी ४०
पुस्तक परिचय
शांततेनं काम करा :अनु. सुनंदा अमरापूरकर ४७
मूनरेकर : अनु. उदय नारकर ५३
साऊथ बाय जावा हेड : अनु. अशोक पाध्ये ६२
साधंसुधं : प्रमोदिनी वडके-कवळे ७२
पुरस्कार ७८
वाचकांचा प्रतिसाद ८८
श्रद्धांजली ९६
बालनगरी १०४

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

इंग्रज गेले, इंग्लिशचे वर्चस्व वाढतच आहे

पहिलीपासून इंग्लिश हा विषय शिकवण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय म्हणजे इंग्रजी ही केवळ उच्चवर्णीयांची व मध्यमवर्गीयांची मिरासदारी राहू नये या दिशेने टाकलेले एक महत्त्वाकांक्षी पाऊल आहे. आज प्राथमिक शाळांतून इंग्रजी शिकवण्याची सोय ही तितकीशी दर्जेदार नसली तरी त्याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची शिकस्त चालू आहे. त्यामुळे काही वर्षातच इंग्रजी शिक्षणाचा दर्जा वाढत जाईल; आणि त्यामुळे सर्वसामान्य ग्रामीण भागातील मुलामुलींपुढेही उच्च शिक्षणाचे आणि जागतिक स्पर्धाशील जगात आपले स्थान भक्कम करण्याचे मानसिक बौद्धिक बळ येत राहील असा आशावाद बाळगणे गैर ठरणार नाही.

नामवंत भाषाशास्त्रज्ञ डेव्हिड ग्रॅडॉल यांनी पुढच्या दशकात भारत हा इंग्लिश भाषक साम्राज्याचा पुरस्कर्ता झालेला असेल असे जे भाकित केले आहे ते खरोखर वास्तवात येण्याची चिन्हे दिसत आहेत. भारतातून इंग्रजांचे उच्चाटन झाले असले तरी इंग्रजीचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच आहे आणि भारतीय प्राथमिक शाळांमधील १५ कोटी विद्यार्थी लोकसंख्येतील आंग्लभाषकांच्या एकूण प्रमाणात आमूलाग्र बदल घडवून आणतील. ब्रिटिशांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून भारतात व्यापाराचा घाट घातला; आणि व्यापाराच्या जोडीने येथील संस्थानिकांना आपल्या वर्चस्वाखाली आणत, सत्तासंपादनाचा कार्यक्रम यशस्वीपणे राबवला. आपल्या भाषेतच राज्यकारभाराचा आग्रह धरून येथील शाळाकॉलेजात इंग्रजीचे महत्त्व वाढवत नेले; आणि इंग्रजीचे शिक्षण घेतलेल्यांना नोकरीव्यवसायात स्थिर प्रतिष्ठित होणे सुलभ केले. ब्रिटिशांना येथील सत्ता सोडावी लागली तरी इंग्रजीचे त्यांनी वाढवून ठेवलेले प्रस्थ कायमच राहिले आणि इंग्रजीच्या वर्चस्वामुळे भारतीयांमध्ये इंडिया विरुद्ध भारत ही राजकीय सामाजिक सांस्कृतिक दरी रुंदावतच राहिली...

ना. यशवंतराव चव्हाणांनी आर्थिकदृष्ट्या कमजोर वर्गाला शिक्षणासाठी सवलती देऊन शाळा-प्रशालांचा आणि पुढे महाविद्यालयांचा गावोगाव प्रसार होण्याचा मार्ग खुला करून दिला. त्यामुळे शिक्षण बहुजन समाजापर्यंत पोहोचले; वसंतरावदादा पाटील यांनी इंजिनिअरिंग आणि मेडिकल कॉलेजेस काढण्याची परवानगी सर्वांना सहज देऊ केली; त्यामुळे सर्वसामान्यांना उच्च व्यावसायिक शिक्षण घेणे सुलभ झाले; ना. रामकृष्ण मोरे यांनी पहिलीपासून इंग्लिश हा विषय सक्तीचा करून

अभिजन आणि सामान्यजन यांच्यातील उरलीसुरली भेदरेषाही पुसून टाकण्याची जिद्द बाळगली. इंग्लिश भाषेचे स्वरूपही त्यामुळे बदलू लागले. त्या त्या स्थानिक भाषेची उच्चारवैशिष्ट्ये आत्मसात करीत येथील इंग्रजी भाषा आता नवनवी रूपे धारण करू लागली आहे. इंग्लिश ही विशिष्ट उच्चवर्णीयांची मिरास राहिली नसून ती आता जनतेची भाषा बनू पाहत आहे. इंग्रजीचे चटणीफिकेशन होत आहे, मंडलायझेशन होत आहे असे त्यामुळे बोलले जात आहे. इंग्रजांच्या काळात इंग्रजीचा जो दबदबा होत तो आता उरलेला नाही; त्या काळी इंग्रजी पदवीबरोबर उत्तम पगाराची नोकरी, सामाजिक उच्च दर्जा आणि इंग्रजाळलेली आहारविहार-जीवनशैली ही देखील सहजपणे आत्मसात करण्याकडे उच्चशिक्षितांचा कल असे. आता तशा जीवनशैलीचा आणि इंग्रजीचा संबंध उरेलच असे नाही. इंग्रजीचे हे अवमूल्यन मानण्याचे कारण नाही. कारण संवाद-संप्रेषणाचे साधन म्हणून इंग्रजीची उपयुक्तता अबाधित आहे; भारतीय संस्कृती आक्रमकांना सामावून घेण्यात आरंभापासूनच कुशल आहे; इंग्रजीलाही तिने आत्मसात करून, आपल्या बोलीभाषेचा दर्जा द्यावा यात भारतीयांचे अवघे चातुर्य दिसून येते.

इंग्रजी शिक्षणाची परंपरा भारताने आपलीशी केल्याचा भरपूर फायदा आता आपल्याला मिळत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आपल्या प्रगतीला त्यामुळे मोठा उठाव मिळाला. आऊट सोर्सिंगद्वारे भारत आज अब्जावधी डॉलर्सची कमाई करीत आहे आणि भारतीय तरुणांना परदेशातही उत्तम पगाराच्या नोकऱ्यांसाठी बरेचसे स्वागतशील वातावरण आढळत आहे. इंग्लिश भाषेचे ज्ञान हे आपल्यासाठी एक वरदान ठरत आहे; आपल्या आर्थिक महासत्ता होण्याच्या महत्त्वाकांक्षेला ते खतपाणी पुरवत आहे. इंग्लिश ही जागतिक स्थलांतरितांची भाषा बनली असून ज्ञानाधिष्ठित गुप्त खजिन्याचा तिळा उघडणारा मंत्र ठरला आहे. भाषाविषयक आपल्या अभिमानाचे वेळी-अवेळी आवेशपूर्वक प्रदर्शन करणाऱ्यांनाही इंग्रजीने मवाळ बनवून भाषिक राष्ट्रवादाची धारही बोथट केली आहे. इंग्लिश भाषेचे ज्ञान हे आपल्या भारताच्या आर्थिक मुसंडीला प्रेरक ठरत आहे; आणि परदेशी चलन मिळवण्याचे वेगवेगळे दरवाजे खुले करीत आहे.

ग्रंथप्रकाशन आणि संज्ञापन

ग्रंथप्रकाशनक्षेत्राच्या आणि संज्ञापनक्षेत्राच्या दृष्टीने इंग्रजीचे हे सार्वत्रिकीकरण भारताला लाभदायक ठरत आहे; यापुढच्या काळातही ठरत राहणार आहे. भारतात इंग्लिश पुस्तकांचे प्रकाशन हे इतर सर्व भाषांतील एकूण प्रकाशनांच्या तुलनेत तुल्यबळ आहे; तसेच जागतिक पातळीवर पहिल्या पाचात आहे. दरवर्षी येथे पुस्तकाची उलाढाल ७०० कोटींच्या घरात जात असावी असा फेडरेशन ऑफ पब्लिशर्स अँड बुकसेलर्स असोसिएशनचा अंदाज आहे. पुस्तकांची एक प्रचंड बाजारपेठ म्हणून भारताचे महत्त्व वाढत आहे. अमेरिका-युरोपमधील प्रकाशनसंस्थांना

व चित्रपटनिर्मात्यांना या मोठ्या बाजारपेठेचे आकर्षण वाटते; कारण येथील सार्वत्रिक शिक्षणप्रसारामुळे आणि उंचावत जाणाऱ्या जीवनशैलीमुळे अन्न-वस्त्र-निवारा या प्राथमिक गरजांच्या पुढे गेलेल्या चाळीस कोटी मध्यमवर्गीयांच्या रंजनसाधनावर होणाऱ्या अब्जावधी रुपयांच्या विनियोगातला जास्तीत जास्त वाटा मिळवण्याचा हव्यास आहे. भारतातला आपला कमाईचा वाटा वाढावा यासाठी या परदेशी कंपन्यांचा आटापिटा चालू आहे. त्या दृष्टीने प्राथमिक मोर्चाबांधणीला आता जोमाने सुरुवात झाली आहे.

या मोर्चेबांधणीमध्ये अनेक पायाभूत गोष्टींवर भर देण्यात येत आहे.

१. अमेरिकन पुस्तकांच्या वा चित्रपटांच्या अनधिकृत आवृत्त्या भारतात निघू नयेत या दृष्टीने कॉपीराइट कायद्याची अंमलबजावणी करण्यावर भर देणे. अशा बनावट पुस्तकांमुळे रॉयल्टीला मुकावे लागल्याने वर्षाकाठी २५०० कोटींवर रुपयांचे नुकसान होते असा वॉशिंग्टनस्थित आंतरराष्ट्रीय बौद्धिक संपदा समूहाचा (इंटरनॅशनल इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी अलायसन्सरचा) ढोबळ अंदाज आहे. डुप्लिकेट पुस्तकांमुळे होणारे हे नुकसान थांबावे म्हणून परदेशी प्रकाशन संस्था/चित्रपट निर्माते भारतात आपल्या स्वतंत्र शाखा वा संस्था काढण्यावर भर देत आहेत. त्याचप्रमाणे अनधिकृत आवृत्त्या निघाल्यास त्या शोधून त्याविरुद्ध न्यायालयात कॉपीराइट कायद्याखाली खटले भरत आहेत. हॅरी पॉटरच्या पहिल्या दोन भागांचे अनधिकृत मराठी अनुवाद प्रसिद्ध केल्याबद्दल पुण्याच्या एका प्रकाशनसंस्थेवर असा खटला भरण्यात आला हे वृत्तपत्रात आपण वाचलेच असेल. परदेशी प्रकाशन संस्थांनी त्यासाठी भारतात टेहळणी करणाऱ्या काही संस्थांशी वार्षिक करारही केले आहेत.

२. दक्षिण आशियातील उच्च शिक्षणासाठी आवश्यक ती पाठ्यपुस्तके स्वस्त किमतीत उपलब्ध करून देण्यात येतात. युनेस्कोच्या प्रेरणेने तसे करार केले गेले आहेत. परंतु अशा स्वस्त आवृत्त्या या भारतातून व आशियाई देशातून परत अमेरिकेला निर्यात होतात असे आढळून आले आहे. अमेरिकेत या पुस्तकांच्या किमती आशियाई आवृत्त्यांच्या दहापट जास्त असतात. त्यामुळे अमेरिकेतील प्रकाशनसंस्था अस्वस्थ आहेत. हा प्रकार थांबवण्यासाठी कस्टमचे सहकार्य मिळवण्याचे कायदेशीर प्रयत्न चालू आहेत.

३. भारतात कुठल्याही पुस्तकाची झेरॉक्स काढणे सोपे आहे. अमेरिकेत कुठल्याही पुस्तकाच्या दहावीस पृष्ठांपेक्षा जास्त पृष्ठांच्या झेरॉक्स काढता येत नाही. संपूर्ण पुस्तकाची झेरॉक्स करण्यास तेथे परवानगी नाही, त्यामुळेही भारतात आमचे खूप नुकसान होते अशी अमेरिकनांची भावना आहे.

४. इंग्लिश भाषा जाणणारा आणि विविध शास्त्रात पदवीधर असणारा मोठा वर्ग असल्याने टेक्निकल व शैक्षणिक पुस्तकांचे संपादन व मुद्रणप्रत तयार

करण्याचे, आऊटसोर्सिंगचे काम येथे मोठ्या प्रमाणावर होऊ शकते. त्याचा फायदा पाश्चात्त्य प्रकाशनसंस्था घेत आहेत. त्यातून भारताला सन २०१० पर्यंत १.१ बिलियन डॉलर्स (५००० कोटी रुपये) मिळू शकतील असा अंदाज आहे.

५. भारतीय आवृत्त्यांसाठी व अनुवादासाठी परदेशी प्रकाशनसंस्था रीतसर हक्क येथील प्रकाशकांना देण्यासाठी आता उत्सुक आहेत. त्यामुळे अधिकृत व्यवहार होऊन रॉयल्टीही मिळत राहील. त्यात व्यावहारिक फायदा आहे. भाषांतराचे व आवृत्त्यांचे हक्क देण्याबाबत आता पूर्वीसारख्या जाचक अटी लादल्या जाणार नाहीत असे दिसते.

इंग्रजीच्या अध्ययनामुळे भारताला या क्षेत्रात इतर देशांपेक्षा अधिक संधी आहे हे निश्चित!

औषधाविना आरोग्य

डॉ. रमा मराठे **डॉ. रवि मराठे**

आधुनिक वैद्यकशास्त्रामुळे तीव्र स्वरूपाच्या आजारांना अटकाव करता आला असला तरी अनेक दीर्घकालीन जुनाट तसेच प्राकृतिक आजारात केवळ औषधोपचारांनी संपूर्ण रोगनिवारण होऊ शकत नाही. मधुमेह, अतिरक्तदाब, हृदयविकार, पाठदुखी, मानदुखी, सांधेदुखी यासारखे स्थूलत्वाशी संबंधित आजार, दमा, अल्सर, सोरायसिस, पेप्टिक असे तणावजन्य शारीरिक आजार यांनी ग्रस्त होणाऱ्यांची संख्या सतत आणि झपाट्याने वाढते आहे.

हे सर्व आजार, संतुलित आहार, नियमित व्यायाम, तणवमुक्तीसाठी विशेष प्रयत्न, जीवनपद्धतीत बदल, निसर्गाचे सान्निध्य, व्यसनमुक्ती व मन:शांती या सप्तसूत्रीच्या आधारेच टाळता येतील.

या पुस्तकात औषधांचा कमीत कमी वापर करून आजाराचं सुयोग्य नियंत्रण करणं, शक्यतो औषधाविना आरोग्य टिकवणं याचं सचित्र मार्गदर्शन केलं आहे

साहित्यवार्ता

* तुकोबारायांची हस्तलिखित अभंगांची वही पंढरपुरात

संत तुकोबारायांची हस्तलिखित अभंगांची वही पंढरपूर येथील ज्ञानेश्वर माऊली देहूकर यांच्या वाड्यात देवघरात आहे. ही दुर्मिळ प्रत त्यांनी बडोदा येथून आणली आहे. तुकोबांच्या घराण्यातील एक मुलगी माधवराव कदम गिरवीकर यांना दिल्याने ते तसे त्या वेळचे मोरे-देहूकर घराण्याचे जावई झाले. श्री. कदम देहूत राहत असताना देवपूजा व भजनाच्या कार्यक्रमात सहभागी होत असत. पुढे ते बडोदा संस्थान दरबारातील मानकरी झाले.

श्रीमंत खंडेराव गायकवाड सरकार यांनी कदम यांना कायम वास्तव्यासाठी बडोद्यास नेले. जाताना त्यांनी पूजेतील श्री तुकोबारायांच्या पादुका, चिपळ्या आणि शके १६०५ मधील हस्तलिखित अभंगांची वही बडोद्याला नेली. या पवित्र वस्तू आपल्या संस्थानात आलेल्या पाहून श्रीमंत गायकवाड सरकारांनी आनंद व्यक्त केला. त्यांनी श्री. कदम यांना वर्षासन चालू केले, असा संस्थानच्या कागदपत्रांत उल्लेख आहे. सुमारे १२५ वर्षे या वस्तू बडोदा येथे राहिल्या. कदम यांच्या पश्चात या वस्तू त्यांच्या नातेवाइकांनी तीन पिढ्यांपर्यंत बडोद्यात घरी जतन करून ठेवल्या होत्या. श्री. कदम यांना मुलगा नव्हता. सुमारे पंचेचाळीस वर्षांपूर्वी (वै.) मामासाहेब दांडेकर यांनी बडोद्यास जाऊन त्या वस्तू प्रत्यक्ष पाहिल्या होत्या. तुकोबारायांच्या घराण्यातील पंढरपूरचे ज्ञानेश्वर माऊली देहूकर यांना त्या वस्तूंचे दर्शन घेण्याचा योग बडोद्यात आला. त्या वेळी संस्थानाशी संबंधित असलेले श्री. खानविलकर व श्री. शितोळे यांनी श्रद्धेने तुकोबांची हस्तलिखित वही, पादुका आणि चिपळ्या या वस्तू माऊली देहूकर यांच्या ताब्यात दिल्या. हा कार्यक्रम बऱ्हाणपूरचे सरदार गणपतराव जगधने यांच्या घरी १९६८ मध्ये झाला. तुकोबारायांच्या या पवित्र वस्तूंचे दर्शन पंढरपुरातील महाद्वारामध्ये असलेल्या देहूकर वाड्यात आजही घेता येते, असे प्रा. बाळासाहेब देहूकर यांनी सांगितले असा याचा उल्लेख १९९४ मधील देहूकर फडाच्या स्मरणिकेत आहे.

* संगणकासाठी आता इंग्रजी व टायपिंग येण्याची गरज नाही

तुम्हाला संगणक कुशलतेने वापरायचाय; पण इंग्रजी आणि टायपिंसग येत नाही म्हणून बिचकताय ना? आता 'नो टेन्शन'. ह्युलेट पॅकॉर्ड (एचपी) कंपनीने

संगणक विश्वात क्रांतिकारक ठरणारे तंत्रज्ञान सादर केले आहे. हे एक जादुई पेन आहे, जे वापरून तुम्ही तुमच्या लिपीत संगणकाला आज्ञा देऊ शकता. जगात इंग्रजी भाषा न बोलणाऱ्या जवळपास १५० कोटी लोकांची मोठी सोय त्यामुळे होणार आहे.

'एचपी'च्या संशोधन विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष डिक लँपमन यांनी हे तंत्रज्ञान दिल्ली येथे प्रदर्शित केले. त्यात खुणांवर आधारित की बोर्ड (जीकेबी) असून त्यावर पेनच्या मदतीने आपल्या भाषेत आज्ञा लिहिता येतात. देवनागरी व तमीळ या लिपींचा वापर होणाऱ्या भाषा लिहिता येतात. भारतीय भाषांबरोबरच नेपाळी, सिंहली, बांगलादेशी या भाषांसाठीही त्याचा उपयोग करता येतो. हा कीबोर्ड माऊससारखाच काम करत असल्याने स्वाक्षरी, चित्रे अथवा इतर दृश्य घटकही टिपता येतात. म्हणजेच नोंदी व चित्रे तयार करून त्यांची साठवणूक कोणत्याही भाषेत बिटमॅप फॉरमॅटमध्ये करणे शक्य होते.

सध्याचे संगणकाचे की बोर्ड इंग्रजी व स्थानिक अशा दोन्ही भाषांत असतात. त्याखेरीज मॉनिटरवर स्थानिक भाषेचा की बोर्ड लेआऊट समोर ठेवून काम करण्याची सोय असते. 'एचपी'च्या नव्या की बोर्डमध्ये याला फाटा दिला आहे. बटणे दाबून माहिती भरण्यापेक्षा पेनने ती आपल्या भाषेत नोंदविणे सोपे ठरते. इंग्रजीचा आणि टायपिंगचा काहीही परिचय नाही, अशांनाही या नव्या की बोर्डमुळे वेगाने काम करता येते असे प्राथमिक चाचण्यांमध्ये आढळून आले आहे.

एचपी लॅबने जगभरातील विविध प्रदेशांत लोकांच्या स्थानिक गरजा ओळखून त्यानुसार नवी माहिती, तंत्रज्ञान व संपर्क उत्पादने देण्यावर लक्ष केंद्रित केल्याचे श्री. लँपमन यांनी नमूद केले.

* अमृतमहोत्सव... भारतीय चित्रपट 'बोलल्या'चा

१४ मार्च १९३१ हा भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सुवर्णदिन. याच दिवशी मुंबईतील मॅजेस्टिक चित्रपटगृहात 'आलम आरा' हा पहिला पूर्ण लांबीचा भारतीय बोलपट प्रदर्शित झाला आणि १८ वर्षांपासून 'मूक' असलेली चित्रपटसृष्टी बोलकी झाली. या ऐतिहासिक घटनेला ७५ वर्षे पूर्ण झाली.

ही क्रांती केली होती दिग्दर्शक अर्देशकर इराणी यांनी. 'आलम आरा'मुळे भारतीय चित्रपट सातासमुद्रापार जाऊन पोहोचला. मास्टर विठ्ठल, झुबैदा आणि पृथ्वीराज कपूर यांच्या मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाने विक्रमी यश मिळवले. हिंदी आणि उर्दूत असलेल्या या चित्रपटात सात गाणी होती. अपुरे आर्थिक पाठबळ, साधनसामग्रीची कमतरता, प्रगत तंत्राचा अभाव या अडचणी असतानाही प्रखर इच्छाशक्तीच्या बळावर या बोलपटाची निर्मिती केली गेली. स्टुडिओ त्या वेळी रेल्वे रुळाजवळ असल्याने आवाजाचा त्रास होऊ नये, म्हणून

रात्र रात्र जागून रेकॉर्डिंग केल्याची आठवणही अर्देशर इराणी यांनी सांगितली.

यानंतर भारतीय चित्रपटांनी मागे वळून पाहिलेच नाही. 'आलम आरा'च्या यशानंतर तीनच आठवड्यांत 'शिरी फरहाद' हा उर्दू बोलपट प्रदर्शित झाला. त्यात २१गाणी होती. पश्चिमेत १९२६ मध्ये 'डॉन जुआन' आणि १९२८ मध्ये 'लाईट्स ऑफ न्यूयॉर्क' हे बोलपट तयार झाले होते. आज भारत जगात सर्वाधिक चित्रपट तयार करणारा देश बनला असून, दर वर्षी एक हजार चित्रपट देशात तयार होत असतात, अशी माहिती पुण्याच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाने दिली आहे. वर्षाला हजारो कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या या चित्रपट उद्योगाशी हजारो लाख लोक जुळले आहेत.

* तोलाराम रहेजा यांची 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद

ज्येष्ठ साहित्यिक तोलाराम रहेजा यांचे नाव 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स' या पुस्तकाच्या २००५ च्या आवृत्तीत समाविष्ट करण्यात आले आहे. आजपर्यंत रहेजा यांचे सुमारे ५५० लेख व कथा तसेच सिंधी व मराठी भाषेतील पुस्तकेही प्रसिद्ध झाली आहेत.

रहेजा मूळचे कराचीचे. भारताच्या फाळणीच्या वेळेला त्यांचे वडील कुटुंबासह पुण्यात आले. मात्र कराचीतील परिस्थिती सिंधी लोकांसाठी अधिकच बिकट होत गेल्याने त्यांनी पुण्यातच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. रहेजा यांचे शालेय शिक्षण पुण्याच्या नातूबागेतील सरस्वती मंदिर शाळेत झाले. त्यावेळी त्यांनी आठवीत लिहिलेल्या कथांना व कवितांना शाळेतील शिक्षक व ज्येष्ठ साहित्यिका स्नेहलता दसनूरकर व योगिनी जोगळेकर यांचे मार्गदर्शन झाले. भाषेची शुद्धता जपण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक पु. ग. ब्रह्मे यांनी जातीने लक्ष दिले. त्यामुळे त्यांना मराठी साहित्याची गोडी लागली.

घरची परिस्थिती गरिबीची असल्याने त्यांनी शालेय वयात साबण, कापड विक्रीचाही व्यवसाय केला. रात्रशाळेत त्यांचे नववी ते अकरावीचे शिक्षण पूर्ण झाले. त्याच वेळी नाशिकच्या एका वृत्तपत्रात ते विशेष प्रतिनिधी म्हणूनही काम पाहात होते. त्यावेळी त्यांना महिन्याला दहा रुपये पगार होता. सिंधी संस्कृतीचा परिचय करून देणाऱ्या त्यांच्या 'सिंधू दर्शन' या मराठी पुस्तकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कारही मिळाला. 'सिंधुपुत्र' ही सिंधी समाजाची फाळणीमुळे झालेली स्थिती रेखाटणारी कादंबरी, 'पूजा' व 'येशील कधी परतून पाखरा...' आदी मराठीतील पुस्तकेही प्रसिद्ध झाली. 'पूजा' या पुस्तकाचा त्यांनी सिंधी भाषेतही अनुवाद केला. त्यांनी अनेक सिंधी पुस्तकांचा अनुवाद मराठी भाषेत केला आहे. सिंधी समाजाची संस्कृती, परिस्थिती आदी विषयांचे चित्रण त्यांच्या साहित्यातून घडते.

'तुलसी अम्मा' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी प्रकाशनाच्या उंबरठ्यावर आहे. सध्या ते 'चुलता' या वृद्धांच्या समस्येवर आधारित पुस्तकाचे लेखन करीत

आहेत.

* पारू नाईक यांची कादंबरी : मोहिनी

स्क्रिझोफेनिया अर्थात 'छिन्नमनस्कता' या मनोविकारातून बऱ्या झालेल्या मनोरुग्ण नायिकेला तिचे कुटुंबीय पुन्हा कशा पद्धतीने स्वीकारतात, हे दाखवणारी पारू नाईक यांची 'मोहिनी' ही कादंबरी दिनांक ८ एप्रिल रोजी प्रकाशित होणार आहे. दिवंगत कादंबरीकार पद्मश्री रणजित देसाई यांच्या पारू नाईक या कन्या होत.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित होत असलेली ही कादंबरी पारू नाईक यांची पहिलीच स्वतंत्र साहित्यकृती आहे.

विविध मनोरुग्ण, त्यांचे पालक, मानसोपचारतज्ज्ञ तसेच येरवडा, मेंटल हॉस्पिटलमध्ये जाऊन या व्याधीचे तपशील जमा केले आहेत.

'मनोविकार' हा आपल्याकडे अजूनही सामाजिक लांच्छन समजले जाते, त्यामुळे रोगमुक्त होऊनही अशा व्यक्तीला त्याचे कुटुंब मनापासून स्वीकारीत नाही. येरवडा मेंटल हॉस्पिटलमध्ये असणाऱ्या एका वॉर्डात जवळपास तीस महिला संपूर्णपणे बऱ्या होऊनही गेली अनेक वर्षे नातेवाईकांच्या प्रतीक्षेत आहेत. सकारात्मक दृष्टीने मनोरुग्णाला कसे हाताळावे व स्वीकारावे याच्या टिप्स मोहिनी कादंबरीत आहेत,' असे पारू नाईक यांनी नमूद केले.

नाईक यांची पुढील कादंबरी तृतीयपंथी समाजावर आहे. यासाठी त्यांनी आवश्यक तो अभ्यास सुरू केला आहे. मुंबईचे पोलिस आयुक्त अनामी रॉय यांच्या मदतीने त्यांनी देवनार, नागपाडा, जे. जे. हॉस्पिटल व बॉम्बे हॉस्पिटलमध्ये जाऊन या विषयावरचे संदर्भ गोळा केले आहेत.

* बालसाहित्याचे हे महत्व अनन्यसाधारण

कोणत्याही साहित्यिकाच्या जडणघडणीत बालसाहित्याचे महत्त्व अनन्यसाधारण असते. माझ्यावर झालेल्या संस्कारात या साहित्याचा वाटा खूप मोठा आहे. त्यामुळे बालसाहित्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, असे मत ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

शाहू मंदिर महाविद्यालय व पुणे विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या वतीने आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. अशोक शिंदे, कला व ललित कला विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शिवाजीराव मोहिते व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शोभा इंगवले या वेळी उपस्थित होत्या.

प्रा. जाधव आपल्या भाषणात म्हणाले, की सध्या बहुभाषिकत्वाचा काळ आहे. मराठीबरोबर इतर भाषा येणे आवश्यक आहे. मात्र, त्याचवेळी मराठीतील वाङ्मयप्रकाराकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मराठी विश्वकोशाविषयी माहिती

विद्यार्थिदशेतच मुलांना असणे आवश्यक आहे. या सर्वांचा मूळ पाया बालसाहित्यात आहे. त्यामुळे याकडे दुर्लक्ष होऊ नये, याची काळजी घेण्याची गरज आहे. साहित्य परिषदेसारख्या संस्थांनी याकडे लक्ष देणे अपेक्षित आहे.

स्पर्धात्मकतेच्या काळाचा उल्लेख करून प्राध्यापकांनी याची जाणीव ठेवावी, असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, की आपण समृद्ध झालो तरच विद्यार्थ्यांना समृद्ध करू शकतो. त्यातून समाज अधिक प्रगल्भ होण्यास मदत होते. त्यामुळे प्राध्यापकांनीही स्वत:च्या साहित्यसमृद्धीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आनंद यादव, हे चर्चासत्रात सहभागी झाले होते. दिलीप धोंगडे, डॉ. सतीश बडवे, शोभा पाटील डॉ. अलका पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

* 'बहुसांस्कृतिकतेमुळे स्थानिक संस्कृती हरवतेय'

बहुसांस्कृतिक स्थानिक संस्कृती हरवत आहे. त्यामुळे बहुसांस्कृतिकतेच्या या स्वरूपाला आपला विरोध असल्याचे मत ज्येष्ठ नाटककार डॉ. गो. पु. देशपांडे यांनी व्यक्त केले.

पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्राच्या वतीने आणि सर रतन टाटा ट्रस्टच्या वतीने 'भारत आणि कॅनडातील रंगभूमीवरील बहुसांस्कृतिकता' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे होते.

डॉ. गो. पु. देशपांडे पुढे म्हणाले, ''बहुसांस्कृतिकतेमुळे त्या ठिकाणचे मूळ आणि प्रत्येकाची व्यक्तिगत असणारी संस्कृती टिकते का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे होणाऱ्या सरमिसळीमुळे त्या एका विशिष्ट संस्कृतीची ओळख राहात नाही आणि याच कारणामुळे आपण या तत्त्वाला विरोध करतो.''

डॉ. मोहन आगाशे यांनी सांगितले, ''बहुसांस्कृतिकतेमुळे विविधता असलेला समाज निर्माण होत आहे. त्याचा एकजिनसीपणा कसा साधायचा, हाच मोठा प्रश्न आपल्यासमोर आहे. या नव्या संस्कृतीमुळे उभ्या ठाकलेल्या नव्या आव्हानांचा विचार करावा लागणार आहे.''

ललित कलाकेंद्राचे संचालक डॉ. सतीश आळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुनीता पटेल यांनी कार्यशाळेची कल्पना विशद केली.

* चित्रपटनिर्मिती करणारया चौघींचा प्रवास

जागतिक महिला दिनानिमित्त मधुरांगणने 'अपराजिता' हा दृकश्राव्य कार्यक्रम केला. कविता, गाणी, अभिवाचन, मुलाखतीतून 'ती'चा जगण्याचा प्रवास... त्यात येणाऱ्या असंख्य अडचणी, समस्या; घरातल्यांचा, समाजाचा विरोध; अवहेलना याला सामोरे जात यशाच्या मार्गाकडे जाणारा... प्रवास उलगडून गेला.

अभिनेत्री नीना कुळकर्णी, दिग्दर्शिका नीलकांती पाटेकर, उद्योजिका अरुणा भट, डॉ. माया तुळपुळे यांनी केलेल्या चित्रपट निर्मितीमागची भूमिका स्पष्ट केली. आजच्या जीवनाच्या गतीला सामोऱ्या जाणाऱ्या स्त्रीची कथा नीना कुळकर्णी यांनी मांडली. अंगावर पांढरे पडल्यावर समाजाकडून मिळणाऱ्या वेगळेपणाच्या वागणुकीतील दु:ख दाखवण्यासाठी 'नितळ' चित्रपटाची निर्मिती केली, असे डॉ. तुळपुळे यांनी सांगितले. जीवनात चिकाटी, जिद्द न सोडल्यास यश तुमचेच असते हा स्वानुभव श्रीमती भट यांनी कथन केला. अपंगत्वाशी सामना करतस जगणाऱ्या वल्लरीने आपल्याला झपाटून टाकल्याने तिच्यावर लघुपट केला, असे नीलकांती पाटेकर यांनी नमूद केले.

मानसी मागीकर, सुप्रिया चित्राव, अभिराम भडकमकर यांनी अभिवाचन केले. 'रसिक मनमोहिनी' या महिला वादकांच्या वाद्यवृंदाने साथ-संगीत दिली.

'प्रवीण मेंदी'चे राजमल ओसवाल, ॲलोगॉड ॲलोव्हेराचे श्री. आगरवाल या वेळी उपस्थित होते. श्री. ओसवाल म्हणाले, ''माझ्या उत्पादनांना महिलांनी चांगला प्रतिसाद दिल्याने यशस्वी झालो.''

* 'नौ दो ग्यारह'मध्ये सामान्य माणसाची घुसमट

'टॅक्सी नं. नौ दोग्यारह'च्या माध्यमातून सामान्य माणसाची घुसमट दाखविण्यात आली आहे, असे मत अभिनेता नाना पाटेकर यांनी व्यक्त केले.

प्रेक्षकांना हा चित्रपट विनोदी वाटत असला, तर तो आमचा पराभव ठरेल, असे सांगून ते म्हणाले, ''या चित्रपटातील विनोद हा एखाद्या कडू औषधावरील साखरेच्या गोळीसारखा आहे. तो गंभीर संदेश देतो. सर्वसामान्यांना जगताना आलेले अनुभवच यात अप्रत्यक्षपणे मांडण्यात आले आहेत.''

सध्याची चित्रपटातील तरुण मुले मेहनती, गुणी आहेत. माझ्यासारख्या ५६ वर्षांच्या माणसाला त्यांच्या उत्साहाशी बरोबरी करणे कठीण जाते, असेही त्यांनी नमूद केले.

''महेश भट यांच्याकडे पाच वर्षे सहायक म्हणून काम केले असले, तरी चित्रपट निर्मितीमध्ये त्यांचे अनुकरण केलेले नाही.'' असे मत दिग्दर्शक लुथारिया यांनी मांडले.

* प्रकाशन वार्षिक २००६

पत्रकार मोहन वसंत वैद्य १९९९ पासून 'प्रकाशन विश्व' या नावाने 'प्रकाशन डायरी'च्या धर्तीवर वार्षिक काढत आहेत. साहित्यिकांच्या नाव-पत्त्यासोबतच लेखक-प्रकाशक यांच्यातील कराराचा नमुना, बृहन्महाराष्ट्रातील नियतकालिके, पुस्तक प्रकाशनासंदर्भातील तांत्रिक माहिती, कॉपीराइट कायद्याचा गोषवारा, रेल्वे, टपाल आणि एसटीमधून पुस्तके पाठविण्यासंदर्भातील माहिती, राज्यातील सार्वजनिक ग्रंथालये, महाविद्यालये, पुस्तक प्रकाशक, ग्रंथविक्रेते, मराठी भाषेत होणारी विविध

साहित्ये संमेलने, साहित्य संस्थांचे उपक्रम आणि योजना, ग्रंथांना पारितोषिक देणाऱ्या विविध संस्था अशी माहिती त्यात देण्यात आली आहे. दूरध्वनी संपर्क : (९५२०-२४४५११२९/५६२४१३७३) प्रकाशन विश्व (९५२०-२५३८३१९०)

* 'केशवसुतांची पुण्यशताब्दी

मराठी-कन्नड स्नेहवर्धन केंद्राने कवी केशवसुत यांच्या पुण्यशताब्दीनिमित्त तसेच कन्नड साहित्यकार डॉ. रं. श्री. मुगळी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ज्येष्ठ समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर, मराठी-कन्नड स्नेहवर्धन केंद्राचे अध्यक्ष डॉ. अ. रा. तोरो, विश्वस्त यशोदा मोरे, महासचिव के. एस. हेगडे उपस्थित होते. डॉ. मुगळी हे व्यासंगी, साहित्यावर प्रेम करणारे जातिवंत कवी होते. भाषेचे बंधन न बाळगता त्यांनी चौफेर लेखन केले, असे हातकणंगलेकर यांनी सांगितले. या कार्यक्रमात हेगडे यांच्या 'मातु-मौन' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

केशवसुतांनी रचलेल्या कवितांमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील घातक सामाजिक प्रवृत्ती नष्ट करण्याचे सामर्थ्य होते. अशा युगप्रवर्तक कवीला कर्तृत्वाएवढे लौकिक मिळाले नाही, अशी खंत डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी व्यक्त केली.

* 'आयटी'साठी पुण्यात भरपूर 'यंग टॅलेंट' —सबीर भाटिया

'हॉटमेल'चे जनक म्हणून सायबर विश्वात प्रसिद्ध असणाऱ्या सबीर भाटियांनी पुण्याचे भरभरून कौतुक केले.

सबीर भाटिया यांनी 'केपीआयटी कमिन्स' या कंपनीबरोबर केलेल्या भागीदारी कराराची घोषणा पुण्यात करण्यात आली. पुण्यातील नावाजलेल्या शिक्षण संस्थांमधून दरवर्षी आयटी कंपन्यांसाठी आवश्यक असणारे 'यंग टॅलेंट' मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहे. ही पुण्याच्या दृष्टीने जमेची बाजू आहे.

भाटिया यांच्या मते बंगलोरमध्ये सध्या तरी आयटीसाठी आवश्यक असणारे 'यंग टॅलेंट' फारसे उपलब्ध नाही. बंगलोरमधील पायाभूत सोयीसुविधादेखील कोलमडल्या आहेत. पुणे शहरातील पायाभूत सोयीसुविधा बंगलोरच्या तुलनेत चांगल्या आहेत.

वाढत्या 'सायबर क्राईम'विषयी विचारले असता सबीर भाटिया म्हणाले, हे सायबर क्राईम रोखण्यासाठी आपण नवीन उत्पादन तयार केले आहे. या उत्पादनामुळे सायबर क्राईमला बऱ्याच प्रमाणात आळा बसू शकेल. विविध बँकांबरोबर या उत्पादनाच्या वापरासंबंधी बोलणी चालू आहेत. येत्या वर्षभरात हे उत्पादन बाजारात येईल. केपीआयटी कमिन्स या कंपनीने सबीर भाटिया व शिराझ कांगा यांच्या ब्लॉगएव्हरीवेअर डॉट कॉम या कंपनीची वेबसाईट विकसित केली आहे. या

वेबसाईटची संकल्पना, आराखडा आणि प्रारूप याची संपूर्ण जबाबदारी केपीआयटी कमिन्सने सांभाळली आहे.

* 'संत तुकाराम' आजही लोकप्रिय

मराठी सिनेमाचा सुवर्णकाळ समजल्या जाणाऱ्या प्रभात फिल्म कंपनीने काढलेला 'संत तुकाराम' हा सिनेमा 'ऑल टाइम सुपरहिट' ठरला आहे! ७२ वर्षांपूर्वीच्या या सिनेमाची लोकप्रियता आजही कायम आहे.

तुकाराम महाराज म्हणजे विष्णूपंत पागनीस आणि विष्णूपंत पागनीस म्हणजेच तुकाराम, हे समीकरण आजही दिसते. तुकोबांची भूमिका करताना तिच्याशी एकरूप झालेले पागनीस आजही कॅलेंडररूपाने तुकाराम कसे असावेत, याची प्रचीती देतात.

विष्णुपंत दामले तसेच एस. फत्तेलाल यांनी 'संत तुकाराम' हा देशातला पहिला वास्तववादी सिनेमा काढला. व्हेनिस फिल्म फेस्टिव्हलमध्ये जगातल्या तीन उत्कृष्ट सिनेमांपैकी एक ठरला.

'संत तुकाराम'च्या व्हीसीडी आणि डिव्हीडींना आजही चांगली मागणी आहे. गेल्या तीन वर्षांमध्ये एक हजारवर व्हीसीडी आणि व्हिसीडी विकल्या गेल्या. 'संत तुकाराम' प्रमाणेच 'संत ज्ञानेश्वर'लाही मागणी आहे.

डिजिटल रंगीत सिनेमा करण्याच्या तंत्राच्या सहाय्याने 'मुघल-ए-आझम'प्रमाणे 'संत तुकाराम'ही भविष्यात रंगीत करण्याचे प्रयत्न चालू आहेत. सध्या हे तंत्रज्ञान खूप महाग आहे.

* 'माझ्या कुत्र्यांच्या छत्र्या'मध्ये महिलांच्या विनोदबुद्धीचे चित्रण

स्त्रियांच्या विनोदबुद्धीचे खुमासदार चित्रण 'माझ्या कुत्र्याच्या छत्र्या' या पुस्तकात करण्यात आल्याचे मत बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुर्के यांनी व्यक्त केले.

आश्लेषा महाजन यांनी लिहिलेल्या 'माझ्या कुत्र्याच्या छत्र्या' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले.

स्त्रियांना विनोदबुद्धी नसते, असा समज करून त्यावर विनोद करण्याची प्रवृत्ती सर्रास आढळते. स्त्रियांच्या विविध विनोदी छटा उलगडून दाखवण्याचा प्रयत्न महाजन यांनी केला आहे. निर्मळ मनाचा माणूसच विनोद करू शकतो. माणसांचे ताणतणाव कमी करण्यासाठी विनोद उपयोगी पडत असल्याचे त्यांनी नमूद केले.

हलक्या फुलक्या आणि रोजच्या तपशीलांनाही मोठा अर्थ असतो. फक्त आपण ते लगेच व्यक्त करत नाही. दिनक्रमाचा वेग आणि अग्रक्रमाचा रेटा यांत क्षण बऱ्याचदा निसटून जातात. निसटता निसटता पकडलेले क्षण या लेखसंग्रहात

शब्दांनी बांधून ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे आश्लेषा महाजन म्हणाल्या.

*** 'गोठलेल्या वारली चित्रकलेत परिवर्तन व्हावे'**

''प्रत्येक लोककला म्हणजे एकप्रकारे गोठलेली अभिजात कला असते. चित्रकलेच्या बाबतीतही असे घडले असेल. थंडावलेल्या वारली चित्रकलेत बदल झाले पाहिजेत,'' असे मत ज्येष्ठ चित्रकार रवीं परांजपे यांनी व्यक्त केले.

डॉ. गोविंद गोरे यांनी संकलित केलेल्या 'वारली चित्रकला' पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. परांजपे म्हणाले, ''वारली ही सौंदर्य गोंजारणारी चित्रकला आहे; पण दुर्दैवाने आज तिची नक्कल होतेय. वारली चित्रकला ज्या काळात उजेडात आणली गेली, त्याचा मी साक्षीदार आहे. 'सुंदर ते वेचावे, अधिक सुंदर करोनि मांडावे,' या तत्त्वज्ञानाभोवती कोणत्याही प्रांतातील चित्रकला रुंजी घालत असते. वारली चित्रकला त्यास अपवाद नाही. सुंदर म्हणजे सहज आणि सोपे. आजूबाजूच्या वातावरणातील हे सहज वेचण्याचे आणि नेमकेपणाने मांडण्याचे काम किती अवघड आहे, हे केवळ चित्रकारच जाणो. त्यामागे चित्रकाराचे दीर्घकाळाचे चिंतन असते; जे मला वारली चित्रांमध्ये जाणवते.'' श्रीविद्या प्रकाशनाने हे पुस्तक काढले आहे. कार्यक्रमानंतर वारली चित्रकलेची प्रात्यक्षिके झाली.

*** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कवितांचे प्रकाशन**

''सावित्रीबाई फुले यांचा वारसा आजच्या पिढीतील स्त्रियांनी पुढे चालवला आहे,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांनी सावित्रीबाई फुले यांच्या शतकोत्तर अमृत महोत्सवी जयंती वर्षाच्या प्रारंभानिमित्त आयोजिण्यात आलेल्या कार्यक्रमात व्यक्त केले. 'सावित्रीची निवडक काव्यफुले' या पुस्तिकेचे प्रकाशन आदिवासी कार्यकर्त्या भामा नाईक यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी हाजी नदाफ होते.

समाजातील विषमता दूर करण्याच्या दृष्टीने असे प्रकाशन कार्यक्रम प्रेरक असल्याचे सांगून, पुण्याच्या पूर्व भागात एखादे सांस्कृतिक भवन होण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. सुनीता जाधव, सुनंदा साळवे, बाबा जाधव आणि सरिता पदकी यांनी या वेळी काही कविता सादर केल्या.

*** संगीत, नृत्य व पोवाड्याद्वारे सावित्रीबाईंना आदरांजली**

संगीत, नृत्य आणि पोवाडा याद्वारे छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि फ्रेंच राज्यक्रांतीची उद्गाती जोन ऑफ आर्क यांच्या जीवनावरील अनेक प्रसंग काँग्रेस कमिटीतर्फे आयोजिलेल्या 'उन्मेष' या कार्यक्रमात दाखवले गेले. अभय छाजेड, महापौर रजनी त्रिभुवन, आदी याप्रसंगी उपस्थित होते. प्रसिद्ध कथ्थक नर्तिका रोशन दात्ये व त्यांच्या शिष्यांनी संगीतावर आधारित नृत्याचे सादरीकरण केले.

*** धरण प्रकल्पांच्या नियोजनात वैज्ञानिक अंधश्रद्धा नकोत**

राज्यात येत्या तीस वर्षांमध्ये २५० मध्यम आकाराची धरणे बांधण्यात येणार असून त्याद्वारे विदर्भ, कोकणाचा कायापालट होण्याची संधी आहे. अशा परिस्थितीत वैज्ञानिक अंधश्रद्धांच्या आहारी जाऊन व विस्थापितांच्या प्रश्नांचा बाऊ करून राज्यातील हरितक्रांतीला नाकारू नये, असे आवाहन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दत्तप्रसाद दाभोलकर यांनी आज येथे केले.

ज्येष्ठ साहित्यिक पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागामध्ये 'नर्मदा प्रकल्पाची शोधयात्रा' या विषयावर बोलताना डॉ. दाभोलकर म्हणाले की, राज्यातील भावी धरण प्रकल्पांमध्ये कोकणमध्ये १०० मध्यम धरणे बांधण्यात येणार आहेत.

त्याद्वारे तीन लाख हेक्टर शेतीचा फायदा होणार आहे. विदर्भाचा तर खऱ्या अर्थाने अनुशेष भरून निघणार आहे. तेथील १५० प्रकल्पांच्या माध्यमातसून १५ लाख हेक्टर शेतीचा फायदा होणार आहे.

नर्मदा सरदार सरोवर प्रकल्पाचा अगदी १९४८ पासूनचा इतिहास कथन करून ते म्हणाले की, प्रकल्पाच्या भवितव्याबाबत सर्वंकष चर्चा होण्याची गरज आहे. त्यासाठी अभियांत्रिकी, अर्थशास्त्रविषयक संघटना, तज्ज्ञांकडून 'न्यायनिवाडा' करून घेण्याबाबत त्याचप्रमाणे विस्थापनामधील अडथळे, समस्या, दिरंगाई टाळण्यासाठी लोकायुक्त नेमण्याबाबत विचार करण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले.

*** 'ऐतिहासिक वास्तूचे केवळ जतन नव्हे; योग्य व्यवस्थापन हवे'**

देशात विविध वास्तूंच्या स्वरूपातला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक समृद्ध वारसा असताना त्याचे केवळ जतन न करता त्यांचे योग्य व्यवस्थापन करणे युनेस्कोच्या ॲक्टिविटी कायद्यामुळे शक्य होईल, असा विश्वास ज्येष्ठ पुरातत्त्व शास्त्रज्ञ डॉ. मधुकर ढवळीकर यांनी व्यक्त केला.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने आयोजित केलेल्या 'सांस्कृतिक वारशाचे व्यवस्थापन' या कार्यशाळेचे उद्घाटन ढवळीकर यांनी केले. अध्यक्षस्थानी डॉ. दीपक टिळक होते. दोन दिवसांच्या या कार्यशाळेत डॉ. शुभांगना अत्रेक, डॉ. जी. बी. देगलुरकर, श्रीनंदन बापट, विजय कारेकर, मंजिरी भालेराव, सत्यशील नाईक आणि शाम ढवळे इत्यादींची भाषणे झाली.

ऐतिहासिक कालखंडातील अनेक वास्तू आपल्याकडे असल्या तरी त्यांच्या व्यवस्थापनात आपण कमी पडतो. दिल्लीमधील 'जंतरमंतर' ही सोळाव्या शतकातली वेधशाळा होती. पण त्याठिकाणी दिल्ली महापालिकेने सार्वजनिक उद्यान केल्यामुळे त्य वास्तूला धक्का पोहोचण्याची शक्यता आहे. मुंबईच्या जवळ असणारी मंडपेश्वराची

लेणी पाहायला जाण्यासाठी योग्य वाहतूक यंत्रणा हवी. अशा वास्तूंचा सत्य इतिहास सांगणारे गाईड हवेत आणि हा वारसा जगापुढे नेणारे मार्केटिंगही जमायला हवे, असे ढवळीकर म्हणाले.

उत्खननात सापडलेल्या प्राचीन संस्कृतीची गावेच्या गावे वसवणाऱ्या जर्मनीप्रमाणे आपल्याकडेही पाच हजार वर्षे जुन्या असणाऱ्या हडप्पा संस्कृतीवरील गाव उभारण्याच्या कल्पनेबाबत सरकार उदासीन आहे.

विविधतेत एकात्मता शोधणाऱ्या भारतीय संस्कृतीचे जतन करताना वेद, संगीत, हस्तलिखिते आणि वास्तूंचे जतन करण्यासाठी टिमविमध्ये लवकरच एक उपयुक्त अभ्यासक्रम सुरू करणार असल्याचे टिळक यांनी सांगितले. देहूमधील इंद्रायणीत बुडालेली तुकोबांची मूळ गाथा नीट जतन केली नाही तर ती नष्ट होईल, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

* शिक्षकांनी भाषेविषयी प्रेम, अभिरुची निर्माण करावा –कोतापल्ले

भाषशिक्षण आणि संस्कृती-मूल्यसंस्कार हे काही वेगळे नाहीत. त्यामुळेच मराठीच्या शिक्षकांनी केवळ पाठ्यक्रमिक अध्यापन न करता विद्यार्थ्यांमध्ये भाषेविषयी प्रेम, अभिरुची निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी केले.

मराठी प्राध्यापक परिषदेचे पहिले अधिवेशन शाहू महाविद्यालयात संपन्न झाले. राज्याचे उच्चशिक्षण संचालक डॉ. के. एम. कुलकर्णी, परिषदेचे अध्यक्ष डॉ. अविनाश आवलगावकर, सरचिटणीस रवींद्र कडू, उत्तमराव पाटील, बाळासाहेब इंगवले आदी या वेळी उपस्थित होते.

इतर विद्याशाखा, विषयशिक्षकांच्या संघटना यापूर्वीच स्थापन करण्यात आल्या आहेत. मराठीची परिषद स्थापन करण्यात उशीर झाला अशी खंत व्यक्त करून डॉ. कोतापल्ले म्हणाले की, साहित्य परिषदा, भाषासंस्थांमुळे मराठीच्या शिक्षकांना अशा प्रकारचे व्यासपीठ स्थापन करण्याची गरज कदाचित भासली नसेल. परंतु, भाषाशिक्षणासाठी आव्हानात्मक असलेल्या या कालखंडामध्ये यका परिषदेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ग्रामीण भागांमध्ये मराठीला विद्यार्थ्यांची 'गर्दी' आहे. पण, शहरी भागांमध्ये मात्र मराठीला विद्यार्थी नाहीत, अशी परिस्थिती आहे. शहरांमधील हे लोण आता गावांमध्येही पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत मराठीच्या शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे.

मराठी नियतकालिके बंद पडत आहेत. वाचकवर्ग कमी झाल्यामुळे पुस्तकांची विक्री होत नाही, अशा परिस्थितीत एखादा विद्यार्थी मराठी विषय घेऊन 'बीए-एमए' होतो, म्हणजे नेमके काय साध्य करतो, याबाबत अंतर्मुख होऊन शिक्षकांनी

विचार करण्याची गरज आहे, असे आवाहनही डॉ. कोतापल्ले यांनी केले.

* प्रभाकर पणशीकर - वय वर्ष ७५

'तो मी नव्हेच', 'अश्रूंची झाली फुले', 'इथे ओशाळला मृत्यू' यांसारख्या नाटकांद्वारे रसिकांवर अधिराज्य गाजवणाऱ्या प्रभाकर पणशीकरांचा सत्कार पुण्यात करण्यात आला.

''चांगला अभिनेता बनण्यासाठी योग्य भूमिका मिळण्याची गरज असते. भूमिकेचा अभ्यास केल्याशिवाय रंगमंचावर त्याचे सादरीकरण करणे अवघड असते. त्या अभ्यासामध्ये नाटककाराने लिहिलेल्या शब्दांव्यतिरिक्त आवाज, देहबोली, वेशभूषा या पूरक बाबींकडेही लक्ष देणे गरजेचे असते. नाटकातला अभिनय हा धूतवस्त्राप्रमाणे रंगमंचावर प्रत्येक वेळी नवा अनुभव देत असतो. 'तो मी नव्हेच' हे नाटक मिळालेच नसते तर... हा विचारही केला नाही, नियतीच्या खेळामुळे इथवर पोहोचलो. रंगभूमीच्या वेडाचे झपाटलेपणही साथीला होते, तब्बल दोन हजार आठशे तीस प्रयोगांनंतर 'तो मी नव्हेच' प्रकृतिअस्वास्थ्यामुळे थांबवल्याचे त्यांनी सांगितले.

'मी हाडाचा नट नाही, त्यामुळे सर्व प्रकारच्या भूमिका करू शकलो,' असे सांगून ते म्हणाले, ''कोणत्याही नाटककाराने माझ्यासाठी म्हणून भूमिका लिहिली नाही; किंबहुना 'लखोबा लोखंडे' आणि 'औरंगजेब' यांच्या भूमिकाही अपघातानेच मिळाल्या; मात्र स्वीकारलेली प्रत्येक भूमिका मनापासून केली.''

सध्याच्या अभिनेत्यांपुढे नवीन प्रलोभने आणि आकर्षणे निर्माण झाली असल्याने रंगभूमीवर मळभ आल्याचे वातावरण आहे; मात्र 'आपण एका समूहाचा भाग आहोत,' ही भावना जोवर प्रेक्षकांमध्ये कायम राहील, तोवर नाटक या माध्यमाला नक्कीच मरण नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

''नाटक निर्मितीचा खर्च सातत्याने वाढत असल्याने सरकारतर्फे जाहीर करण्यात आलेली अनुदानाची योजना 'सलाईन'सारखी उपयुक्त ठरेल. त्या मलमपट्टीच्या आधाराने चांगली नाटके तगून राहतील,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

* 'मसाप'च्या कार्याध्यपदी गं. ना. जोगळेकर

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीत कार्याध्यक्षपदी डॉ. गं. ना. जोगळेकर यांची निवड झाली. प्रमुख कार्यवाहपदी डॉ. वि. भा. देशपांडे तर कोषाध्यक्षपदी ह. ल. निपुणगे विजयी झाले.

कार्याध्यक्षपदाच्या शर्यतीत गं. ना. जोगळेकर, रतनलाल सोनग्रा व दीपाकांत राक्षे हे उमेदवार होते. डॉ. जोगळेकर यांना २२४२ मते, सोनग्रा यांना ८१९ मते मिळाली.

प्रमुख कार्यवाह पदासाठी डॉ. देशपांडे व माधव राजगुरू यांच्यात लढत झाली. त्यात डॉ. देशपांडे २१११ मते मिळवून विजयी झाले. कोषाध्यक्षपदासाठी ह. ल. निपुणगे व सुनील महाजन यांच्यात अटीतटीची लढत झाली. त्यात निपुणगे यांना १५६४ तर महाजन यांना १४४९ मते मिळाली. कार्यवाह (व्याख्याने, स्मृतिदिन) क्रमांक एकसाठी मिलिंद जोशी यांची ३५२ मतांनी निवड झाली. पारितोषिक, विशेष कार्यक्रमाची जबाबदारी असणाऱ्या कार्यवाहपदी माधवी वैद्य यांची बिनविरोध निवड झाली होती. कार्यवाह क्रमांक तीनवर (ग्रंथनिवड, पारितोषिके) कल्याण इनामदार, कार्यवाह क्रमांक चारवर (परीक्षा विभाग) स्नेहसुधा कुलकर्णी तर कार्यवाह क्रमांक सहावर (वास्तुदेखभाल) प्रमोद आडकर विजयी झाले. कार्यवाह क्रमांक पाचसाठी (ग्रंथालय विभाग) अनंत जोशी व अरुण जाखडे रिंगणात होते. दोघांना समान मते मिळाल्याने चिठ्ठ्या टाकून उमेदवार निवडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यात अनंत जोशी विजयी झाले. पुणे महापालिका क्षेत्राचे प्रतिनिधी म्हणून कल्याणी दिवेकर, डॉ. अरविंद संगमनेरकर, डॉ. सतीश देसाई निवडून आले.

जिल्हा प्रतिनिधी म्हणून निवड झालेले उमेदवार व त्यांचे जिल्हे असे : मधुसूदन नेने (सातारा), पद्माकर कुलकर्णी (सोलापूर), राजन मुठाणे (कोल्हापूर), किसन पाटील (जळगाव), प्रभाकर संत, अरुण मैड, पां. के. दातार (ठाणे), बिनविरोध निवड झालेले उमेदवार : पुरुषोत्तम काळे (पुणे), प्रकाश होळकर (नाशिक), भगवान ठाकूर (धुळे), सु. प्र. कुलकर्णी (नगर), रामचंद्र शिंदे (सांगली), प्रतिभा लिमये (रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड).

* जयकर ग्रंथालय आता २४ तास खुले

पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालय आता २४ तास खुले राहणार आहे. अभ्यासासाठी ग्रंथालयातील रीडिंग हॉल २४ तास खुला असावा, अशी विद्यार्थ्यांची मागणी होती.

विद्यापीठाचे हंगामी कुलगुरू रत्नाकर गायकवाड यांनी ग्रंथालयाला भेट देऊन विद्यार्थ्यांशी चर्चा केली. त्या वेळी विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाच्या वेळा वाढवाव्यात, अशी मागणी केली होती. जयकर ग्रंथालयाच्या 'रीडिंग हॉल'ची क्षमता ३०० आहे. सध्या सकाळी आठ ते रात्री बारा वाजेपर्यंत ग्रंथालय खुले असते. विद्यापीठातील सर्व विभाग; तसेच नव्याने सुरू झालेल्या अभ्यासक्रमांचे विद्यार्थी येथे अभ्यासासाठी येतात. अनेक वेळा जागा मिळत नाही. ग्रंथालयातील 'रीडिंग हॉल'बरोबरच वसतिगृह क्रमांक तीन आणि चारच्या दरम्यान असलेले सभागृहही अभ्यासासाठी २४ तास खुले राहणार आहे. ग्रंथालयातील इंटरनेट केंद्रात उपलब्ध असलेल्या जागेत ५० ते ६० विद्यार्थी बसू शकतात; तेही खुले ठेवण्याचा विचार आहे.

'रीडिंग हॉल' २४ तास खुला ठेवण्यासाठी कर्मचारी संख्या वाढविण्याची गरज असून, तशी मागणी कुलगुरूंकडे केली आहे.

* स्नेहमयी पुस्तक मंडळ

पिंपरी-चिंचवड परिसरात विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या वाचनवेड्या बारा महिलांनी एकत्र येऊन स्नेहमयी पुस्तक मंडळाद्वारे गेल्या पाच वर्षांत पाचशेहून अधिक पुस्तकांचे संकलन केले आहे.

या महिलांनी २००१ मध्ये पुस्तक भिशीचा उपक्रम सुरू केला. दरमहा ठराविक रक्कम जमा करून ज्या सखीचा नंबर लागेल तिने त्या रकमेतून तिच्या आवडीची पुस्तके विकत घेणे अन् वर्षभरात प्रत्येकीने ती वाचून झाल्यावर त्यावर चर्चा करणे किंवा इतर वाचलेल्या साहित्यिक विषयांवर चर्चा करणे हा या मंडळाच्या स्थापनेमागील मुख्य हेतू आहे. ज्योती देशपांडे, सुचेता गांगल, अंजली आठवले-ओक, विजया डोळे, संगीता खिरे, किरण लाखे, सुलभा कुलकर्णी, तृप्ती शहा, संध्या कट्टी, शर्मिला गुजर, शिल्पा गौरी गणपुले, अकल्पिता खाडिलकर या साहित्यप्रेमी महिलांचा त्यात सहभाग आहे.

वाचनाबरोबर मंडळाने सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवली असून, 'सकाळ रिलीफ फंडा'साठी मदत, ग्रामप्रबोधिनीच्या दत्तक पालक योजनेत सहभाग, 'साक्षी' या अनाथाश्रमातील मुलांना आवश्यक साहित्य देणे यासारखे उपक्रम मंडळाच्या वतीने राबविण्यात येतात. प्राधिकरणातील वनौषधी उद्यानात वटपौर्णिमेनिमित्त वड आणि इतर रोपे त्यांनी लावली आहेत. कराड येथील साहित्य संमेलन, निगडी येथील बालकुमार साहित्य संमेलन, विज्ञान परिषेदच्या कार्यातही मुलांसह मंडळातील महिला सहभागी झाल्या होत्या. नवीन पिढीतील संवेदनशीलता, सर्जनशीलता कायम राहून व्यवहार व आदर्शांचा मेळ घालणे शक्य व्हावे, वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी मंडळाच्या सदस्या प्रयत्न करीत आहेत. या मंडळामुळे घरातील पुस्तकांच्या संख्येत मोठी वाढ होत असल्याने काही वेळा नाराजी पत्करावी लागते; परंतु मंडळातील महिलांच्या वैचारिक संपदेत मोठी वाढ होत असल्याने हा उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त सदस्य महिलांनी जाहीर केला आहे.

* औंध मराठी साहित्य संमेलन

''मोठ्या साहित्य संमेलनांच्या तुलनेत अनौपचारिक असलेल्या छोट्या संमेलनांमधून वाचक व लेखकांमधील संवाद वाढायला हवा,'' अशी अपेक्षा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांनी व्यक्त केली.

'अक्षरभारती' संस्थेतर्फे आयोजित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. तत्पूर्वी ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ विजय भटकर यांच्या हस्ते संमेलनाचे

उद्घाटन झाले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. विठ्ठल वाघ, 'यशदा'चे महासंचालक रत्नाकर गायकवाड, नगरसेवक ज्ञानेश्वर तापकीर, 'अक्षरभारती'च्या संचालिका संगीता गायकवाड वगैरे या वेळी उपस्थित होते.

''साहित्य संमेलनातून बोलीभाषेचा वापर होण्यावर भर देण्यात यावा. अधिक जड भाषेत बोलल्यास माणसे दुरावतात, असे सांगून डॉ. अवचट म्हणाले, ''स्वनिर्मितीचा आनंद देण्याचे काम साहित्यातून होत असते. पुस्तके सोयीने वाचता येतात, इतर माध्यमांचे तसे नाही. माणसाला वैश्विक बनविण्याचे काम त्यातून होते.''

डॉ. भटकर म्हणाले, ''ज्ञान आणि विज्ञानाला समृद्ध करण्याचे काम भाषा करत असते. इंग्रजीप्रमाणेच मराठीलाही व्यावहारिक भाषा म्हणून स्थान मिळायला हवे. त्यासाठी मराठीतही प्रमाणित शब्दकोशाची निर्मिती झाली पाहिजे. अवघड इंग्रजी शब्दांसाठी मराठीत पर्यायी शब्द तयार करण्याची गरज आहे. इंटरनेटवरून अधिकाधिक मराठीचा वापर यावा.''

समारोप समारंभात बोलताना 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर म्हणाले, ''महानगरांमध्ये होणारे बदल हे वरवरचे आहेत. मुळातून बदलण्यासाठी साहित्य, संस्कृती आणि कलाच उपयोगी पडेल. त्यामुळे अशा साहित्य संमेलनांची गरज वाढत जाईल. बदलत्या समाजाचा वेध साहित्य घेत असते; त्यामुळे विषमता व दारिद्र्य याविषयीची प्रतिक्रिया साहित्यामध्ये अपरिहार्य आहे.''

''विविध जाती-धर्म, प्रथा, परंपरा यांना जोडणारा धागा म्हणजे भाषा होय. म्हणून मराठी भाषा संपणार ही जाणकारांनी उठविलेली हूल असून, ती कधीच संपणार नाही,'' असे 'लोकमत'चे संपादक अनंत दीक्षित यांनी परिसंवादात बोलताना सांगितले.

श्री. गायकवाड म्हणाले, ''समाजाला दिशा देण्याचे महत्त्वाचे काम साहित्यातून होते. सध्याच्या मूल्यांच्या ऱ्हासाच्या काळात मूल्यसंवर्धन आणि परिवर्तनाची तसेच लोकशाही मजबूत करण्याची जबाबदारी साहित्यावर आहे.''

डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते डॉ. विजय भटकर यांना मराठी गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन श्रीकांत चौगुले यांनी केले. श्यामसुंदर जोशी यांनी आभार मानले. समारोपानंतर निवेदक सुधीर गाडगीळ यांचा 'मुलखावेगळी माणसं' हा कार्यक्रम झाला.

* क्रांतिकारक फडके यांचे साहित्य इंग्रजांकडून मिळवावे

आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांना इंग्रजांनी पकडल्यावर त्यांच्याकडे शस्त्रे आणि युद्धकलेवरील प्रबंध सापडला होता. ही संपत्ती इंग्रजांकडून परत आणण्याचे आवाहन इतिहास संशोधक निनाद बेडेकर यांनी केले.

राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या आवारात फडके यांचे स्मारक उभारण्यात आले असून स्मारकाचे अनावरण आणि स्मृती उद्यानाचे उद्घाटन करण्यात आले.

फडके यांना इंग्रजांनी पकडल्यानंतर त्यांच्याकडे सापडलेल्या वस्तूंची यादी देण्यात आली आहे. त्यात युद्धकलेवरचा प्रबंध, तलवारी आणि शस्त्रे आहेत. या वस्तू इंग्रजांनी दडवून ठेवल्या आहेत. त्या शोधून प्रदर्शित केल्यास स्मारक परिपूर्ण होईल. त्यातून तरुणांना चेतना मिळेल, असेही बेडेकर म्हणाले.

नोकरीचा राजीनामा देऊन फडके यांनी २१ फेब्रुवारी १८७९ रोजी बंड पुकारले होते. इंग्रजांचे खजिने लुटण्याच्या क्रांतिकारक उमाजी नाईक आणि फडके यांच्या कार्यात साम्य होते.

फडके यांनी स्वहस्ताक्षरात 'दत्तचरित्र' लिहिले होते. त्याची प्रत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्याकडे असून त्याची छायांकित प्रत स्मारकामध्ये ठेवण्याची सूचना शिल्पकार खटावकर यांनी केली.

* संसदेतील बहुभाषिक संमेलन

भारतातल्या विविध भाषाभगिनींनी. हातात हात घालून संसदेत फेर धरला. असा दुर्लभ क्षण सभागृहाने प्रथमच अनुभवला. निमित्त होते, 'युनेस्को'ने जाहीर केलेल्या मातृभाषादिनाचे...

...शून्य प्रहरात लोकसभाध्यक्ष सोमनाथ चटर्जी अचानक थेट बंगाली भाषेत बोलू लागले. सुरुवातीचे काही क्षण अनेकांना समजलेच नाही की अचानक काय झाले. चटर्जी, वासुदेव आचार्य आणि गुरुदास दासगुप्ता यांनी आंतरराष्ट्रीय मातृभाषादिनाचे महत्त्व विशद केले तेव्हा सर्वांचेच मातृभाषाप्रेम जागृत झाले. चटर्जींनी प्रत्येकाला मातृभाषेत बोलण्याची अनुमती दिली आणि लोकसभेचे रूपांतर बहुभाषिक, बहुसांस्कृतिक संमेलनात झाले.

बसपचे इलियास आजमी (उर्दू), बीजेडीचे ब्रजकिशोर त्रिपाठी (उरिया), भाजपचे अनंतकुमार (कन्नड), लोकसभेचे उपाध्यक्ष चरणजीत अटवाल (पंजाबी), काँग्रेसचे किरीप चालिहा (आसामी), पी. आर. किंडीया (मणिपुरी), जी. के. वासन, द्रमुकचे के. ए. कृष्णास्वामी (तामिळ), शिवसेनेचे अनंत गिते, सुरेश प्रभू (मराठी आणि कोकणी), राजेश मिश्रा (संस्कृत), काँग्रेसचे मधुसूदन मिस्त्री, भाजपच्या जयाबेन ठक्कर (गुजराती), तेलुगू देशमचे मंडा जगन्नाथ (तेलुगू), बी. राधाकृष्णन (मल्याळम्), भाजपचे गिरीधारीलाल भार्गव (मारवाडी), राज बब्बर (ब्रजभाषा) आणि राजदचे रघुनाथ झा, संयुक्त जदचे प्रभुनाथसिंग (भोजपुरी) हे सर्व मातृभाषेत बोलले.

* रामदास पाध्ये यांना अमेरिकेचे आमंत्रण

शब्दभ्रमकार रामदास पाध्येंच्या घरचा फोन एक दिवस खणखणला आणि त्यांना सांगण्यात आले की, या वर्षाच्या अखेरीस लास वेगासमध्ये हॉलिवुडची

लिजंड मेरलिन मन्रो हिला श्रद्धांजली वाहण्यासाठी एक सर्वस्वी वेगळा कार्यक्रम सादर करण्यात येत आहे. त्यात मेरलिनवरचा पपेट शो करण्यासाठी जगभरातल्या पपेटीर्समधून तुमची निवड करण्यात आली आहे. पाच वर्षांपूर्वी अमेरिकतच जॉर्ज बुश आणि बिल क्लिंटन यांच्या त्यांनी बनवलेल्या पपेट्सनी अमेरिकनांना खूष करून टाकले होते. त्याच कीर्तीच्या आधारे 'पपेटीअर्स ऑफ अमेरिका' या संस्थेने पाध्येंना आवतण दिले आहे.

बोलक्या बाहुल्या आणि शब्दभ्रमकला या क्षेत्रात सतत ३९ वर्षे काम करून आणि त्यात नवे प्रयोग करणाऱ्या रामदास पाध्येंना जागतिक पातळीवर मिळालेली ही मोठी दाद आहे. मेरलिन मन्रोला विविध कलाप्रकारांतून श्रद्धांजली वाहण्यासाठी योजलेल्या या कार्यक्रमात पपेटरी या कलाप्रकारासाठी 'पपेटीअर्स ऑफ अमेरिका'ने जगभरातील मोठमोठ्या बाहुलीकारांना नऊ महिन्यांपूर्वी संदेश धाडला होता. त्यातल्या ११ बाहुलीकारांची नावे शॉर्टलिस्ट करण्यात आली आणि त्यातून पाध्येंची अंतिम निवड केली गेली.

एवढे मोठमोठे पपेटीअर्स सर्व देशांत मौजूद असताना आपल्यासारख्या छोट्या माणसाची का निवड केली गेली, असे विचारले असता ते म्हणाले की एकच माणूस पपेटीअर, पपेटमेकर आणि व्हेंट्रिलॉक्विस्ट म्हणजे शब्दभ्रमकारही असणे ही गोष्ट दुर्मिळ आहे. असे कॉम्बिनेशन अमेरिकेत शोधूनही सापडत नाही. तुम्ही हे तिन्ही आहात, म्हणून तुमची निवड झाली आहे.

* 'आनंदमठ' कादंबरीच्या अनुवादाचे प्रकाशन

बकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'आनंदमठ' कादंबरीच्या डॉ. मृणालिनी गडकरी यांनी केलेल्या मराठी अनुवादाचे प्रकाशन गोवा मुक्ती संग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी मोहन रानडे यांच्या हस्ते करण्यात आले.

जन्मदा प्रतिष्ठान आणि राजहंस प्रकाशनातर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. या वेळी प्रसिद्ध उद्योगपती अरुण फिरोदिया, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश पुरंदरे, जन्मदा प्रतिष्ठानचे मकरंद केळकर आदी उपस्थित होते.

बंकिमचंद्र यांनी रचलेले वंदे मातरम् गीत स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा होते. स्वातंत्र्यपूर्व काळात प्रत्येक कार्यक्रमाची सुरुवात 'वंदे मातरम्' या घोषणेने होत होती अशा आठवणी रानडे यांनी सांगितल्या.

* ज्योत्स्ना देवधर– वय वर्षे ८१

''आजच्या लेखिकांवर माझ्या पिढीप्रमाणे जना-मनाचे दडपण नाही. अनुभवविश्व विस्तारलेल्या या लेखिका तुलनेने अधिक मुक्त जीवन जगताहेत. त्यामुळेच त्यांचे लेखन धीट बनलेय.'' अशा शब्दांत ज्येष्ठ कादंबरीकार-कथाकार ज्योत्स्ना देवधर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

देवधर यांनी २७ फेब्रुवारीला वयाच्या ८१ व्या वर्षात पदार्पण केले. ''माझ्या पिढीच्या लेखनावर खूप मर्यादा पडल्या,'' असे नमूद करून देवधर म्हणाल्या, ''समाजाचे दडपण आजच्या लेखिका स्वत:वर येऊ देत नाहीत. सादरीकरण आणि शैली यांचा त्या मनाप्रमाणे आविष्कार करू शकतात, हे मुक्तीचे लक्षण आहे. त्यांच्याप्रमाणे अनुभव आम्हाला मिळाले असते, तर कदाचित आमचेही लेखन वेगळे घडले असते. ज्या मध्यमवर्गीय, एकत्र कुटुंबात मी वाढले; तिथे बालविवाहापासून अनेक रूढी प्रचलित होत्या. मुलींनी बंडखोर विचार वाचू नयेत म्हणून त्यांच्या हातात 'किर्लोस्कर', 'स्त्री' मासिके न पडण्याची काळजी घरातील वडिलधारी मंडळी घेत असत. माहेरी आणि सासरीसुद्धा लेखन-वाचनाचे संस्कार होण्याचा प्रश्नच नव्हता. चाळिशीच्या सुमारास लिहू लागले, तेव्हा माझ्याबाबतीत घडलेला तो चमत्कार होता, असे मला आजसुद्धा वाटते.''

* अकरा इतिहास ग्रंथांचे मराठी अनुवाद

''इतिहास लिहिण्यासाठी साधनांचीच गरज असते. त्यादृष्टीने महाराष्ट्रात थेट राजवाड्यांपासून चांगले काम झाले आहे. आता भारतीय इतिहास संशोधन परिषदेने प्रकाशित केलेल्या अनुवादित पुस्तकांनी इतिहासाची संकल्पना बदलण्याचे काम केले,'' असे मत मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे माजी प्रमुख प्रा. ज. वि. नाईक यांनी व्यक्त केले.

'डायमंड पब्लिकेशन्स' आणि भारतीय इतिहास संशोधन परिषदेने संयुक्तपणे बाजारात आणलेल्या आणि नामवंत इतिहासकारांनी लिहिलेल्या ११ इंग्रजी संदर्भग्रंथांच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन 'सकाळ'चे संपादक-संचालक डॉ. अरुण टिकेकर यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ इतिहास-अभ्यासक डॉ. अ. रा. कुलकर्णी, डेक्कन महाविद्यालय अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पदय्या, प्रा. मधुकर ढवळीकर, डॉ. राजा दीक्षित, डॉ. गणेश राऊत या वेळी व्यासपीठावर होते.

प्रा. नाईक म्हणाले, ''इतिहास कधीही अंतिम नसतो. चुका दुरुस्त करण्यासाठी किंवा नवी साधने उपलब्ध झाल्यामुळे वा भूतकाळाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन मिळाल्यामुळे तो बदलत राहतो. ऐतिहासिक घटनेचे नव्याने विश्लेषण करतानाही त्यात बदल केले जातात. इतिहासकाराला भूत आणि वर्तमान अशा दोन मालकांना खूष ठेवावे लागते. प्रकाशित झालेली पुस्तके चाकोरी मोडणारी आहेत. विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी ती उपयुक्त आहेत.''

डॉ. पदय्या यांनी परिषदेच्या पश्चिम विभागाची स्थापना करून तिचे मुख्यालय पुण्यात असावे, अशी सूचना केली. डॉ. टिकेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. राऊत यांनी प्रास्ताविक आणि आभार मानले.

* ग्रंथांचे वाचन आवश्यक

गंधर्व प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'चिंता करितो विश्वाची' या पुस्तकाचे आचार्य किशोर व्यास यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या वेळी प्राचार्य शिवाजीराव भोसले, माजी आमदार डॉ. अरविंद लेले, पुस्तकाचे लेखक सुनील चिंचोलकर, प्रकाशक दीपक व प्रकाश खाडिलकर आदी उपस्थित होते. चांगले ग्रंथ वाचल्याशिवाय मानसिक वृद्धी होत नाही. सर्वांनी समर्थ रामदासांचा दासबोध आणि मनाचे श्लोक वाचावे असे प्राचार्य शिवाजीराव भोसले सांगितले.

शरीर सुदृढ असल्याशिवाय हातून चांगले काम होत नाही. समर्थ रामदासांनी गावोगावी हनुमानाचे मंदिर आणि व्यायामशाळा स्थापन करून हा संदेश दिला. परीक्षेत हल्ली थोडक्यात उत्तरे लिहा असे प्रश्न विचारले जात असले, तरी परीक्षकांना प्रश्न विचारता येत नाही अशी टीकाही प्राचार्य भोसले यांनी या वेळी केली.

संत कुठल्याही जातीचे नसतात. जो कुठल्या जातीचा असतो तो संत नसतो असे आचार्य किशोर व्यास यांनी सांगितले. समर्थ रामदास यांनी अवघ्या विश्वाची चिंता वाहिली. व्यक्तिगत जीवन कसे असावे याचा समर्थ रामदास आदर्श होते असे व्यास यांनी सांगितले. राजकारण हा शब्द म्हणजे समर्थांनी महाराष्ट्राला दिलेली देणगी आहे, असे लेले यांनी सांगितले. चिंचोलकर यांनी प्रास्ताविक केले. प्रसिद्ध अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी सूत्रसंचालन केले.

* 'सर्वोत्कृष्ट मराठी कथा' मार्गदर्शक ठरतील

श्रीमती छाया व राम कोलारकर यांनी संपादित केलेल्या 'सर्वोत्कृष्ट मराठी कथा' लेखक आणि वाचकांसाठी मार्गदर्शक ठरतील, असे मत ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांनी व्यक्त केले.

कोलारकर दांपत्याने संपादित केलेल्या 'सर्वोत्कृष्ट मराठी कथां'च्या दुसऱ्या खंडाचे (उत्तरार्ध) प्रकाशन मिरासदार यांच्या हस्ते झाले. हे खंड पॉप्युलर प्रकाशनने काढले आहेत.

कोलारकर यांनी या कार्यासाठी घेतलेल्या परिश्रमाची आणि कष्टाची कल्पना येणार नाही. अभ्यासकांनी ज्यांच्यावर संशोधन केले त्या लेखकांना समाजाची मान्यता मिळते. मात्र, हे काम करणाऱ्या अभ्यासकाच्या कष्टाची किंमत समाजाला कळत नाही. हे काम अत्यंत मोठे आणि महत्त्वाचे असते, असे मिरासदार म्हणाले.

हे कार्य करण्याच्या निर्णयापर्यंत कसे पोहोचलो याची माहिती कोलारकर दांपत्याने दिली. गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, अरविंद गोखले या लेखकांमुळे आपण मराठीतील नवकथांच्या प्रेमात पडलो होतो. पण

या नवकथांची उत्क्रांती कशी झाली याचा अभ्यास करण्यासाठी जुन्या कथा वाचत गेलो असे ते म्हणाले.

पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ यांनी हा प्रकल्प उशिरा का होईना पण पूर्ण होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. 'मराठीतील जुन्या कथांचा कोलारकर दांपत्याइतका कोणी अभ्यास केलेला नाही. पण त्यांच्या कामाची विद्यापीठांकडून दखल घेतली नाही. काही नियम सैल करून अशा अभ्यासकांचा उपयोग करून अशा अभ्यासकांचा उपयोग करून घ्यायला हवा,' अशी अपेक्षाही भटकळ यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमानंतर अभिनेत्री ज्योती सुभाष यांनी तीन कथांचे वाचन केले.

* कृषिविषयक इंग्रजी कविता

शेत आणि शेतकरी यांच्यावर आधारित कविता लिहिणाऱ्या ना. धों. महानोरांप्रमाणेच अहमदनगरच्या प्रा. जवाहर मुथा यांनी लिहिलेल्या 'कृषी कवितां'चा इंग्रजी अनुवाद 'पोएम्स ऑन ॲग्रिकल्चर' प्रसिद्ध झाला आहे.

अहमदनगरच्या हेमंत प्रकाशनाने यावर्षी 'पोएम्स ऑन ॲग्रिकल्चर' प्रसिद्ध केला असून आपल्या शेतकऱ्याच्या व्यथेलाही 'काव्यात्म न्याय' मिळाला, असे ते म्हणाले.

ग्रामीण जीवनाशी तादात्म्य पावणारी प्रा. मुथा यांच्या कवितेची जातकुळी असून त्यामध्ये तेथील शाळा, उत्सव, बाजार, जत्रा, लावण्या इत्यादींचे सांस्कृतिक संदर्भ येतात, असे मत राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी संचालक डॉ. राजाराम देशमुख यांनी व्यक्त केले.

* देशातील पहिले संगीत संग्रहालय

साहित्य व संगीत समीक्षक प्रा. श्रीराम पुजारी यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्सच्या सहकार्यातून हिराचंद नेमचंद वाचनालयातर्फे संगीत संग्रहालय साकारण्यात आले आहे. सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्सच्या सोलापूर शाखेचे प्रमुख जयंत राळेरासकर व मोहन सोहोनी यांच्या वैयक्तिक संग्रहालयातील १० ते १५ हजार दुर्मिळ ध्वनिमुद्रिकांचा समावेश आहे. या संग्रहालयाचे उद्घाटन ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. प्रभुदेव सरदार यांच्या हस्ते झाले. यावेळी चित्रकार शिरीष घाटे यांच्या काव्य चित्रांचे प्रदर्शनही भरविण्यात आले. यावेळी विनय हर्डीकर यांचे 'पंडित कुमार गंधर्व यांची गायकी' या विषयावर व्याख्यान झाले.

प्रा. पुजारी हे साहित्य व संगीताचे खऱ्या अर्थाने 'पुजारी' होते. संगीताच्या रसिकांना प्रा. श्रीराम पुजारी संगीत संग्रहालयाच्या माध्यमातून संगीत श्रवणाचा आनंद मिळाला. संगीताशी संबंधित ग्रंथ, नियतकालिके, शोधनिबंध, कात्रणे इत्यादींचा समावेशही या संग्रहालयात असणार आहे.

* संभाजी येत्या वर्षभरात अनुवादित होणार सहा देशी भाषांमध्ये

संभाजीराजांच्या जीवनावर नवा प्रकाश टाकणारी विश्वास पाटील यांची 'संभाजी' ही महाकादंबरी लवकरच सहा भाषांमध्ये रूपांतरित होत आहे. दिल्लीमध्ये नुकत्याच भरलेल्या वर्ल्ड बुक फेअरमध्ये या कादंबरीच्या अनुवादासंबंधी बोलणी झाली असून ही पुस्तके वर्षभरात प्रकाशित होण्याची शक्यता आहेत.

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे सुमारे दोन हजार पुस्तके असणारा स्टॉल उभारण्यात आला होता. संघाचे कार्यकारिणी सदस्य सुकुमार बेरी म्हणाले की, 'संभाजी' कादंबरी हा अनेक राज्यांमध्ये कुतुहलाचा विषय आहे. म्हणूनच या कादंबरीचा अनुवाद हिंदी आणि इंग्रजीसह तेलगू, बंगाली, ओरिया आणि कन्नडमध्ये होणार आहे.

राज्य मराठी विकास संस्थेच्या मदतीने दहा कथा-कादंबऱ्या निवडण्यात आल्या. त्यामध्ये 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' (माधव कोंडविलकर), 'कल्याणी' (ज्योत्स्ना देवधर), 'करुणाष्टक' (व्यंकटेश माडगूळकर), 'दिवसेंदिवस' (शं. ना. नवरे), 'रमाबाई रानडे काळ व कर्तृत्व', 'रोहिणी' (केशव केळकर), 'टिकलीएवढं तळं' (निर्मला देशपांडे) आणि 'एका श्वासाचं अंतर' (आंबिका सरकार) यांचा समावेश आहे.

* धनंजय व चंद्रकांत आता वासंतिक विशेषांक

मराठी साहित्य संस्कृतीत एक जमाना असा होता की ज्यावेळी दिवाळी अंकांइतकेच वासंतिक विशेषांकांनाही महत्त्व होते. एप्रिल-मे महिन्यांच्या सुट्टीत वासंतिक विशेषांक प्रकाशित होत असत.

धनंजय व चंद्रकांत हे लोकप्रिय अंक यावर्षी वासंतिक विशेषांक प्रसिद्ध करून पुन्हा एकदा ही प्रथा सुरू करत आहेत.

या अंकात प्रा. अनंत मनोहर, नारायण धारप, प्रा. मधुकर तोरडमल, डॉ. बाळ फोंडके, प्रा. गिरीश जाखोरिया, प्रा. मिलिंद जोशी, जोसेफ तुस्कानो, चित्रकार बी. आर. कुलकर्णी या प्रथितयश लेखकांसह अनेक नवोदित लेखकांचे साहित्य वाचावयास मिळेल.

* बायबलचे भाषांतर

ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर हे सध्या ख्रिश्चन बांधवांचा पवित्र ग्रंथ बायबलचे भाषांतर पूर्ण करत आहेत.

सुमारे वर्षभरापूर्वी हाती घेतलेल्या या पुस्तकाची फक्त प्रस्तावना बाकी आहे. अशी माहिती देऊन पाडगावकर म्हणाले, ''बायबल मला एक महान काव्य वाटते. ते कोणी लिहिलेय, याची माहिती उपलब्ध नाही; त्याअर्थी ते अपौरुषेय असावे. माझ्याकडे भाषांतर करण्याची वृत्ती आहे; पण मी सांप्रदायिक

नाही. अत्यंत असांप्रदायिक दृष्टिकोनातून मी अनुवादाचे हे काम केले. तेव्हा मला मोठा अध्यात्मिक अनुभव प्रत्ययास आला. कविता सुचत नाही; तेव्हा मी अभिजात कलाकृतींची भाषांतरे करतो.

संत कबीर, सूरदास, मीरा यांच्या साहित्यानंतर 'टेम्पेस्ट', 'ज्युलियस सीझर', 'रोमिओ अँड ज्युलिएट' ही नाटके झाली.

आता बायबलच्या चार अध्यायांपैकी शेवटच्याचा अनुवाद अंतिम टप्प्यात आला आहे.''

* इंग्रजीबरोबर मातृभाषाही जपा!

संपूर्ण जगातच इंग्रजीचे आक्रमण वाढत असले तरी प्रत्येकाने आपापली मातृभाषा आग्रहाने जपायलाच हवी असे मत आशियातील शिक्षणतज्ज्ञांनी मांडले आहे.

पंचविसाव्या आंतरराष्ट्रीय ग्रंथजत्रेच्या निमित्त मलेशियाच्या शिक्षणतज्ज्ञांच्या शिष्टमंडळाचे प्रमुख हिशम्मुद्दीन यांनी सांगितले की, आपली मातृभाषा व इंग्रजी यांचे व्यवस्थित शिक्षण घेतले जात नाही यामागे काही विशेष कारण नसावे. मलेशियाची तुलना आम्ही नेहमीच जपान, चीन, कोरिया, जर्मनी व फ्रान्स यांच्याशी करतो. मात्र हे देश स्वतःची मातृभाषा जपण्यासाठी, तिचा वापर होण्यासाठी जसे आग्रही प्रयत्न करतात, तसे प्रयत्न मलेशियात होणे गरजेचे आहे.

दक्षिण कोरियात ४० दशलक्ष लोक राहतात. परंतु या लोकसंख्येच्या तुलनेत त्या, देशात दरवर्षी ०.१ टक्का म्हणजेच ४० हजार पुस्तके प्रकाशित होतात. त्यातील ७० टक्के पुस्तके ही सर्वसामान्य विषयांवरच असतात असे सांगून हिशम्मुद्दीन म्हणाले की, मलेशियामध्ये दरवर्षी फक्त ६५०० पुस्तकेच प्रकाशित होतात.

* मराठी अनुवाद अकादमीचा प्रस्ताव

मराठीतील सकस वाङ्मयाचा प्रवाह अन्य भाषांत अनुवादित स्वरूपात जावा, यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी राज्य सरकारकडे 'मराठी अनुवाद अकादमी'चा प्रस्ताव सादर केला असून अशा अकादमीच्या माध्यमातून अनुवादाचे काम कसे करता येईल, याचा आराखडा मांडला आहे.

नाशकात झालेल्या ७८व्या साहित्य संमेलनात अध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांनी मराठी साहित्य अन्य भाषांत पोहोचण्यासाठी यंत्रणा असण्याची गरज प्रतिपादित केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि सांस्कृतिक कार्यमंत्री अशोक चव्हाण यांनी याबाबत पावले टाकण्याचे आश्वासनही दिले होते; परंतु

विविध कारणांमुळे यासंदर्भात हालचाल थंडीच राहिली. सोलापुरात झालेल्या ७९व्या साहित्य संमेलनातही हा विषय चर्चेला आला. त्यावेळी या कामासाठी साहित्यिकांनीच आराखडे, कल्पना सरकारकडे मांडाव्यात असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले होते. या पार्श्वभूमीवर कर्णिक यांनी हा प्रस्ताव सरकारला सादर केला आहे.

इतर राज्य सरकारे त्यांच्या भाषेतील पुस्तके अन्य भाषांत, विशेषतः हिंदीत अनुवादित करीत असतात. त्याचा मोठा फायदा लेखकांना होतो. तोच कित्ता आता महाराष्ट्र सरकारने गिरवायला हवा, असे कर्णिक यांनी नमूद केले. मराठी साहित्याचा अन्य भाषांत अनुवाद, त्याचे प्रकाशन, वितरण, विक्री, प्रचार, प्रसिद्धी ही अकादमीची प्रमुख उद्दिष्टे असावीत. ही अकादमी शिक्षण वा सांस्कृतिक खात्याच्या अखत्यारीत असावी; मात्र तिला पुरेशी स्वायत्तताही असावी. कुठल्याही अन्य संस्थांशी ती जोडू नये, अशा सूचना प्रस्तावात आहेत, असे कर्णिक यांनी सांगितले.

विविध भाषांची जाण असलेल्या विद्वान व्यक्तीकडे अकादमीचे प्रमुखपद, त्याच्या हाताखाली प्रमुख संपादक, अनुभवी अनुवादक, तसेच अनुवाद, भाषा साहित्य, समीक्षा, अन्य भाषा यांचे ज्ञान असलेले अशासकीय सदस्य अशी या अकादमीची रचना असावी. साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोश मंडळ, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था आणि शिक्षण विभाग यांचे प्रतिनिधीही अकादमीचे सदस्य असावेत, असा कर्णिकांचा प्रस्ताव आहे. अकादमीसाठी सरकारनेच जागा व मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, असे सुचवितानाच, तिचा प्रशासकीय कारभार सांभाळणारी यंत्रणा कशी असावी, याचाही स्थूल आराखडा कर्णिक यांनी मांडला आहे.

* बंगाली लोकसंगीताचा प्रवास

बंगालचे लोकसंगीत, तेथील संगीतकारांमध्ये असलेल्या रवींद्र संगीताचा वारसा आणि त्या संगीतातील गोडवा यांचा एक अद्‌भुत प्रवास 'नॉस्टेल्जिया'च्या रूपाने उलगडला.

बंगाली लोकसंगीतातून उलगडत जाणाऱ्या संगीताच्या रचना आणि त्यातील गोडवा ही बंगाली संगीतकारांच्या एका प्रतिभावंत पिढीने हिंदी चित्रपट संगीताला दिलेली देणगीच. या संगीतकारांच्या हिंदीतील रचना आणि त्यांच्या मूळ बंगाली लोकसंगीत, आधुनिक संगीत आणि रवींद्र संगीतातील रचना यांच्या नात्यावर आधारित 'नॉस्टेल्जिया' या कार्यक्रमाचे आयोजन आशय फिल्म क्लबच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमात या संगीतकारांच्या रचना सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्सच्या सुरेश चांदवणकर यांनी श्रोत्यांना ऐकविल्या.

पंकज मलिक, अनिल विश्वास, सचिनदा आणि पंचम यांसारखे पितापुत्र, हेमंतकुमार या दिग्गज संगीतकारांनी बंगाली संगीताचा वापर करून अनेक अविट गोडीची गाणी हिंदी चित्रपटात दिली. आज अनेक वर्षांनंतरही त्यांच्या गाण्यांची गोडी कायम आहे. त्यांच्या संगीतात त्यांनी बंगाली लोकसंगीत, रवींद्र संगीत आणि आधुनिक गान यांचा मोठ्या खुबीने वापर केला, त्यांच्या या कारकिर्दीचा धावता आढावा आणि मूळ बंगाली संगीताची चाल, त्या चालीचा हिंदी चित्रपटात त्यांनी केलेला वापर याचा समावेश या कार्यक्रमात होता.

रवींद्रनाथांनी त्यांच्या ८० वर्षांच्या आयुष्यात सुमारे दोन हजार गीते लिहिली. त्यांच्या या गीतांत सणांच्या वर्णनांपासून ते तारुण्याच्या चैतन्यापर्यंत अशी अनेक गीते आहेत. त्यांची ही गीते रवींद्र संगीत म्हणून ओळखली जातात. त्यांच्या संगीताचा मोठा प्रभाव या सर्वच संगीतकारांवर जाणवतो. अगदी अनिलदांनी 'अंगुलमाल' या चित्रपटात दिलेल्या 'ओ मोरे चंचल नयना...' या गाण्यापासून ते हेमंत कुमार आणि आर. डी. बर्मन यांनी त्यांच्या चित्रपटात दिलेल्या गाण्यांपर्यंत हा प्रवास पोहोचतो. रवींद्राच्या संगीतात वाद्यांचा अनावश्यक वापर टाळलेला दिसतो; मात्र या संगीतकारांनी त्याचे 'ऑर्केस्टेशन' करून त्या गाण्यांना आणि चालींना एक वेगळी उंची दिली. ती गाणी ऐकतांना जुन्या जमान्यांची याद ताजी होत होती.

* भक्तिकोशाचा पाचवा खंड

आदित्य प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने 'भारतीय तीर्थक्षेत्रे व मंदिरे' हा भक्तिकोशाचा ५ वा खंड करवीरपीठाचे शंकराचार्य विद्या नृसिंह भारती यांच्या हस्ते ३० मार्च रोजी प्रकाशित होणार आहे.

या प्रसंगी भक्तिकोश समितीचे अध्यक्ष ज्योतिर्भास्कार जयंत साळगावकर आणि प्राचार्य शिवाजीराव भोसले उपस्थित राहणार आहेत. या सर्व खंडांचे संपादन शंकर अभ्यंकर यांनी केले आहे. तब्बल १२ वर्षांनंतर प्रकाशित होणाऱ्या पाचव्या खंडाची प्रतीक्षा अनेक भक्त करीत असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

या पूर्वीचे पहिले तीन खंड भारतीय आचार्य हा १९९६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. या खंडामध्ये वैदिक कालातील ऋषीमुनींपासून आदी शंकराचार्यांपर्यंत अनेक आचार्यांच्या तत्त्वज्ञानाची माहिती देण्यात आली आहे. त्याचबरोबर यज्ञसंस्थेचा इतिहास यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. द्वितीय खंडामध्ये भारतीय संतांबद्दल माहिती देण्यात आली आहे. तृतीय खंडामध्ये 'भारतीय संप्रदाय' या विषयावर सविस्तर माहिती देण्यात आली आहे. तर, चौथ्या खंडामध्ये भारतीय उपासना या खंडामध्ये हिन्दू धर्माचे स्वरूप, धर्माची वैशिष्ट्ये यांचे सविस्तर विवेचन देण्यात आलेले आहे. तर, प्रकाशित होणाऱ्या पाचव्या खंडामध्ये भारतीय तीर्थक्षेत्रे आणि मंदिरे या विषयावर सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. भारतातील चारही दिशांची तीर्थक्षेत्रे आणि मंदिरे यांच्याबद्दलचे ऐतिहासिक संदर्भ, त्यांच्या वास्तुकलेसंदभर्जतचे तपशील, त्या ठिकाणच्या प्रवास सुविधा, राहण्याची सोय अशी सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. ❐

विशेष वार्ता

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे आयोजित जगप्रसिद्ध लेखिका तस्लिमा नासरीन यांचा पुणे-कोल्हापूर दौरा

लज्जा, आमार मयेबेला, निर्वाचित कलाम, अशा एकापेक्षा एक अत्यंत गाजलेल्या व तितक्याच वादग्रस्त पुस्तकांच्या निर्भीड व बंडखोर लेखिका तस्लिमा नासरिन यांचा दिनांक ९, १० व ११ मार्च रोजी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे पुणे-कोल्हापूर दौरा आयोजित करण्यात आला होता.

तस्लिमा नासरिन यांच्या सर्व पुस्तकांच्या मराठी अनुवादाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊसकडे आहेत. पुणे व कोल्हापुरात तसलिमांचे 'माय स्ट्रगल' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

दिनांक ९ मार्च रोजी तसलिमा नासरिन यांचे सकाळी कोलकत्त्याहून पुणे विमानतळावर आगमन झाले. तेथून कडेकोट पोलिस बंदोबस्तात त्या कोल्हापूरला रवाना झाल्या. कोल्हापूर येथे त्याच दिवशी तसलिमांचे दोन जाहीर कार्यक्रम झाले. दुपारी 'मेहता बुकसेलर्स' येथे उपस्थित ग्राहक-वाचकांसाठी स्वाक्षरी कार्यक्रम तसेच सायंकाळी 'केशवराव भोसले सभागृहा'त जाहीर व्याख्यान या दोन्ही कार्यक्रमांना साहित्यप्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती. स्वाक्षरी कार्यक्रमासाठी काही वाचक खास सांगली, इचलकरंजी तसेच निपाणीहून आले होते. 'फ्रॉम तस्लिमा... वुईथ लव्ह' अशा शेऱ्यासह तसलिमांनी उपस्थित वाचकांना आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने भुरळ घातली.

सायंकाळी केशवराव भोसले सभागृहात तसलिमांचे 'माय स्ट्रगल' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले. सभागृह गर्दीने खचाखच भरले होते. सभागृहाबाहेर भव्य स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली होती. तेथेही साहित्यप्रेमींनी, पत्रकारांनी भरभरून हजेरी लावली. संपूर्ण कोल्हापुरात दिनांक ९ मार्च रोजी 'तसलिमा फीवर'चाच प्रत्यय येत होता.

हाच अनुभव पुण्यातही आला. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ऑफिसमध्ये पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार वाचकांनी तसेच पत्रकारांनी गर्दी केली होती. उपस्थित वाचकांशी व पत्रकारांशी थोडा संवाद साधून तसलिमांनी मेहता पब्लिशिंग हाऊसची वेबसाईटदेखील मोठ्या उत्साहाने पाहिली. प्रकाशन क्षेत्रातील एखाद्या संस्थेचे इतके सुसज्ज, नीटनेटके व अत्याधुनिक सोयीसुविधांनी परिपूर्ण असे ऑफीस मी प्रथमच पाहत आहे, असे कौतुकोद्गारही तसलिमांनी मेहता पब्लिशिंग हाऊसविषयी काढले.

सायंकाळी पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरातही कोल्हापूरप्रमाणेच अनुभव आला. पुण्यातील जाणकार, रसिक श्रोत्यांनी तसलिमांना ऐकण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. एका ज्वलंत लेखिकेचे तितक्याच ज्वलंत विषयावरील भाषण पुणेकरांना पुरेपूर प्रभावित करून गेले. तसलिमांना भेट म्हणून 'पैठणी' देण्यात आली.

या प्रसंगी व्यासपीठावर मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता, सुनील मेहता, डॉ. मृणालिनी गडकरी, लीना सोहोनी तसेच सुप्रिया वकील आदी उपस्थित होते.

दिनांक ११ मार्च रोजी तसलिमांचा 'पुणे दर्शन'चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात केळकर संग्रहालय, शनिवारवाडा, आगाखान पॅलेस आणि 'आयुका' या खगोलभौतिकीय केंद्राचा समावेश होता. यात तसलिमांना 'आयुका' हे केंद्र अधिक भावले. 'आयुका'चे संचालक आणि ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. नरेश दधिच स्वत: तसलिमांचे स्वागत करण्यासाठी जातीने हजर होते. डॉ. दधिच यांनी तसलिमांना आयुका हे केंद्र स्थापन करण्यामागचा उद्देश समजावून सांगितला. दोन वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंतांची ही भेट अविस्मरणीय ठरली.

कोल्हापूर-पुण्याच्या या सर्व कार्यक्रमांना तसेच गाठीभेटींना आपल्या स्मृतीसंपुटात साठवून तसलिमा दिनांक ११ मार्च रोजी सायंकाळी कोलकात्याला रवाना झाल्या.

❒

विशेष वार्ता

मेहता पब्लिशिंग हाऊस फौंडेशनचे २००५ सालचे 'स्वामी'कार रणजित देसाई' पुरस्कार जाहीर

संदीप खरे

अपर्णा वेलणकर



डॉ. रणजित मिरजे

मेहता पब्लिशिंग हाऊस फौंडेशनतर्फे पद्मश्री रणजित देसाई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारे २००५ सालचे पुरस्कार जाहीर झाले असून हे पुरस्काराचे सातवे वर्ष आहे.

फौंडेशनचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी दिनांक १५ मार्च रोजी पत्रकारपरिषदेत पुरस्कारविजेत्यांची घोषणा केली.

'मौनाची भाषांतरे' या कवितासंग्रहाबद्दल संदीप खरे, 'लेडीज कूपे' या अनुवादित पुस्तकासाठी 'अपर्णा वेलणकर' तर 'दक्षिणायन : केपहॉन ते कॅरेबियन' या पुस्तकासाठी डॉ. रणजित मिरजे यांची 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कारासाठी निवड झाली.

संदीप खरे यांना रुपये सहा हजार आणि सन्मानचिन्ह तर वेलणकर आणि मिरजे यांना प्रत्येकी पाच हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्री. खरे यांच्या 'मौनाची भाषांतरे' या कॉन्टिनेन्टल प्रकाशनातर्फे प्रकाशित झालेल्या कवितासंग्रहाची एकाच वर्षात चौथी आवृत्ती निघाली. अपर्णा वेलणकर या आघाडीच्या मराठी अनुवादक असून अरुंधती रॉय यांच्या 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या कादंबरीच्या अनुवादासाठी त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला आहे. वैद्यकीय पदवी घेतलेले डॉ. रणजित मिरजे यांनी 'दक्षिणायन' प्रवासवर्णन लिहिले असून अनेक वृत्तपत्रांमध्ये अर्थविषयक लिखाणही केले आहे.

पुरस्कार प्रदान समारंभ पद्मश्री रणजित देसाई यांच्या स्मृतिदिनी, शनिवार दिनांक ८ एप्रिल २००६ रोजी कोल्हापूर येथे राजर्षी शाहू स्मारक भवनात संपन्न होईल.

विशेष वार्ता

शंकर पाटील यांच्या सर्व कथासंग्रहांच्या प्रकाशनाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊसकडे

मराठी साहित्यसृष्टीत 'ग्रामीण कथाकार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शंकर पाटील यांच्या सर्व कथासंग्रहांच्या पुनर्प्रकाशनाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊसकडे आले आहेत.

मूळ कोल्हापूरचे असणारे शंकर पाटील यांचा पहिला कथासंग्रह १९५८ मध्ये 'वळीव' या नावाने प्रसिद्ध झाला. त्यानंतर भेटीगाठी (१९६०), आभाळ (१९६१), 'धिंड' (१९६२), 'ऊन' (१९६३), 'वावरी शेंग' (१९६३), 'खुळ्याची चावडी' (१९६४), 'पाहुणी' (१९६७), 'फक्कड गोष्टी' (१९७३), 'खेळखंडोबा' (१९७४), 'ताजमहालमध्ये सरपंच' (१९७७) इ. कथासंग्रह खूप गाजले. पाटील यांच्या 'वळीव', 'भेटीगाठी', 'आभाळ', 'धिंड' आणि 'ऊन' या पाच कथासंग्रहांना महाराष्ट्र राज्याची पारितोषिके मिळाली.

कथासंग्रहांसोबतच पाटील यांनी अनेक वगनाट्ये तसेच चिटपटकथाही रचल्या. गल्ली ते दिल्ली, कथा अकलेच्या कांद्याची तसेच लवंगी मिरची कोल्हापूरची ही वगनाट्ये विशेष गाजली. पिंजरा या राष्ट्रीय पुरस्कारविजेत्या मराठी चित्रपटाची मूळ पटकथा शंकर पाटलांनीच रचली होती.

अस्सल ग्रामीण कोल्हापूरी बाज असणाऱ्या शंकर पाटलांच्या कथा नव्या स्वरूपात वाचकांपुढे आल्यास त्यांना पुन्हा मोठा प्रतिसाद मिळेल असा विश्वास मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता यांनी व्यक्त केला.

❐

मार्गदर्शनपर पुस्तके



मंत्र श्रीमंतीचा

श्रीमंत व्हायचंय? मग हा मंत्र तुमच्याकडे हवाच!

श्याम भुर्के

१३० रु.

चला!उठा!कामाला लागा

स्वतःला टप्प्याटप्प्याने ओळखत, स्वतःतले दोष बाजूला करत,गुणांना उजळवत यश कसे मिळवायचे याचे प्रात्यक्षिकांसह सहज सोपे मार्गदर्शन

स्वाती-शैलेश लोढा
अनु. अंजनी नरवणे

१२०रु.



द मॅजिक ऑफ थिंकिंग बिग

जगप्रसिद्ध डेव्हिड जोसेफ श्वार्ट्झ यांचे जगभरातल्या लक्षावधी लोकांच्या जीवनात आश्चर्यकारक सुधारणा घडवून आणणारे पुस्तक

डेव्हिड श्वार्ट्झ
अनु. प्रशांत तळणीकर

२००रु.

लोकप्रिय साहित्यकृती

स्वामी

महाराष्ट्रातल्या रसिकांना जिने मंत्रमुग्ध केले अशी मराठी अजरामर साहित्यकृती

रणजित देसाई

१६० रु.

संभाजी

अल्पावधीतच तुफान लोकप्रिय ठरलेली संभाजीराजांची चित्तथरारक, वादळी पण वास्तव गाथा

विश्वास पाटील

४८० रु.

लोकसखा ज्ञानेश्वर

ज्ञानेश्वरांच्या जीवनावरील पहिलीच वास्तववादी कादंबरी

डॉ. आनंद यादव

३५० रु.

तसलिमांच्या सान्निध्यात

मृणालिनी गडकरी

१९९४ साली श्री. अनिल मेहतांशी भेट झाली तेव्हा त्यांनी मला तसलिमा नासरिन ह्या वादग्रस्त ठरलेल्या बांगलादेशी लेखिकेच्या साहित्याचा बंगालीतून मराठीत अनुवाद करण्याविषयी विचारले तेव्हापासून आम्ही सर्वच त्यांच्या भेटीची अपेक्षा करत होतो. श्री. मेहता हे तसलिमांच्या साहित्याच्या मराठी अनुवादांचे एकमेव प्रकाशक आहेत. आपला देश सोडून तसलिमांना परदेशात राहावे लागत असले तरी त्या मधूनमधून कोलकात्याला येतात. त्या कोलकात्याला आल्या असताना श्री. मेहतांनी त्यांची भेट घेऊन त्यांना पुणे भेटीचे आमंत्रण दिले होते. पण त्यांच्यावर असलेल्या निर्बंधांमुळे त्या वेळी ते शक्य झाले नाही. पण ह्या वेळी मात्र ९ मार्चला कोल्हापूर आणि १० व ११ मार्च पुणे असा भेटीचा कार्यक्रम फार सुरेखपणे पार पडला. हे तीन दिवस सतत त्यांच्याबरोबरच असल्याने मला त्या समजल्या, भावल्या आणि आनंद देऊन गेल्या.

पुण्यात उतरताच पुण्याच्या हिरवाईने त्यांना आकर्षित केले. मोठी मोठी झाडे, अशोक, वड, गुलमोहर त्यांना भावून गेले. 'हे जपलंच पाहिजे', असे त्या म्हणाल्या. ११ तारखेच्या विद्यापीठ आणि 'आयुका'च्या भेटीतही झाडे, फुले ह्याकडे त्यांचे लक्ष होतेच. 'आयुका'चा रम्य परिसर त्यांना लोभावून गेला. 'फारच सुंदर' असे त्या बरेच वेळा म्हणाल्या. पुण्याच्या टेकड्यांवरही बांधकाम होते आहे हे पाहून त्या चुकचुकल्या. 'राजा केळकर संग्रहालया'तील हस्तिदंती वस्तू पाहून त्या चटकन म्हणाल्या, 'किती हत्ती ह्यासाठी मारले गेले असतील नाही!' ह्यातून पर्यावरणाचा विचार करणाऱ्या तसलिमा मला जाणवल्या.

पुण्यातील बहुसंख्य स्त्रिया ह्या सायकल, स्कूटर्स आणि गाड्या चालवतात हे बघून त्यांना खूप नवल वाटले. कोलकात्यात अशा स्त्रियांची संख्या फारच कमी आहे, असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील बहुसंख्य स्त्रिया ह्या नोकरी किंवा काही व्यवसाय करतात, सुशिक्षित स्त्रियांची संख्याही नजरेत भरण्यासारखी आहे, महाराष्ट्रातील स्त्रिया वैचारिक दृष्ट्या पूर्वीपासूनच पुढारलेल्या आहेत, पूर्वीपासूनच

नऊवारी साडी नेसून महाराष्ट्रीय स्त्री सायकलचा वापर करत होती, ह्या गोष्टी ऐकून त्यांना आश्चर्य वाटले. मेहतांच्या कोल्हापूर आणि पुणे येथील ऑफिसमध्ये काम करणाऱ्या मुलींची संख्या पाहून आम्ही सांगितलेल्या गोष्टींबद्दल त्यांना खात्रीच पटली. शिवाय अनुवाद करणाऱ्याही सर्व स्त्रियाच होत्या. 'पैसा मिळाला की स्त्री स्वतंत्र होते असं नाही म्हणता येत. तिच्या मनासारखं काम करता आलं पाहिजे.' असे त्यांचे म्हणणे होते. महाराष्ट्रात तेही घडते आहे, हे त्यांना भेटायला आणि मुलाखत घ्यायला आलेल्या स्त्रियांवरून कळले.

संगीत, कला, साहित्य ह्यासाठी कोल्हापूर प्रसिद्ध आहे, तर पुणे महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आहे, ह्याचा प्रत्ययही त्यांना आला. कोल्हापूरचे सुंदर नक्षीकाम केलेले दागिने, चांदीच्या शोभिवंत वस्तू त्यांना मनापासून आवडल्या. पुण्याच्या 'राजा केळकर संग्रहालया'त तसलिमा रमून गेल्या. एका माणसाने एवढ्या वस्तू कशा गोळा केल्या असतील ह्याचे त्यांना आश्चर्य वाटले. सुंदर कोरीव काम केलेला अर्जुनाचा लाकडी रथ, घोडागाडी, पालखी, तऱ्हेतऱ्हेचे अडकित्ते, कोरीव काम केलेले दरवाजे, पैठण्या, निरनिराळ्या विळ्या, पितळी व तांब्याची भांडी, जेवणासाठी वापरावयाचे पितळी केळीचे पान अशा अनेक गोष्टींनी त्यांचे मन आकर्षून घेतले. पण त्यांना खरी ओढ होती ती माणसांना भेटण्याची. कारण शहर म्हणजे त्यातील विशिष्ट इमारतीक नव्हेत, मोठे रस्ते नव्हेत, तर माणसे महत्त्वाची असे तसलिमांना वाटते. माणसांच्या भेटीतून त्यांना त्या विशिष्ट प्रदेशातील संस्कृतीचा अंदाज येतो. कोल्हापूर आणि पुणे ह्या दोन्ही शहरांतील सुसंस्कृतपणाचा प्रत्यय त्यांना माणसांच्या भेटीतून उत्तम रीतीने आला. त्यांनी ह्या दोन्ही शहरांत 'माय स्ट्रगल' (माझा संघर्ष) ह्या विषयावर व्याख्याने दिली त्या व्याख्यानांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. पुस्तक खरेदी करून त्यांची स्वाक्षरी घेणाऱ्यांची संख्याही लक्षात येण्याइतकी प्रचंड होती. पुण्यात व्याख्यानानंतर त्यांना अनेक प्रश्न विचारण्यात आले. बहुसंख्य प्रश्न श्रोत्यांचे सखोल ज्ञान व सुसंस्कृतपणा दर्शवणारे होते. त्यामुळे तसलिमांनीही त्यांना अगदी मनापासून उत्तरे दिली. श्रोत्यांचा उत्साही प्रतिसाद त्यांना हलवून गेला.

'आयुका'चे प्रमुख डॉ. दधिच ह्यांची भेटही तसलिमांच्या कायमची स्मरणात राहील. डॉ. दधिच ह्यांनी स्वत: तसलिमांचे स्वागत केले आणि त्यांना आपल्या आंतरराष्ट्रीय केंद्राची सविस्तर माहिती दिली. त्यांचे शांत, अगत्यशील बोलणे, तसलिमांच्या प्रश्नांना दिलेली उत्तरे, इराणमधून आलेल्या प्राध्यापकांशी करून दिलेली ओळख, बंगालमधून आलेल्या विद्यार्थ्यांची तसलिमांशी घडवून आणलेली भेट ह्या सर्वांनी तसलिमा प्रभावित झाल्या. डॉ. दधिच ह्यांना भेटण्यापूर्वी 'आपण ह्या केंद्रात का चाललोय?' अशी विचारणा करणाऱ्या तसलिमा तेथून बाहेर पडताना म्हणाल्या, 'बरं झालं आपण इथं आलो ते! इथं यायलाच हवं होतं.

परिसर, वातावरण आणि इथली माणसं सर्वच वंडरफुल. फार आनंद झाला मला इथं येऊन आणि डॉ. दधिचना भेटून. रिअली वंडरफुल.'

आपल्या पाहुण्यांना आपल्या संस्कृतीची ओळख करून द्यायची म्हटले म्हणजे खाद्यसंस्कृती टाळता येतच नाही. तसलिमांना मासे आणि अड्डा प्रिय असणार हे मी ओळखून होतेच. पण बंगालमध्ये किंवा बांगलादेशात मोठमोठ्या नद्यांतील आणि तळ्यांतील मासे आवडीने खाल्ले जातात. आपल्याकडे मासे मिळतात ते समुद्राचे. गंगा, ब्रह्मपुत्रासारख्या नद्या आपल्या महाराष्ट्रात कुठल्या? मी ह्याची कल्पना देताच त्या म्हणाल्या, 'मी जगभर फिरलेय. तेव्हा मला समुद्राचे मासे खाण्याची सवय झालीय. आवडतातही आता.' मी सुटकेचा नि:श्वास टाकला. महाराष्ट्रातील ब्राह्मण आणि मेहतांसारखी गुजराती मंडळी निरामिषच जेवण घेतात हे ऐकून त्या थक्कच झाल्या. त्यांना मी सांगते ते खरेच वाटेना. कोल्हापुरी तांबडा आणि पांढरा रस्सा, मटण, कोळंबीची भजी ह्यांचा त्यांनी कोल्हापूरला मनापासून आस्वाद घेतला. पण पुण्यात मेहतांनी त्यांना अस्सल महाराष्ट्रीय पिठलं-भाकरी खिलवली आणि त्यांनाही ती आवडली. त्यांची तक्रार एकच होती की तुमचे तिखट पदार्थही गोड असतात. मोहरी चढवून पदार्थात वापरणाऱ्या बंगाली जेवणाच्या तिखटपणाशी कोण स्पर्धा करणार! मेथी पुरी व बाकरवडी मात्र आवडली. बोलता बोलता स्वयंपाक करायला आवडत असल्याचे त्यांनी मला सांगितले. पण एकंदरीत बंगाली पदार्थांच्या पलीकडे जाण्यास त्या फारशा उत्सुक नव्हत्या. राहता राहिला अड्डा. तो मात्र आम्ही जमेल तेव्हा मारून घेतला. अड्डा मारणे म्हणजे मजेत गप्पागोष्टी करणे. बंगाल्यांच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग.

मी तसलिमांचा उल्लेख बंगाली म्हणून करते आहे कारण बंगाल आणि बांगलादेश ह्यांच्या भाषेत, संस्कृतीत फरक असा नाहीच. म्हणूनच बांगलादेशात जाऊ न शकणाऱ्या तसलिमा कोलकात्यात राहणे पसंत करतात. कारण तेथे त्या स्वत:ची भाषा बोलू शकतात, मित्रमंडळी गोळा करून अड्डा मारू शकतात, भारतीय अभिजात संगीत ऐकू शकतात, रवीन्द्र संगीताचा मनसोक्त आस्वाद घेऊ शकतात. माणसाला जगण्यासाठी ह्या सर्व गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते. आपण आपल्या देशात राहत असताना ह्या गोष्टींची किंमत नाही कळत. तसलिमांचे दु:ख, तळमळ कळायला त्यांच्या वंशाचेच व्हायला हवे.

रांगोळ्या, रवीन्द्र-संगीत, फुलांची उधळण– असे आम्ही तसलिमांचे स्वागत केले. मेहतांनी पैठणी, कोल्हापुरी साज, चांदीची सुबक परडी देऊन त्यांना पुरे महाराष्ट्रीयच करून टाकले. पण विमानतळावर मी दिलेली मोगऱ्याची फुले आणि 'आनंदबाजार'चा ताजा अंकही त्यांना भावून गेला. परंपरा मोडण्यासाठी मी एक मंगळसूत्र घेऊन घालणार आहे, असे त्या म्हणाल्या तेव्हा मी त्यांना मंगळसूत्र भेट म्हणून दिले. 'ओ! आय ॲम रिअली हॅपी,' असे त्या पुन्हा पुन्हा म्हणाल्या आणि ते त्यांनी गळ्यात घालूनही टाकले. कोल्हापुरी साज, पैठणी ही महाराष्ट्राची खासियत कशी आहे, पैठणी कशी विणली जाते हे सांगताच त्या भारावून गेल्या आणि 'एवढं कशाला?' असे म्हणाल्या. त्यांना थोडे दडपण आले असेलही पण हे कौतुकही त्यांना मनापासून आवडले होतेच. त्यांची बातमी प्रसिद्ध झालेल्या वर्तमानपत्रांतील बातमीची कात्रणे न नेता त्यांनी संपूर्ण वर्तमानपत्रेच नेली. येथे मला त्यांचा वेगळा दृष्टिकोन जाणवला.

आता काही खास मुद्दे. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे ऑफिस आणि मेहता पितापुत्र करत असलेले अनुवादाचे काम बघून त्या म्हणाल्या, 'प्रकाशकाचं असं ऑफिस भारतात तर सोडाच, पण मी परदेशातही पाहिलेलं नाही. मी मेहतांकडे फारसं लक्ष दिलं नव्हतं. आता मला कळतंय ते ग्रेटच आहेत.' आम्हा अनुवादकांची त्यांनी विशेष दखल घेतली नाही (मला मात्र जवळ घेऊन त्यांच्या कोलकात्याच्या घरी येण्याचे आमंत्रण दिले.) ह्याचे कारण त्या आम्हाला मेहता परिवारातीलच समजल्या असाव्यात. कारण तीन दिवस वातावरण होतेच असे उत्साहाचे, खेळीमेळीचे, नेहमीसारखेच.

पत्रकारांनी सर्व तयारीनिशी, गृहपाठ करून यायला हवे असे म्हणणाऱ्या तसलिमांना महाराष्ट्राची काहीही माहिती नव्हती. पण तीन दिवसांत त्यांना महाराष्ट्राची बरीचशी सांस्कृतिक, ऐतिहासिक, साहित्यिक, भौगोलिक माहिती द्यायचा सर्वांनीच कसून प्रयत्न केला.

तसलिमा आल्या होत्या त्या व्याख्यान देण्यासाठी. तेव्हा त्यांच्या व्याख्यानाच्या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकायलाच हवा. त्यांचे भाषण हा एक विलक्षण अनुभव होता. त्यात त्यांची परिपक्वता दिसून आली. आपल्या जीवनातील संघर्षाबद्दल बोलताना त्यांनी कुठेही संयम सोडला नाही, आपला आवाज चढवला नाही किंवा त्यांच्या छळाला, परागंदा अवस्थेला कारणीभूत असलेल्यांवर आगपाखडही केली नाही. अत्यंत शांतपणे त्यांनी आपले संतुलित भाषण वाचून दाखवले. हे भाषण विद्वज्जनांपासून सामान्यांपर्यंत सर्वांनाच प्रभावित करून गेले. आपला लढा कुठल्याही धर्मसत्तेविरुद्ध नसून जुनाट विचार, अन्याय आणि पिळवणूक ह्यांच्याविरुद्ध असल्याचे सांगून त्यांनी आपल्या लढ्याला निधार्मिकतेचे अधिष्ठान दिले आणि तो चालूच राहील असे निर्धारपूर्वक सांगितले.

मी तसलिमांना प्रथमच भेटत असले तरी त्यांच्या साहित्यातून त्यांची भेट झालीच होती. त्यांच्या गद्यसाहित्यात त्यांच्या विचारांची आणि बुद्धीची चमक दिसते तर त्यांच्या काव्यातून त्यांचे भवितव्य उलगडते. मी अनुवादित केलेले त्यांचे साहित्य त्यांच्या विशी-तिशीतील आहे. त्यांचा 'कवितासंग्रह' नुकताच प्रकाशित झाला आहे. त्यांचे अलीकडचे वैचारिक लेखन माझ्या वाचनात आलेले

नाही. हा ‘कवितासंग्रह’ वाचण्याची उत्सुकता आहे. कारण त्यातून त्यांचे बदलले भावविश्व मला समजेल.

जरी हा लेख तसलिमांवर असला तरी येथे आणखी एक उल्लेख करायलाच हवा. त्याशिवाय हा लेख पुरा होऊ शकणार नाही. श्री. अनिल मेहता ह्यांचे साहित्यप्रेम विलक्षण आहे. त्या प्रेमापोटीच ते श्रेष्ठ साहित्यिकांशी संपर्क ठेवतात. प्रसंगी मोठ्या साहित्यिकांना पुणे व कोल्हापूर येथे बोलावून त्यांचा यथोचित सत्कार करतात. हा त्यांचा छंदच नव्हे तर ‘पॅशन’ आहे. प्रकाशन व्यवसायात असून असे उपक्रम करणारे फारच थोडे! ते एकमेवच असावेत! ते अभिनंदनास पात्र आहेत.

बेताची उंची, सुबक बांधा, सावळा पण तजेलदार रंग आणि विलक्षण सुंदर आणि तेजस्वी डोळे असे तसलिमांचे व्यक्तिमत्त्व पाहणाऱ्याला आकर्षून घेते.

❐

कृतज्ञ तसलिमा

Taslima Nasrin
mehpubl@vsnl.com
Sent: **Tuesday, March**
Subject: **a word of thanks.**

Dear Mr. Anil Mehta,
I am so so happy to get your support and solidarity. Everything was so spectacular! I was so moved. I am grateful to you for the honour you have shown to me. I thank to all the members of your family and to the family of the Mehta Publishing House.
I will keep my memories of Pune and Kolapore for long long time. The love I recieved from there gives me strength and inspiration to go on writing as well as combating inequalities and injustices.
Keep in touch. I will send you the Bengali books soon.
With warm regards
taslima nasreen
www.taslimanasrin.com

तसलिमा नासरिन यांच्या ज्वलंत लेखणीतून अवतरलेली साहित्यसंपदा

लज्जा

धर्मव्यवस्थेतील मूलतत्त्ववाद्यांना हादरा देऊन अवघ्या जगभरात खळबळ निर्माण करणारी धीट साहित्यकृती

अनु. लीना सोहोनी

१२५रु.

फेरा

मातृभूमीपासून तोडल्या गेलेल्या एका स्त्रीची तडफड व्यक्त करणारी कादंबरी

अनु. मृणालिनी गडकरी

७०रु.



आमार मेयेबेला

कौमार्यातील उद्ध्वस्त भावविश्व उलगडून दाखवणारी तसलिमांची आत्मकथनपर कहाणी

अनु. मृणालिनी गडकरी

२००रु.

१२०रु.

नष्ट मेयेर नष्ट गद्य

ज्या जहाल लेखांमुळे तसलिमांना बांगलादेशातून परागंदा व्हावे लागले ते परखड लेख

अनु. मृणालिनी गडकरी

१५०रु.

निर्बाचित कलाम

स्त्रीच्या आत्मसन्मानासाठी परजलेली धारदार विचारांची, शब्दांची दुधारी तलवार

अनु. मृणालिनी गडकरी

७०रु.

निर्बाचित कविता

संवेदनशील विषयावर स्फुल्लिंगाप्रमाणे चेतवणाऱ्या भावकविता

अनु. मृणालिनी गडकरी

फरासि प्रेमिक

अनपेक्षित वळणावर सुन्न करणाऱ्या प्रखर वास्तवाशी झगडणाऱ्या एका संवेदनशील स्त्रीच्या भावविश्वाचे मनोवेधक चित्रण

अनु. सुप्रिया वकील

शांततेनं काम करा

पॉल विल्सन / अनु. सुनंदा अमरापूरकर

आपल्या कार्यालयात आपल्याला टेन्शन आणि मनःस्ताप यांच्याशिवाय काम करणे शक्य आहे.

आपण कुठल्याही कार्यालयात काम करीत असा, तेथे आपल्याला ताणतणावांपासून दूर राहून शांततेने आणि आनंदाने उत्तम प्रकारे काम करणे शक्य असते!

सुनंदा अमरापूरकर यांनी केलेला काम ॲट वर्क 'Calm at work' या पॉल विल्सन यांच्या पुस्तकाचा मराठी अनुवाद म्हणजे 'शांततेनं काम करा' हे मेहता पब्लिशिंग हाऊसचे पुस्तक.

पॉल विल्सन हे अनेक कंपन्यांचे व्यवस्थापनविषयक सल्लागार-संचालक आहेत. त्याआधी ट्रक ड्रायव्हर, लेथ मशीन ऑपरेटर, बँक क्लार्क, जाहिरातींसाठी कॉपी रायटर, शाखाप्रमुख वगैरे वेगवेगळ्या प्रकारची कामे केलेली आहेत.

आपल्या दैनंदिन कामकाजात आपल्यावर अनेक जबाबदाऱ्या असतात. अनेक कामे करायची असतात. त्या कामांना वेळेची मर्यादा असते; सहकाऱ्यांच्या आणि मानसिक जडणघडणीच्या विशिष्ट चाकोरीमुळे काही कामे आपल्याला आनंददायक वाटतात, तर काही त्रासदायक वाटतात. शिवाय आपल्या कार्यालयातले राजकारणही कधी कधी आपल्याला तापदायक व असह्य वाटते. आपला बॉस सर्जनशील, खडूस किंवा दिशाहीन यापैकी कशा प्रकारचा आहे याबाबत आपल्या कल्पना व वस्तुस्थिती यात अंतर राहते. आपली वृत्ती सकारात्मक आहे की नकारात्मक यावर आपण कुठल्याही कामाकडे कसे बघतो हे ठरते. असे खूप काही दैनंदिन जीवनात चालू असते आणि त्यावर आपल्याला शांतता वा ताणतणाव जाणवत असतात. ताणतणाव सतत राहिला तर रक्तदाब, नैराश्य, अस्वस्थता, डिप्रेशन वगैरे व्याधींनाही अवसर मिळतो.

आपण असे कायम तणावाखाली जगत असलो तर ती काही सुखद,

निकोप, सुंदर गोष्ट नाही. आनंद, सुख, मन:शांती, उत्साह यांना जर जीवनात स्थान नसेल तर मग जगायचे कशासाठी असा प्रश्न पडेल. तणावमुक्त, शांत, चित्त, स्वस्थ जीवन हा आपला अधिकार आहे. आणि तो आपल्या आटोक्यात आहे; काही पथ्ये पाळली तर आपल्याला आपले तणाव दूर करून शांत-सुखी-सर्जनशील जीवन जगण्याची सिद्धी प्राप्त होऊ शकेल.

हेच पटवून देण्याचा प्रयत्न पॉल विल्सनने 'काम ॲट वर्क' या पुस्तकाद्वारे केला आहे. त्यासाठी सेल्फ पर्सेप्शन थिअरीचा आधार घेऊन प्रथम आपण आपल्यावरील ताणाचे प्रमाण जाणून घ्यायला हवे.

श्वसनाला त्रास होणे, छातीत दुखणे, थंड घाम येणे, जुलाब-बद्धकोष्ठ होणे, अशक्तपणा वाटणे, हातबोटे गार पडणे, डोके दुखणे, अजीर्ण होणे, झोप न येणे, कंबर दुखणे, भूक न लागणे, पोट बिघडणे, मान व खांदे आखडणे, थकवा जाणवणे, हातपाय कापणे, राग येणे, भीती वाटणे, वैफल्य येणे, एकाग्रता न साधणे, चिडचिड होणे, आवाज सहन न होणे, निराशावादी विचार मनात येणे, संशयीपणा-शंकेखोरपणा, भविष्याची चिंता वाटणे... अशी काही लक्षणे तुम्हाला जाणवतात का? किती तीव्रतेने ती जाणवतात? रोजच्या रोज? आठवड्याने की कधीतरी? क्वचित?

अंतर्मुख वा बहिर्मुख, आशावादी वा निराशावादी, सकारात्मक वा नकारात्मक, उत्साही वा उदासीन, अशी दोन टोकांमध्ये आपले स्वभावविशेष आंदोलित होत असतात. आपल्या कामाच्या जागी आपण सतत तणावाखाली राहावे हे काही श्रेयस्कर नाही.

कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू, घटस्फोट, नोकरी सोडावी लागणे, नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी मिळणे, कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांशी मतभेद, बॉसशी संघर्ष, आर्थिक अडचणी, जोडीदाराने नोकरी सोडणे वा धरणे, राहण्याची व्यवस्था बदलणे, कोर्टकचेरी, शारीरिक अस्वस्थता, नात्यांमध्ये ताणतणाव, गरोदरपण, ताटातूट, असाध्य आजार– अशा काही घटना तुमच्या जीवनात घडून गेल्या वा घडण्याची शक्यता आहे का?

या अशा ताणतणावाच्या प्रसंगी तुमचे वर्तन कसे असते हे तुमच्या स्वभाववृत्तीवर ठरते; दृष्टिकोनावर ठरते. त्यामुळे आपल्या स्वभावाचेही आकलन आपल्याला अचूक असणे उपयुक्त ठरते.

अंतर्मुख वा बहिर्मुख, आशावादी वा निराशावादी, सकारात्मक वा नकारात्मक, उत्साही वा उदासीन, अशी दोन टोकांमध्ये आपले स्वभावविशेष आंदोलित होत असतात. आपल्या कामाच्या जागी आपण सतत तणावाखाली राहावे हे काही

श्रेयस्कर नाही. आपल्या कामाच्या जागी आपणास शांतता व समाधान मिळवण्याचा पूर्ण हक्क आहे. आपल्याला पाहिजे ते मागण्याचा, आपल्या कार्यकक्षेत बसणारे निर्णय घेण्याचा, आपल्या परिश्रमांचा यथायोग्य मोबदला मिळवण्याचा, आपला खाजगीपणा जपण्याचा, विशिष्ट कामाला नकार देण्याचा हक्क आपल्याला आहे. मूलभूत मानवतेने दिलेले हे हक्क आहेत. कायद्याची त्यासाठी गरज नाही.

त्याचबरोबर आपल्या काही जबाबदाऱ्याही आहेत. आपलं प्रत्येक काम अर्थपूर्ण, मनाला आनंद देण्याइतकं परिपूर्ण व्हायला हवं, त्या भावनेनं ते करायला हवं, आपले शंभर टक्के श्रम त्याला असायला हवेत.

या दृष्टीने आपलं आयुष्य समृद्ध करणारी पाच तत्त्वं नेहमी समोर असावी.

१. नेहमी उजळ बाजूकडे लक्ष द्या. दुसऱ्याच्या दोषांवर, दुर्गुणांवर लक्ष केंद्रित करू नका.

२. स्वत:ची जबाबदारी ओळखा. तुम्ही स्वस्थचित्त राहावं ही जबाबदारी तुमची आहे. इतरांची नाही.

३. प्रथम स्वत:चे काम नीट करा. जरूर तेथे नाही म्हणायला शिका.

४. आयुष्य आनंदाने जगा. ऑफिसच्या बाहेरही आनंदाचे अनेक क्षण उपभोगायला शिका.

५. तणावरहित श्वासोच्छ्वास करायला शिका. चुकीच्या श्वसनपद्धतीने तुमच्या मनावरचा ताण वाढत असतो. शास्त्रशुद्ध श्वसनाने मनाला शांतता लाभते.

आपल्या आयुष्यातल्या ताणतणावांना जन्म देणारी जागा म्हणजे आपले कार्यालय, ऑफिस किंवा घर नव्हे हे जाणून घ्या. ताण निर्माण होण्याची जागा एकच. ती म्हणजे तुमचे मन.

आपल्या आयुष्यातल्या ताणतणावांना जन्म देणारी जागा म्हणजे आपले कार्यालय, ऑफिस किंवा घर नव्हे हे जाणून घ्या. ताण निर्माण होण्याची जागा एकच. ती म्हणजे तुमचे मन. सुखशांतीचा अनुभव घेण्यासाठी तुमच्या मनालाच खरे तर तयार करा. त्यासाठी कामाच्या ठिकाणची वागणूक, कामाकडे बघण्याचा दृष्टिकोन, कामाच्या ठिकाणचे वातावरण, कामाची पद्धत, वेळेचे नियोजन आणि निर्णय घेण्याची क्षमता या सहा बाबतीत सुधारणा करण्यास वाव आहे हे समजून घ्या.

कामाच्या ठिकाणी ताण देणाऱ्या सात गोष्टी

कामाच्या ठिकाणी ताण देणाऱ्या सात गोष्टी म्हणजे **वेळ** (कालमर्यादा), **नियंत्रण**, आपण **स्वत:** (आपलं व्यक्तिमत्त्व, महत्त्वाकांक्षा, आपले भयगंड, अपराधीपणाची भावना, अहंकार, असुरक्षिततेची भावना, उद्दिष्टाबद्दलची साशंकता,

सामाजिक कारणे (स्पर्धा, संताप-क्रोध, मत्सर-द्वेष, परस्पर संबंध, सामाजिक दबाव), **परिवर्तन** (नोकरीतील पदोन्नती, कामाच्या स्वरूपातला बदल, बदललेले सहकारी, बदललेले उद्दिष्ट व लक्ष्यांक), **भौतिक कारणे** (ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषण, जलप्रदूषण, गोंगाट इ.इ.), **आपल्या सवयी व राहणीमान** (खाणेपिणे, व्यसने, व्यायाम, दिनक्रम, आवडीनिवडी यावरून इतरांशी उडणारे विसंवादी खटके).

तुमच्या मन:स्वास्थ्यावर व शांततेवर आघात करणारे हे सर्व घटक एकदा जाणून घेतले तर त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कोणती उपाययोजना करावी लागेल हे समजावून घेणे सोपे जाईल.

या पुस्तकाचा उत्तरार्ध अशा उपाययोजना सुचवणारा आहे.

अग्रक्रमाच्या गोष्टी

त्यासाठी प्रथम आपल्या जीवनातल्या अग्रक्रमांची निश्चिती करा.

१. आपल्या कामात यशस्वी होणे. २. त्यातून भरपूर अर्थप्राप्ती करणे. ३. आपल्या क्षेत्रात सर्वोच्च पद गाठणे. ४. स्वत:ची वास्तू, स्वत:चे वाहन संपादन करणे. ५. कुटुंबाची योग्य व्यवस्था. ६. सहकारी/भागीदार यांच्याबरोबर सामंजस्याचे संबंध. ७. नातलगांशी जिव्हाळ्याचे संबंध. ८. रिकाम्या वेळेचा योग्य उपयोग- छंद,कलासाधना, पर्यटन, संवाद. ९. प्रत्येक दिवस नवीन अनुभव, नवीन आशा- उन्मेषाचा, आव्हानाचा असणे, १०. उत्तम आरोग्य राखणे. ११. मुलाबाळांशी प्रेमाचे संबंध. १२. विशिष्ट क्षेत्रातील अद्ययावत ज्ञानसाधना. १३. आध्यात्मिक साधना. प्राणायाम/योगासने.

आयुष्यात अलौकिक यश मिळवण्यासाठी अर्धजागृत मनाचा भक्कम व सक्रिय पाठिंबा हवा. कल्पनाशक्ती, पुनरावृत्ती आणि संमोहन याद्वारे अर्धजागृत मनाला कार्यप्रवण करता येते.

उद्दिष्टांच्या अग्रक्रमांची निश्चिती केल्यावरही काही बाबींना प्राधान्य देणे अपरिहार्य असते. त्याकडे पॉल विल्सन यांनी पुढे लक्ष वेधले आहे.

१. श्वसनाचे योग्य तंत्र आत्मसात करणे. सखोल श्वासोच्छ्वास करा. सावकाश श्वासोच्छ्वास करा. लक्षपूर्वक श्वसनाचा आवाज ऐका. शांत श्वसन करा.

२. तुमच्या अर्धजागृत मनाला कामाला लावा. मेंदूचा डावा भाग बुद्धी, रक्ताभिसरण, भाषा, लेखन, पृथक्करण यांच्याशी संबंधित कार्ये करतो. उजव्या भागाचे कार्य अवकाश रचना, अव्यक्त भावना, सृजनशीलता यांच्याशी संबंधित असते... आयुष्यात अलौकिक यश मिळवण्यासाठी अर्धजागृत मनाचा भक्कम व

सक्रिय पाठिंबा हवा. कल्पनाशक्ती, पुनरावृत्ती आणि संमोहन याद्वारे अर्धजागृत मनाला कार्यप्रवण करता येते.

३. अर्धजागृत मनाला प्रभावित करण्यासाठी लागणारी साधने चार प्रकारांत विभागता येतात.

अ. मन:चक्षूंनी पाहणे.

ब. होकारार्थी विचार करणे.

क. स्वसंमोहन आणि ध्यान

ड. स्वीकारशील वृत्ती- काल्पनिक भूमिकेत शिरण्याची कला.

४. वेळ आणि परिश्रम यांचे नियोजन करणे.

अ. वेळेचे नियोजन करण्याचा नियम

ब. परिश्रमांना कामाला लावण्याचा नियम

क. डोके वापरून काम करण्याचा नियम

ड. कामाची चालढकल टाळण्याची काही पथ्ये (कामाचे भाग पाडणे, वेळ निश्चित करणे, कामाचे खेळात रूपांतर करणे, नावडते काम आधी संपवणे, बक्षीसाची नोंद ठेवणे, शंभर टक्के प्रयत्न करणे).

य. नकार देण्यातले सामर्थ्य जाणून घ्या.

र. माहितीच्या अतिरेकाने दडपून जाऊ नका.

ल. स्वत:साठी रोज काही वेळ काढणे. त्यावेळेत स्वत:ला आनंदी करा.

कामाच्या ठिकाणी आपल्यामुळे वा आपल्या विचारांमुळे सर्वात जास्त ताणतणाव निर्माण होतात हे जाणून घ्या. त्यासाठी तुम्ही शांत, स्थिरचित्त व्हा. नियोजन करा. सकारात्मक शब्द वापरा. काळजी हटाव मोहीम चालवा, स्वभावात योग्य ते बदल घडवून आणा. आरामाचा ब्रेक घ्या.

५. वरिष्ठ वा कनिष्ठ व्यक्ती, विविध उपकरणे यावर नियंत्रण ठेवण्याची गरज आपले आयुष्य आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी शंभर टक्के प्रयत्न करणे. त्यासाठी जबाबदाऱ्यांची प्राथमिकता ठरवा.

६. कामाच्या ठिकाणी आपल्यामुळे वा आपल्या विचारांमुळे सर्वात जास्त ताणतणाव निर्माण होतात हे जाणून घ्या. त्यासाठी तुम्ही शांत, स्थिरचित्त व्हा. नियोजन करा. सकारात्मक शब्द वापरा. काळजी हटाव मोहीम चालवा, स्वभावात योग्य ते बदल घडवून आणा. आरामाचा ब्रेक घ्या.

७. आग्रही व्यक्ती, आक्रमक व्यक्ती आणि भिडस्त व्यक्ती, ग्राहकाची गरज व वृत्ती, वाटाघाटीची कला, वरिष्ठांना सांभाळणे, शांततेशी युती करणे.

८. बदल स्वीकारणे.
९. शारीरिक कारणांमुळे होणारे तणाव टाळण्याचे मार्ग
१०. त्यासाठी जीवनशैलीत बदल घडवून आणणे.
११. ध्यानसाधना करणे.
१२. शांतता केंद्रांची मदत करणे.

अशा उपायांद्वारे कामाच्या ठिकाणचे ताणतणाव दूर करणे शक्य आहे. पॉल विल्सन यांनी अत्यंत सूत्रबद्ध रीतीने त्याबाबत आपल्या युक्तिवादाची मांडणी केली आहे. जीवनविषयक दृष्टिकोनात सकारात्मक बदल घडून आणण्यासाठी या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल.

पृष्ठे : ३२० ● किंमत : २४०रु. ● सभासदांना : १८० रु. ● पोस्टेज : २०रु.

नवीन आवृत्त्या

रानफुले
वि. स. खांडेकर
७०रु.

मूनरेकर

इयान फ्लेमिंग / अनु. उदय नारकर

अंतरिक्षात मूनरेकर हे क्षेपणास्त्र सोडले जाते, आणि -

जेम्स बाँडच्या थरारकथांची लज्जत वाढवण्यात सेक्स, सॅडिझम आणि स्नॉबरी यांचा मोठा वाटा असतो असे म्हटले जाते. जेम्स बाँडच्या रूपाने गुप्तहेराचा नवाच आदर्श इआन फ्लेमिंगने निर्माण केला आणि त्याला वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. जेम्स बाँडवरील चित्रपटही गाजले आणि त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतही हेरगिरीवर आधारित चित्रपटांचा जमाना सुरू केला.

दि मूनरेकर ही जेम्स बाँड या नायकाची तिसरी थरारकथा १९५५ साली प्रसिद्ध झाली. कॅसिनो रोयाल ही त्याची पहिली कादंबरी वयाच्या ४४ व्या वर्षी त्याने लिहिलेली. तिच्यातील उच्चभ्रूंचे जग, पंचतारांकित हॉटेलमधले वास्तव्य, मद्यांचा आणि खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यातील चोखंदळपणा, निरनिराळ्या देशांतील प्रेक्षणीय स्थळांची पार्श्वभूमी, हेरगिरीतील अस्सल अनुभव, अद्ययावत शस्त्रास्त्रांचा लीलया वापर करण्याची कुशलता, सुंदर स्त्रियांना भुरळ घालण्याची किमया, उपरोधपूर्ण आणि उपहासपूर्ण शैलीतील टीकाटिप्पणी आणि रोमहर्षक कथानक उभे करण्याची सिद्धी यामुळे जेम्स बाँडच्या साहसकथांनी शीतयुद्धाच्या त्या काळात वाचकांना एका नव्या ग्लॅमरस जगात स्वैरसंचार करण्याची सुवर्णसंधी मिळवून दिली. जेम्स बाँडचा पहिला चित्रपट निघाला आणि त्यानंतर त्याच्या थरारकथांचा खप तुफान वाढला. त्याच्या यशाचा हेवा समकालीन लेखकांना वाटू लागला. या यशाने त्याची उमेद वाढवली. खरे तर तरुण वयातील अतिरिक्त मदिरापान आणि मदिराक्षींचा सहवास, अचाट खाणे आणि धूम्रपान– यामुळे त्याच्या तब्येतीवर परिणाम झाला होता; तशात १९५२ साली लेडी ॲन रोथरमेअर हिच्याशी लग्न करण्याची पाळी त्याच्यावर आली. त्याच्यापासून तिला दिवस गेल्याने तिला आपल्या नवऱ्यापासून घटस्फोट घेणे भाग पडले. या

अटीतटीच्या काळात कॅसिनो रायोलचा आराखडा त्याने तयार केला; आणि तब्येतीचे तसेच वैवाहिक जीवनातले चढउतार चालू असतानाही लेखनाचे पुढचे प्रकल्पही तो भराभर हातावेगळे करू लागला.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिश नौदलात गुप्तचर खात्यात संचालकांचा वैयक्तिक चिटणीस म्हणून त्याने काम केले; आणि कमांडर पदापर्यंत बढती मिळाल्यावर निवृत्ती स्वीकारून किमस्ली वृत्तसंस्थेच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थापकपदाची जबाबदारी स्वीकारली. जमैकामध्ये स्वत:चे गोल्डन आय हे घर बांधले आणि वर्षातील दोन महिने रजा घेऊन जमैकामध्ये वास्तव्य करण्याचा परिपाठ पाळला. या जमैकामधील वास्तव्यातच थरारकथांच्या लेखनावर त्याचे लक्ष पूर्णतया केंद्रित होत असे. 'कॅसिनो रोयाल'चे लेखन जमैकामध्येच झाले. लग्न आणि थरारकथालेखन दोहोंना जमैकामध्येच मुहूर्त सापडला.

औदार्याबद्दल प्रसिद्ध असलेला एक कारखानदार ह्युगो ड्रॅक्स हा मूनरेकर हे क्षेपणास्त्र विकसित करून इंग्लंडच्या लष्कराला त्याचे सर्व तंत्रज्ञान देण्याचे जाहिर करतो. हा कारखानदार कोण असतो? तो एवढा उदार का होतो? दानधर्माबद्दल त्याचा संज्ञापनमाध्यमातून सतत उदोउदो का चालू असतो? असा प्रश्न भल्याभल्यांना पडतो. संडे टाइम्समध्ये त्याचे चरित्र क्रमश: प्रसिद्ध होत असते आणि त्याद्वारे ड्रॅक्सचे आयुष्य खूपच चमत्कृतिपूर्ण आहे अशी वाचकांची भावना दृढ होत जाते. राष्ट्रीय पातळीवर त्याची एक हीरो म्हणून प्रतिमा तयार होत असते; एक सुपरमॅन, एक देशप्रेमी, उदार धनाढ्य. कोलंबाइट हा दुर्मिळ धातू विकसित करून त्याचे उत्पादन करण्याची त्याची मक्तेदारी त्याला अल्पावकाशात कोट्यधीश बनवणारी ठरली होती. हा धातू नायजेरियातील टिनच्या खाणीतून बायप्रॉडक्ट म्हणून मिळतो; त्याचा विलय बिंदू पाच हजार सेंटिग्रेड असल्यामुळे जेट विमानाच्या इंजिनात त्याचा वापर करणे क्रमप्राप्त ठरते. दरवर्षी फक्त तीन हजार टनांचे उत्पादन होते. कोलंबाइटच्या उत्पादन-विक्रीत त्याला कोणी प्रतिस्पर्धी नव्हता. त्यामुळे अल्पावधीतच एक कारखानदार म्हणून त्याचा दबदबा प्रस्थापित झाला. शेलॅक, सिसाल, काळी मिरी वगैरे अनेक छोट्यामोठ्या वस्तूंच्या व्यापारात पैसे गुंतवून त्यातही त्याने आपली मक्तेदारी निर्माण केली होती. टॅन्जियर या मुक्त बंदरातून त्याचा व्यापार चाले. तेथे कोणतेही कर नव्हते. चलनाचे निर्बंध नव्हते. त्यामुळे त्याच्या संपत्तीत

जमैकामध्ये स्वत:चे गोल्डन आय हे घर बांधले आणि वर्षातील दोन महिने रजा घेऊन जमैकामध्ये वास्तव्य करण्याचा परिपाठ पाळला. या जमैकामधील वास्तव्यातच थरारकथांच्या लेखनावर त्याचे लक्ष पूर्णतया केंद्रित होत असे. 'कॅसिनो रोयाल'चे लेखन जमैकामध्येच झाले. लग्न आणि थरारकथालेखन दोहोंना जमैकामध्येच मुहूर्त सापडला.

सतत भर पडत राहिली... इंग्लंडमध्ये आपल्या औदार्याने ह्युगो ड्रॅक्सने स्वत:ची जनमानसातील प्रतिमा उंचावेल अशा प्रकारे देणग्यांचा आणि प्रसिद्धीचा दणका उडवला.

या ड्रॅक्सने आपल्या कारखान्यात मूनरेकर हे क्षेपणास्त्र बनवून त्याची चाचणी घडवून आणण्याचा चंग बांधला. इंग्लंडच्या राणीला तो एक पत्र पाठवून कळवतो, ''मी आपल्यासमोर एक धाडस करू इच्छितो. युरोपातल्या सर्व राजधान्या टप्प्यात येतील, असं सुपर रॉकेट बनवून ते इंग्लंडला अर्पण करण्याची माझी इच्छा आहे. जो कोणी लंडनवर अणुबॉम्ब टाकण्याचा प्रयत्न करील त्याला तोडीस तोड जवाब त्यामुळे मिळू शकेल. त्यासाठी एक कोटी पौंडांची गुंतवणूक मी करीन; तसेच त्या क्षेपणास्त्राचा आराखडा त्याच्याकडे तयार असल्याने आवश्यक ते मनुष्यबळही पुरवण्याची जबाबदारी मी घेईन.'' त्याच्या या पत्रातील देणगी स्वीकारावी असा आग्रह विरोधी पक्षांनी आणि माध्यमांनी धरला. ब्रिटिश सरकारने त्याबद्दल चालढकल चालवली म्हणून विरोधकांनी अविश्वासाचा ठरावही आणला. तेव्हा पंतप्रधानांनी तो प्लॅन मान्य करण्याचे जाहिर केले. राणीसाहेबांनी जनतेच्या वतीने ड्रॅक्सकडून ही देणगी स्वीकारून त्या देणगीदाराला लॉर्ड (नाइट) ही पदवी बहाल केल्याचीही घोषणा केली... आता मूनरेकर क्षेपणास्त्र तयार होत आले होते. त्याचे उड्डाण लवकरच होणार अशा झळकत बातम्या होत्या.

आता यात जेम्स बाँडचा संबंध कुठे व कसा येतो?

जेम्स बाँडचा बॉस एम त्याला एके दिवशी बोलावून सांगतो, ''तुझी एक संध्याकाळही पुरेशी होईल असे एक काम आहे. त्याचा आपल्या गुप्तचर विभागाशी काही संबंध नाही. अगदी खाजगी बाब आहे... तू ह्युगो ड्रॅक्स या व्यक्तीविषयी ऐकलं असशीलच.''

जेम्स बाँडचा बॉस एम त्याला एके दिवशी बोलावून सांगतो, ''तुझी एक संध्याकाळही पुरेशी होईल असे एक काम आहे. त्याचा आपल्या गुप्तचर विभागाशी काही संबंध नाही. अगदी खाजगी बाब आहे... तू ह्युगो ड्रॅक्स या व्यक्तीविषयी ऐकलं असशीलच.''

जेम्स बाँड त्याच्याबद्दल म्हणतो, ''तो एक प्रकारे राष्ट्रीय हीरोच आहे. एक प्रकारची सुपरमॅनसारखी उदात्त प्रतिमा त्याची जनमानसात आहे. चेहऱ्यावर युद्धकाळातल्या जखमा... वाचाळ... भपकेबाज... सरकार खर्चू शकणार नाही इतका पैसा तो स्वत:च्या खिशातून सार्वजनिक कामासाठी खर्च करतोय. लोक उद्या त्याला पंतप्रधान करा अशीही मागणी करतील... तर त्यात आश्चर्य वाटणार नाही... त्यानं आपल्या देशाला युद्धापासून संरक्षण दिलंय. त्याच्या खऱ्या

आयडेंटिटीबद्दल गूढ आहे ते वेगळेच! तो अब्जाधीश असला तरी लोकांना त्याच्याविषयी आदर वाटतो... मलाही त्याच्याविषयी इतरांसारखंच वाटतं.''

या ह्युगो ड्रॅक्सची थोडी पार्श्वभूमी त्याचा बॉस एम त्याला सांगतो, ''१९४४ मध्ये ब्रिटनने ऱ्हाइन नदी ओलांडून जर्मनीवर कब्जा केला तरी तेथील ब्रिटनच्या व अमेरिकेच्या सैन्यावर जर्मनीतील गनिमी व अतिरेकी हल्ले करीतच होते... अशाच एका हल्ल्यात फिल्ड हॉस्पिटलचा काही भाग उडाला. त्यात ड्रॅक्स हा जखमी अवस्थेत सापडला. त्याचा अर्धा चेहरा त्या स्फोटात उडाला. त्याला विस्मरण झाले. तो स्वत:चीही ओळख विसरला... त्याच्यावर वर्षभर उपचार झाले... हरवलेल्या व्यक्तींचा तपास लावताना ह्युगो ड्रॅक्स नावाचा एक अनाथ तरुण युद्धापूर्वी लिव्हरपूलच्या गोदीत कामाला होता अशी माहिती मिळाली. त्याचे वर्णन व फोटो या जखमी तरुणाशी जुळणारे होते; म्हणून त्याला ते नाव देण्यात आले. तो त्यावेळी सैन्याच्या पायोनियर युनिटमध्ये काम करत होता... १९४५ मध्ये त्याला हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देताना ह्युगो ड्रॅक्स हेच नाव देण्यात आले. त्याला पगारासह पेन्शनही देण्यात आले. युद्धोत्तर काळात त्याने मेटल मार्केटमध्ये चांगले नाव कमावले...''

ब्लेडस या उच्चभ्रूंच्या क्लबमध्ये ड्रॅक्स हा एक निष्णात व भाग्यवान जुगारी म्हणून सर्वांना ठाऊक आहे... हा अब्जाधीश माणूस क्लबमध्ये ब्रिज खेळताना फसवतो असा संशय क्लबचे चेअरमन बेसिल्डन यांना आता आताशी येऊ लागला आहे;

''त्याच्याशी आपला आता काय संबंध?''

''तो ब्लेडस क्लबचा सदस्य आहे. मी त्याच्याबरोबर पत्ते खेळलो आहे. डिनर घेतले आहे... ब्लेडस या उच्चभ्रूंच्या क्लबमध्ये ड्रॅक्स हा एक निष्णात व भाग्यवान जुगारी म्हणून सर्वांना ठाऊक आहे... हा अब्जाधीश माणूस क्लबमध्ये ब्रिज खेळताना फसवतो असा संशय क्लबचे चेअरमन बेसिल्डन यांना आता आताशी येऊ लागला आहे; ड्रॅक्स हा खेळताना लबाडी करतो असे बाहेर पडले तर त्या माणसाची प्रतिष्ठा क्षणार्धात धुळीला मिळू शकेल... त्यामुळे बेसिल्डन हादरला आहे...'' असे सांगून बॉस एम जेम्स बाँडवर ड्रॅक्स खरोखर खेळात काही गडबड करतो का याचा शोध लावण्याची कामगिरी सोपवतो.

जेम्स बाँड हा बॉस एमचा एक गेस्ट म्हणून क्लबमध्ये जातो; आणि एमचाच डाव खेळायचा घाट जमवून आणतो. त्याचा वर्षाला जो पगार असतो, तेवढी रक्कम तो खेळताना आधीच घालवतो... मात्र ह्युगो ड्रॅक्स कुठे गडबड करतो हे तो शोधून काढतो... आणि पुन्हा खेळायला लागतो... त्यावेळी त्याला

एक काळजी घ्यावी लागते. ह्युगो ड्रॅक्स खेळताना फसवतो अशी वाच्यता होता कामा नये; फक्त त्याला मात्र कळावे की आपली लबाडी उघडकीला आली आहे; तेव्हा राजीनामा देणेच इष्ट असे त्याला स्वत:लाच वाटावे.

...आणि त्या डावात घालवलेले पैसे वसूल करून शिवाय चांगली घसघशीत कमाईही व्हावी अशा प्रकारे जेम्स बाँड स्टेक्स वाढवत जातो. सर्व खेळाडूंना व बघ्यांना हा डाव पूर्णतया योग्य प्रकारे चालला आहे याबाबत कुठलीही शंका राहू नये– असाच एकूण रंगढंग असतो. 'डबल' अशी बेट मारताना ड्रॅक्स अशा तुच्छतेने आणि क्रूरपणे बघत असतो की जेम्स बाँड हा महामूर्ख झिंगलेला दारुडा आयताच माझ्या जाळ्यात सापडलाय... असा भाव त्यातून सर्वांना जाणवावा.

...बाँड त्यावर म्हणतो, ''म्हणजे साईड बेट्स् पण डबल...? ऑल राइट... रिडबल करा... कॉन्ट्रॅक्ट आणि साइड बेट्स्. एका हाताला चारशे पौंड...'' तीन एक्के, चार राजे, दोन राण्या, तीन गुलाम हातात असणाऱ्या ड्रॅक्सला एक एक्का, दोन राण्या आणि दुर्री ते दश्श्यापर्यंतची पाने असणारा जेम्स बाँड असा दणका देतो की ड्रॅक्सचा चेहरा पांढराफटक पडतो; आणि त्याचे डोळे आग ओतू लागतात. ''तू लबाड आहेस. फसवणारा.'' तेव्हा त्याला चेअरमन बेसिल्डन बजावतो, ''बास. पुरे ड्रॅक्स. असली भाषा इथे चालणार नाही. मी ही सगळी गेम नीट पाहिलीय. हिशेब चुकता कर आणि तक्रार असेल तर ती कमिटीला लेखी दे.''

ड्रॅक्सच्या प्लँटवर मूनरेकरचे काम पूर्ण झालेले असते आणि आता उड्डाणाचेच तेवढे काम तीन दिवसांनी व्हायचे असते. पण त्या प्लँटवर एका जर्मन तंत्रज्ञाची हत्या होते आणि ती हत्या करणारा रॉयल एअर फोर्सचा सुरक्षा अधिकारी स्वतःवरही गोळी घालून घेतो...

ड्रॅक्स धूर्तपणे आपले तुच्छतेचे हास्य चेहऱ्यावर आणून म्हणतो, ''मी जवळजवळ १५ हजार पौंड देणं लागतोय...'' आणि बाँडला तो म्हणतो, ''तुमच्या जागी मी असतो तर ते पैसे लगेच खर्च करून टाकीन... कमांडर बाँड.''

क्लबमधला हा सगळाच प्रसंग अत्यंत रोमांचकारक रंगवला गेला आहे.

...पण इथेच ही थरारकथा संपत नाही.

जेम्स बाँड आणि ड्रॅक्स यांचा दुसऱ्याच दिवशी सामना घडतो. अगदी अनपेक्षितपणे!

ड्रॅक्सच्या प्लँटवर मूनरेकरचे काम पूर्ण झालेले असते आणि आता उड्डाणाचेच तेवढे काम तीन दिवसांनी व्हायचे असते. पण त्या प्लँटवर एका जर्मन तंत्रज्ञाची हत्या होते आणि ती हत्या करणारा रॉयल एअर फोर्सचा सुरक्षा अधिकारी स्वत:वरही गोळी घालून घेतो...

तेव्हा क्षेपणास्त्राच्या संरक्षणाची व्यवस्था बरोबर आहे की नाही याचा पत्ता लावण्यासाठी जेम्स बाँडला ह्युगो ड्रॅक्सच्या प्लँटवर पाठवण्यात येते.

ह्युगो ड्रॅक्स त्याचे स्वागत करतो. त्याला संपूर्ण प्लँट स्वत: हिंडून दाखवतो. त्यामुळे तो या क्षेत्रात खरोखरच वाकबगार आहे असे जेम्स बाँडला दिसते आणि त्याच्याबद्दल आदर वाटू लागतो...

पण हा त्याचा भ्रमच असतो हे नंतर त्याच्या लक्षात येते...

क्षेपणास्त्र ज्या कड्यावरून उडवायचे होते, त्याच्या खाली समुद्रकिनाऱ्यावर जेम्स बाँड आणि ड्रॅक्सकडे काम करणारी एक तरुणी गॅला हे दोघे पाहणी करीत असतात; आणि नेमका त्याचवेळी त्यांच्या अंगावर कड्याचा काही भाग कोसळतो...'' तो कडा कुणीतरी आपल्यावर ढकलला आहे'' असे त्या ढिगाच्या खडकावरील ड्रिल केलेल्या व सुरुंगाच्या खुणांवरून बाँडच्या लक्षात येते; आणि ''आपल्याला ठार मारण्याची कोणाची तरी इच्छा आहे... तर आपल्याला जिवंत राहून हा काय प्रकार आहे हे शोधून काढायलाच हवे'' असा निर्धार बाँड व्यक्त करतो.

''मला तुमच्यात रस नाही... आपली मुलाखत विनाअडथळा पार पडल्याबद्दल मी तुझे आभार मानतो. तुम्ही नशीबवान आहात... उद्या त्या उघड्या दारातून दुपारी बारा वाजता तुम्ही बाहेर बघितलंत तर तुम्हाला टरबाइनमधून बाहेर पडणारी वाफ दिसेल आणि अर्ध्या सेकंदाच्या आत तुम्ही जळून खाक व्हाल...

गॅला व जेम्स बाँड लंडनला आपल्या कार्यालयात जाण्यासाठी वेगवेगळ्या कार्सनी निघतात. गॅला ड्रॅक्सच्या कारमध्ये असते; तिला बेशुद्ध करून एका ठिकाणी डांबून ठेवण्यात येते...

बाँडच्या कारलाही धडक देण्यात येते...

आणि त्या दोघांना बंदिस्त करून ड्रॅक्स त्यांना सांगतो, ''मला तुमच्यात रस नाही... आपली मुलाखत विनाअडथळा पार पडल्याबद्दल मी तुझे आभार मानतो. तुम्ही नशीबवान आहात... उद्या त्या उघड्या दारातून दुपारी बारा वाजता तुम्ही बाहेर बघितलंत तर तुम्हाला टरबाइनमधून बाहेर पडणारी वाफ दिसेल आणि अर्ध्या सेकंदाच्या आत तुम्ही जळून खाक व्हाल... तोपर्यंत हे सारं कशासाठी आहे हे मी तुम्हांला सांगतो... एका जर्मनानं आपला पराभव केलाय हे इंग्लंडला आता मान्य करावं लागेल...'' आणि तो आपली कहाणी त्या दोघांना ऐकवतो. मूनरेकरमागचा हेतू स्पष्ट करतो... नंतर त्यांना तेथेच बंदिस्त अवस्थेत सोडून ड्रॅक्स क्षेपणास्त्र प्रक्षेपणासाठी जातो.

मूनरेकरच्या प्रक्षेपण प्रसंगाचे (त्यावेळी टीव्ही नसल्याने) चक्षुर्वैसत्यम् वर्णन बीबीसी रेडिओवरून प्रक्षेपित होते. त्यावेळी सर ह्यूज ड्रॅक्स भाषण करतो,

''महाराज, इंग्लंडचे नागरिक असलेल्या स्त्रीपुरुषांनो, मी आज इंग्लंडच्या इतिहासाला एक संपूर्ण नवं वळण देणार आहे... आज मला अत्यंत गर्व वाटतोय. माझ्या देशबांधवांमधून नियतीनं माझी निवड केलीय. कशासाठी? सूडाचा हा अद्वितीय बाण आकाशात उडवून, अख्ख्या जगाच्या साक्षीनं माझ्या पितृभूमीची ताकद काय आहे हे मला जगाला दाखवून द्यायचं आहे... माझ्या देशाविरुद्ध कारवाया करणाऱ्यांच्या नशिबी येते ती फक्त धूळ, राख, अश्रू आणि विराम! रक्ताचे पाट!...''

क्रोनोमीटरवर दहापासून उलट्या गणतीला सुरुवात होते.

दहा... नऊ... आठ... तीन... दोन... एक. फायर.

आणि ताशी १० हजार मैल वेगाने रॉकेट निघते... तेवढ्यात एक पाणबुडी सुसाट येते. नौदलाचे अधिकारी गोंधळात पडतात..

बाँड आणि गॅला जखमी होतात... पण त्यांनी आपले काम चोख केलेले असते. लंडनला भस्मीभूत करू पाहणारे क्षेपणास्त्र दिशा वळवून बाल्टिक समुद्रात ठरल्याप्रमाणे आदळते... ड्रॅक्सचा डाव फसतो. त्याच्या चिंधड्या होतात...

या थरारकथेतील बाँडची सहकारी तरुणी गॅला ही एकमेव अशी नारी निघते की जी बाँडच्या मोहजालात न सापडता नाकावर टिच्चून सांगते, ''तो जवळ उभा आहे ना- तो डिटेक्टिव्ह व्हिवियन... त्याच्याशी मी लग्न करणार आहे.''

जेम्स बाँडची ही थरारकथा पूर्णतया इंग्लंडच्या पार्श्वभूमीवर आहे.

त्याचप्रमाणे या थरारकथेतील बाँडची सहकारी तरुणी गॅला ही एकमेव अशी नारी निघते की जी बाँडच्या मोहजालात न सापडता नाकावर टिच्चून सांगते, ''तो जवळ उभा आहे ना– तो डिटेक्टिव्ह व्हिवियन... त्याच्याशी मी लग्न करणार आहे.''

बाँडला यशाच्या आनंदापेक्षा पराजयाची ही वेदना मोठी खंतावणारी वाटते. ''या तरुणीच्या आयुष्यातून आपण बाहेर पडायला हवं... हीच वेळ आहे. आपलं निर्मम हृदय सांभाळा... नो रिग्रेटस... आता पुन्हा आपली ती भूमिका वठवायची... बिनधास्त... टफ माणसाची...''

दुसरे महायुद्ध संपून शीतयुद्धाचे वातावरण सुरू झाले... १९५० च्या दरम्यानच्या पार्श्वभूमीवरील ही कहाणी... कडव्या जर्मन माणसाच्या सूडभावनेचे एक जहाल प्रकरण पेश करते.. खिळवून ठेवते...

याच नावाच्या चित्रपटात मात्र या कथेत बरेच बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे तो वेगळाच झाला आहे, असे अनेक समीक्षक म्हणतात.

पृष्ठे : २१६ ● किंमत : १५०रु. ● सभासदांना : ११३रु. ● पोस्टेज : २०रु.

ओशो रजनीश यांची आगामी पुस्तके



मृत्यू अमृताचे द्वार

- अनु. मीना टाकळकर -

हा शोध वेगळा

- अनु. भारती पांडे -





माझे माझ्यापाशी काही नाही

- अनु. भारती पांडे -

कलाविषयक माहितीपर अशी उपयुक्त पुस्तके



Amruta's Mehendi Designs

Bridal & Arabic

-अमृता खोड्ये-

५०रु.

मेहेंदीच्या विविध
प्रकारांबद्दल सचित्र
मार्गदर्शन करणारे पुस्तक.

वेरूळ लेण्यांतील शिल्पवैभव



आकर्षक छायाचित्रे आणि
ऐतिहासिक संदर्भासह
वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव
टिपणारे शब्दशिल्प

-राधिका टिपरे-

२००रु



साऊथ बाय जावा हेड

ॲलिस्टर मॅक्लीन / अनु. अशोक पाध्ये

इंडोचायनाच्या समुद्रात केरीक डान्सर आणि विरोमा ह्या बोटींवर घडणारे दुसऱ्या महायुद्धातले एक विलक्षण नाटच

साऊथ बाय जावा हेड या ॲलिस्टर मॅक्लीनच्या थरारकथेलाही दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी आहे. स्वत: मॅक्लीनने युद्धभूमीवर काम केलेले असल्याने या कथेतील वास्तवही धारदार असावे यात नवल नाही.

सिंगापूर शहर बॉंबफेकीमुळे दगडधोंड्यांनी, विटांच्या आणि कॉंक्रिटच्या तुकड्यांनी एखाद्या उद्ध्वस्त ढिगाऱ्यासारखे भयाण वाटत होते. प्रचंड धूळ आणि गंधकाचा उग्र दर्प असणारा सर्वव्यापी धूर यामुळे सगळ्या शहरावर अंधाराचे साम्राज्य पसरले होते. थकल्याभागलेल्या नागरिकांची अवस्थाही अत्यंत भयाण झालेली होती आणि त्यातील अनेकजण आजारी, जखमी अवस्थेत विव्हळत होते; त्यांची बुद्धी, शक्ती आणि हिंमत काम देत नव्हती. त्यांच्या डोक्यातली चमक नाहीशी झालेली होती. पुढे काय या चिंतेची भीतीची तलवार त्यांच्यावर टांगलेली होती... सिंगापूर हे बेट सुरक्षित म्हणून गणले जात होते; परंतु त्याची अवस्था दयनीय झालेली होती. जपान्यांनी बॉंबफेक करून शहरातील बहुतांश इमारतींना आणि नव्वद टक्के नागरिकांना विनाशाच्या खाईत लोटले होते. लहान मुले, जखमी सैनिक, रुग्ण वृद्ध या सर्वांना गोळ्या घालून ठार मारण्याचे आदेश देण्यात आले होते.

१४ फेब्रुवारी १९४२ रोजी कॉर्पोरल फ्रेझर आपल्या जखमी खांद्यावर बारा किलो वजनाची ब्रेनगन घेऊन, कसातरी चालला होता. आमांश आणि मलेरिया यांच्या तडाख्याला तोंड देऊन कमजोर झालेल्या, फरफटत चाललेल्या त्याच्या देहाला तो भार झेपत नव्हता... त्याच्या मागून जखमी झालेले काही सैनिक रडतखडत चाललेले होते. त्याचबरोबर काही परिचारिकाही होत्या. दोन-अडीच वर्षांचा एक पोरका मुलगा होता. त्या जथ्याचे नेतृत्व करणारी पंचविशीतली

परिचारिका सडपातळ व उंच होती... बॉंबचा स्फोट झाल्याने तिची पांढरी शुभ्र कॅप उडून गेली होती आणि तिचे दाट काळे केस तिच्यासमोर गळून पडू लागले होते. ती युरोपीय आणि आशियाई वंशाच्या संकटातून झालेली युरेशियन स्त्री होती. तिच्या गालावरचा लांबलचक ओरखडा तिच्या चेहऱ्याला काहीसा विद्रूप व भीषण बनवायला कारणीभूत ठरला होता.

हे सर्वजण जपानी सैन्याच्या तावडीत न सापडावे म्हणून बंदराकडे चालले होते. कत्तल, रक्तपात टाळून सुरक्षित बाहेर पडता यावे, म्हणून त्यांची सारी धडपड होती.

त्याच वेळी फोर्ट कॅनिंगमधील भरघोस मिशांचा आणि गरुडासारख्या नाकाचा ब्रिगेडियर जनरल फॉस्टर फार्नहोम आपला चेहरा निर्विकार ठेवण्याचा प्रयत्न करीत, तेथील प्रमुख कर्नलला निर्वाणीच्या सुरात विनवतो, ''कर्नल, मला सिंगापूरमधून बाहेर पडण्यासाठी एक विमान तातडीने पाहिजे... मला अत्यंत महत्त्वाचे कागदपत्र त्वरित वरिष्ठांपर्यंत पोहोचवायचे आहेत...''

ब्रिगेडियर जनरल फॉस्टर फार्नहोम आपला चेहरा निर्विकार ठेवण्याचा प्रयत्न करीत, तेथील प्रमुख कर्नलला निर्वाणीच्या सुरात विनवतो, ''कर्नल, मला सिंगापूरमधून बाहेर पडण्यासाठी एक विमान तातडीने पाहिजे... मला अत्यंत महत्त्वाचे कागदपत्र त्वरित वरिष्ठांपर्यंत पोहोचवायचे आहेत...''

आग्नेय आशियातील प्रतिघातपाती विभागाचा १७ वर्षे प्रमुख असलेला ब्रिगेडियर फार्नहोम ही विनवणी करीत आहे हे जाणूनही कर्नल अगतिक असतो. कारण त्याच्याजवळ आता उडू शकणारे एकही विमान उरलेले नसते. फार्नहोमजवळची कागदपत्रे बघून तो म्हणतो, ''वरचा परमेश्वर आणि जगातले सगळे खजिने या रहस्यमय कागदापुढे तुच्छ आहेत. हे कागद जय आणि पराभव यांच्यातील सूक्ष्म सीमा ठरू शकतात... पण मी आज काहीही मदत करू शकत नाही. उद्याच सकाळी जपान्यांपुढे आम्ही शरणागती पत्करणार आहोत. आमच्याजवळचा धान्यसाठा, दारूगोळा संपलेला आहे. पाण्याची पाइपलाइन उडवून दिली की सगळेच संपेल...''

तेव्हा फार्नहोम त्याला म्हणतो, ''मग मला केरी डान्सर बोटीनेच ऑस्ट्रेलियाला जावे लागेल... त्या बोटीवर एक डच माणूस आहे. व्हॅन एफिन. त्याच्या मदतीने बोटीच्या कॅप्टनचे, सिरानचे मन वळवून ही कागदपत्रे पोहोचवण्यासाठी मी मार्ग बदलायला भाग पाडू शकेन... या माझ्या बॅगेत कागदपत्रांबरोबर दुर्मिळ हिरेही भरलेले आहेत; त्यामुळे केरी डान्सर बोटीचा कॅप्टन माझे म्हणणे ऐकेल असे मला वाटते.''

कर्नल आपले दोन डझन स्कॉटिश हायलँडरेजिमेंटचे सैनिकही फार्नहोमच्या मदतीला देतो...

फार्नहामला त्या बोटीवर प्रवेश मिळतो. १५ फेब्रुवारीला बोट सिंगापूरहून निघते. कॉर्पोरल फ्रेझर, त्याच्याबरोबरचे जखमी सैनिक, पाच परिचारिका, पीटर टॅलन हे दोनअडीच वर्षांचे मूल– या सर्वांनाही बोटीवर घेण्यात येते...

...केरी डान्सर बोटीचा प्रवास हा देखील बिनबोभाट किंवा सुरळीत होत नाहीच... नाना अडथळे येतात.

त्या बोटीच्या मागोमाग सिंगापूर सोडणारी आणखी एक बोट असते. विरोमा. बारा हजार टनी बोट. तिचा कॅप्टन फ्रान्सिस फाईड हॉर्न हा ब्रिटिश कमांडोर असतो... तिच्यावर चीफ ऑफिसर म्हणून निकोल्सन काम करीत असतो... वादळाची शक्यता कॅप्टनला दिसते... चिनी समुद्रातून ही बोट चाललेली असते. युद्धक्षेत्रातून जायचे असल्याने विरोमाने आपले नाव बदलून रेझिस्टेन्सिया असे नवे रंगवलेले असते... या बोटीवर ऑक्टेन हे ज्वालाग्राही पेट्रोल असते. दहा हजार टन. ही बोट म्हणजे एक प्रचंड बॉंबच होय याची कल्पना फक्त कॅप्टनला आणि काही जणांनाच असते.

या बोटीवर ऑक्टेन हे ज्वालाग्राही पेट्रोल असते. दहा हजार टन. ही बोट म्हणजे एक प्रचंड बॉंबच होय याची कल्पना फक्त कॅप्टनला आणि काही जणांनाच असते.

तेवढ्यात एक आणीबाणीचा संदेश येतो. ''बॉंबहल्ला होण्याची शक्यता आहे. वरती उत्तरेकडे कुठेतरी...''

नंतर निरोप येतो... बॉंब टाकला गेला आहे. केरी डान्सर बोटीवर. ''त्या बोटीला आपण वाचवायला हवे. तिच्यातील ५५ प्रवाशांना मदत करायला हवी.'' असे निकोल्सन सुचवतो तेव्हा कॅप्टन फाईड हॉर्न ती सूचना तिथल्या तिथे फेटाळून लावतो आणि म्हणतो, ''नाही. अजिबात नाही. आपली दिशा १३० अंशाचीच राहू दे.'' परंतु सुकाणूचे चाक हाताळणारा क्वार्टरमास्टर कॅप्टनला म्हणतो, ''सर, केरी डान्सर ही आपली ब्रिटिशांचीच सरकारी बोट आहे. अधिकृत बोट आहे. ती जर संकटात असेल तर आपण तिच्या मदतीला जाणे हे आपले कर्तव्यच आहे.'' दहा हजार टन ज्वालाग्राही तेल पोटात ठेवून ही बोट समुद्रात बॉंब हल्ल्यात निकामी होऊन राहणे हे भयंकर धोकादायक ठरणार होते; हेही कॅप्टनच्या लक्षात येते.

बोटस्मनही अधिक माहिती देतो, ''त्या बोटीवर बरेच प्रवासी होते. ते एक हॉस्पिटल शिप होते... काही जखमी सैनिक तिच्यावर होते. त्या बोटीला

ऑस्ट्रेलियाकडे वळवा, किंवा तिचा ताबा सोडा अशी धमकी तिच्या कॅप्टनला देण्यात आलेली होती असे मला कळले.''

''असे असेल तर ती बोट म्हणजे एक तरंगता मृत्यूचा सापळाच म्हणायला हवा. त्या सिंगापूरच्या मठ्ठ अधिकाऱ्यांच्या डोक्यात ही बाब कशी शिरली नाही?... आपल्याला तिच्याकडे पोचण्यासाठी काही तास लागणार. तेवढ्या अवधीत तिच्यातील बहुतेक सर्वजण लाइफबोटीतून कुठे कुठे पांगलेले असतील... जगले वाचलेले असतील तर...'' कॅप्टन पुढे म्हणतो, ''तिथे जाणे म्हणजे आत्महत्या करणेच होय... मला त्या बेभरवशाच्या बोटीमागे लागून आपल्या बोटीचे नुकसान करून घ्यावे असे वाटत नाही.''

...पण शेवटी कॅप्टन क्वार्टरमास्टरला म्हणतो, ''आपली बोट फेरी मास्टरच्या ठिकाणी न्यायला लागा...''

केरी डान्सर बोट बुडू लागलेली होती. तिचे धुराडे गायब झाले होते. त्या जागी मोठे भगदाड पडलेले होते. कॅप्टनची खोली उद्‌ध्वस्त झाली होती. डेकचा पत्रा भेदून बॉंब फार्वर्ड कॅसलमध्ये– कर्मचाऱ्यांच्या खोलीत पडला होता. तेथे आग लागून धातूचे सांगाडे तेवढे उरले होते. बोटीचे रूपांतर जळलेल्या भंगारात झाले होते... पण तिच्या मागच्या बाजूला २३ जखमी सैनिक मरणोन्मुख अवस्थेत होते... बॉंबस्फोटाने लागलेली आग मागच्या त्या भागापर्यंत पोहोचली नव्हती; म्हणून ते लोक जिवंत राहिले होते... पण त्यांच्या किंचाळ्या, वेदना यांना अंत नव्हता.

पण तिच्या मागच्या बाजूला २३ जखमी सैनिक मरणोन्मुख अवस्थेत होते... बॉंबस्फोटाने लागलेली आग मागच्या त्या भागापर्यंत पोहोचली नव्हती; म्हणून ते लोक जिवंत राहिले होते... पण त्यांच्या किंचाळ्या, वेदना यांना अंत नव्हता.

...आणि केरी डान्सर बोटीजवळ हजार फुटांवर जाण्यात विरोमीला यश मिळते.

निकोल्सन लाइफ बोटीतून जाऊन तिच्यावर प्रवेश करतो. लाकडी जिना पूर्णपणे जळून गेला होता. डेक म्हणजे विहिरीचा तळ झाला होता. केबिनच्या एका पोलादी दारावर कुऱ्हाडीने घाव घालतो... आतून काही आवाज येतात... त्या केबिनमध्ये वीस सैनिक अक्षरश: कोंडलेले असतात. गुलामासारखे. कारण ती गुलामांचा व्यापार करणारी बोट असते. नाइलाजाने तिच्यावर ब्रिगेडियर फार्न होम घुसलेला असतो.

...आजारी नसलेला एकच माणूस तिथे असतो. आणि तो दारू पिऊन तर्रर्र झालेला असतो. मिस कॉन्स्टन्स प्लॅंडरलीथ ही कृश, बुटकी पण ताठ बाई

आणिक ड्राखमन– हे तिघेच काय ते स्वत:च्या पायावर चालू शकतील असे तेथे होते... मिस ड्राखमन दोन वर्षाच्या त्या मुलाला घेऊन... लाइफबोटीत प्रवेश करतात. तेथून विरोमा बोटीवर...

केरी डान्सर बोटीवरील बऱ्याच जणांना घेऊन विरोमा पुढे मार्गक्रमण करू लागते. पण अजूनही तिला वातचक्राचा भेद करून पुढे जाता येईल की नाही या शंकेने कॅप्टन धास्तावलेला होता.

...विरोमा बोटीच्या मागावरही जपानी बॉंबर्स आणि टॉर्पेडो विमाने असतात; तेलवाहू बोट बुडवता आली नाही तर आपली नाचक्की होणार अशी जपान्यांची भावना असते... जपान्यांची तब्बल पन्नास विमाने विरोमा बोटीवर चालून येतात... बोटीवर धडाधड बॉंब टाकतात... एक टॉर्पेडोही बोटीच्या दिशेने येतो... तिचा मागचा भाग लचका तोडल्यासारखा नाहीसा होतो... तेथे असणाऱ्या सैनिकांच्या व खलाशांच्या शरीराच्या चिंध्या होतात... पण बोट बुडवण्याचा हेतू जपान्यांचा नसावा... तेल असणाऱ्या टाक्यांचा भाग सुरक्षित राहावा अशा दक्षतेने बॉंबफेक झालेली असते...

जपान्यांची तब्बल पन्नास विमाने विरोमा बोटीवर चालून येतात... बोटीवर धडाधड बॉंब टाकतात... एक टॉर्पेडोही बोटीच्या दिशेने येतो... तिचा मागचा भाग लचका तोडल्यासारखा नाहीसा होतो... तेथे असणाऱ्या सैनिकांच्या व खलाशांच्या शरीराच्या चिंध्या होतात... पण बोट बुडवण्याचा हेतू जपान्यांचा नसावा

जपानी लोकांना मग काय करायचे असेल? त्यांच्या मनात काय होते? असा प्रश्न कॅप्टनला व निकोल्सनला पडतो... पण एका गोळीने कॅप्टनच्या छातीवर मध्यभागी एक छोटेसे भोक पडते. त्यामधून रक्ताची धार लागते. निकोलसन त्याची जखम बघून बॅंडेज बांधतो... विरोमा बोट अजूनही चालण्याच्या स्थितीत असते...

...त्यांच्या मदतीसाठी एक पाणबुडी येते. जपान्यांची टेहळणी चालू असल्याने ती बोटीजवळ येण्याचे मात्र टाळत असते... जपान्यांना शरण न जाता विरोध करायचा असा कॅप्टनचा निर्धार असतो... पाणबुडीवरून गोळीबार सुरू होतो...

...असे बरेच काही घडत असते; एकेकाच्या धैर्याचा आणि पराक्रमाचा कस लागत राहतो. बरेच सैनिक सतत ताणाखाली राहिल्याने मनाचे संतुलन गमावून बसल्यासारखे वागू लागतात. सारेच अगतिक झालेले असतात.

केरी डान्सर या बोटीचा कप्तान सिरान हाही या सैनिकांबरोबर नाइलाजाने बोटीवर आलेला असतो. आपल्या अंगरख्यात लपवून आणलेल्या सुऱ्याने तो मौलवीचा खून करतो. त्या मौलवीची पिशवी हस्तगत करतो. हा मौलवी म्हणजे

जॉन बेकर असतो. डच सरकारचा हेर म्हणून तो काम करीत असतो. तो या जहाजावर कसा आला– असा प्रश्न निकोल्सनला पडतो तेव्हा ब्रि. फार्न होम आपण त्याला तेथे आणण्यास निमित्तमात्र होतो असा खुलासा करतो.

...पुढे प्रश्न असा पडतो की त्याच्याजवळच्या पिशवीत काय असते? त्या पिशवीसाठी सिरान खून करण्यापर्यंत मजल का मारतो?...

कॅप्टन सिरानला दोऱ्यांनी बांधून ठेवतात.

...बोट निकामी झाल्याने एका बेटावर ते सर्वजण उतरतात. जंगलात शिरतात.

तो इंडोचायनाचा प्रदेश असतो. तेथील एक बंदूकधारी तरुण त्यांची चौकशी करतो... तो गावच्या प्रमुखाचा मुलगा असतो.

''आम्हाला मदत पाहिजे... आमची माणसे आजारी आहेत... काही स्त्रियाही फार आजारी आहेत. त्यांना उपचारांची गरज आहे... भूकही खूप लागली आहे.'' निकोल्सन सांगतो...

त्या खेड्यात जपानी सैनिक येऊन त्या तरुणाला मारहाण करतात... त्याच्या वडिलांना ठार करतात...'' आम्ही बेसावध होतो... पण त्यांच्याशी संघर्ष केला... पण शेवटी शरण जावे लागले'' असे तो तरुण सांगतो.

''ही जड बॅग बघा... या बॅगेत हिरे आहेत... त्यांची किंमत वीस लाख पौंड तरी असेल... बोर्निओच्या खाणीतले हे हिरे... केरी डान्सर बोट त्या बेटावर गेली होती तेव्हा तिच्यावर चढवले गेले असणार. या हिऱ्यांना पैलू पाडल्यावर त्यांची किंमत खूप वाढेल.''

जपानी कॅप्टन यामाटा तेथे बाकावर बसतो; त्याने सिरानलाही तेथे आणलेले असते. ''आपण दहा मिनिटांत बांटुकला जाण्यासाठी निघणार आहोत'' असे कॅ. यमाटा सांगतो. ''तुम्ही कबुलीजबाब द्या... तुम्हाला त्रास देण्याचा आमचा इरादा नाही...'' त्याच्याजवळ एक जड बॅग असते.

जर्मन हेरखात्यातील व्हॅन एफिन हा जपान सरकार आपल्या मागे हात धुवून का लागले होते याचे कारण मग स्पष्ट करतो. ''ही जड बॅग बघा... या बॅगेत हिरे आहेत... त्यांची किंमत वीस लाख पौंड तरी असेल... बोर्निओच्या खाणीतले हे हिरे... केरी डान्सर बोट त्या बेटावर गेली होती तेव्हा तिच्यावर चढवले गेले असणार. या हिऱ्यांना पैलू पाडल्यावर त्यांची किंमत खूप वाढेल.'' मिस प्लॅंडरलीथकडे तो तिच्याजवळच्या एका लांबट पट्ट्याच्या पिशवीची मागणी करतो. त्या पट्टीत छायाचित्रे, निगेटिव्ह व काही कागदपत्रे असतात... त्याकडे बघून तो म्हणतो, ''त्या हिऱ्यांपेक्षा हा खजिना आणखी जास्त मौल्यवान आहे. त्यासाठी गेले काही दिवस आमचा

सगळा आटापिटा चालू आहे... बरीच माणसे मारली गेली... त्यासाठीच कॅप्टन यामाटा येथे आले आहेत... या कागदपत्रात जपानच्या ऑस्ट्रेलियावरील भावी आक्रमणाची संपूर्ण योजना तपशीलवार मांडलेली आहे. त्या कागदपत्रातील सांकेतिक भाषा स्पष्ट करू शकणारा एकच माणूस लंडनमध्ये आहे... त्याच्या हाती ही कागदपत्रे नेऊन दिली तर अमेरिका आणि ब्रिटन या दोन्ही राष्ट्रांना हर्षवायू होईल... ही स्फोटक माहिती मग जपानला शरणागतीसाठी भाग पाडेल... जपानचा पाडाव होईल...''

कॅ. यामाटा विचारतो, ''प्लॅन्डरलीथ बाईकडे हे हिरे व हे कागद कसे आले?''

''फार्नहोमकडून... तो डच सिक्रेट सर्व्हिस एजन्सीचे काम गेली तीस वर्षे करीत होता. त्याला हे कागदपत्र डच अधिकाऱ्यांकडूनच मिळाले असणार...''

जपानी अधिकाऱ्यांना ही माहिती कळल्यावर फार्नहोम ज्या बोटीवरून प्रवास करीत होता त्या बोटीवर जपानी विमानांनी हल्ला केला... ती बोट बुडाली. म्हणून 'विरोमा'वर हल्ला केला... सिरानला हिऱ्यांची माहिती मिळाली... त्याने जपान्यांशी हातमिळवणी केली... बोटीवर हिरे आहेत हा निरोप व्हॅन एफिनने पाठवल्यामुळेच तिच्यावरचा बॉंबहल्ला हा सौम्य प्रमाणात केला गेला हेही स्पष्ट होते.

तो सांगतो, ''माझ्यावर वेळ घालवू नका... निकोल्सन... लॉंच मिळवा... आपली माणसे वाचवा... आम्ही जर्मन माणसे अशी सहजी हार मानत नाही... युद्ध जिंकण्यासाठी पडेल ती किंमत द्यायला तयार असतो...''

व्हॅन एफिन आपल्या हाती सर्व सूत्रे घेऊन कॅ. यामाटाला ठार मारतो. कॅ. सिरानलाही जायबंदी करतो... पण तेवढ्यात एक जपानी सैनिक व्हॅन एफिनच्या खांद्यावर गोळी झाडतो... जपानी सैनिकाबरोबर झटापट करू लागतो; अंगात त्राण नसल्याने एका भिंतीजवळ मुटकुळे करून बसून राहतो. निकोल्सन त्या अर्धमेल्या एफिनला उचलून खोलीबाहेर पडतो... एका झोपडीत त्याला नेतो... तो सांगतो, ''माझ्यावर वेळ घालवू नका... निकोल्सन... लॉंच मिळवा... आपली माणसे वाचवा... आम्ही जर्मन माणसे अशी सहजी हार मानत नाही... युद्ध जिंकण्यासाठी पडेल ती किंमत द्यायला तयार असतो...'' व्हॅन एफिन शुद्ध हरपतो... वीरमरण पत्करतो.

निकोल्सन जपानी कर्नल किसेकीला गाठतो... ''मी तीन अंक मोजेन. तिसऱ्या अंकाला बंदुकीचा चाप ओढीत... आमच्या माणसांना मुक्त करा... सैनिकांना बंदुका खाली ठेवायला सांगा...''

कर्नल किसेकीच्या वायरलेस सेटवरून निकोल्सनला संदेश पाठवायचा असतो. तेथील मेयरच्या घरी तो ट्रॅन्समीटर असतो... तो निकामी केल्यावर कर्नल किसेकीच्याच लॉंचमधून निकोलसन सर्व साथीदारांसह जावा बेटाच्या दक्षिणेकडच्या जावा हेडच्या दिशेने सुसाट निघतो...

दुसऱ्या महायुद्धातील एका घटनेभोवती रचलेली ही कथावस्तू नौदलाशी संबंधित असल्याने बोटी, जहाजे, लॉंचेस, लाइफबोटी वगैरेंचे तपशील भरपूर येतात. मराठी वाचकांना ते नावीन्यपूर्ण वाटतील; तसेच काहीसे अपरिचित असल्याने क्वचित् संभ्रमातही टाकतील. घटनांची खूपच गर्दी असल्यानेही वाचकाला चक्रव्यूहात अडकल्यासारखे वाटेल. व्यक्तिरेखांच्या उभारणीतही काहीसा सरधोपटपणा आहे. कथानकाची भावी दिशा काय हे आरंभी व्यवस्थित लक्षात येतेच असे नाही. सिंगापूरला कॉर्पोरेल फ्रेझर याच्याकडे ब्रिगेडियर जनरल फॉस्टर फार्न होम गुप्त कागदपत्रे लंडनला पोहोचवण्यासाठी विमानाची मागणी करतो; विमान नसल्याने केरी डान्सर या बोटीतून प्रवासाला निघतो... एवढे प्रारंभीचे सूत्र... पण पुढे त्या बोटीवर जपान्यांकडून होणारे हल्ले, त्या बोटीतून प्रवास करणारे गुलाम, काही परिचारिका व दोन वर्षाचे मूल वगैरे गुंतागुंतीची उपकथानके येत राहतात आणि मूळ कथासूत्रापासून कथानक दूर दूर जाऊ लागते. दोनअडीच वर्षाच्या मुलाचा कथावस्तूच्या विकासासाठी काहीच वापर केला जात नाही. ...व्यक्तिरेखांची उभारणी आरंभी ठसठशीत नसल्याने कथानकात रंग भरत नाही... हे सगळे कशासाठी असा प्रश्न पडत राहतो. अगदी शेवटी त्याचा उलगडा होतो...

सिंगापूरला कॉर्पोरेल फ्रेझर याच्याकडे ब्रिगेडियर जनरल फॉस्टर फार्न होम गुप्त कागदपत्रे लंडनला पोहोचवण्यासाठी विमानाची मागणी करतो; विमान नसल्याने केरी डान्सर या बोटीतून प्रवासाला निघतो... एवढे प्रारंभीचे सूत्र...

बेस्टसेलर लेखकाची ही कादंबरी... ती वाचायची इच्छा होणारच... वाचकांची थोडीफार कसोटी पाहणारच... काही कागदपत्रे वा हिऱ्यांची थैली बोटीतून पळवण्यासाठी इतके सगळे सव्यापसव्य करायला इआन फ्लेमिंगने जेम्स बॉंडला नक्कीच लावले नसते. पहिल्या दोनतीन प्रकरणातच हिरे आणि कागदपत्रे हस्तगत करून एखाद्या नर्सशी प्रणयरंग उधळण्यात जेम्स बॉंड हरवून गेला असता. मॅक्लीन इतक्या झटपट आपली कथावस्तू वाचकांना खुली करून सांगत नाही. घटनांमागून घटना सांगत राहून तो रहस्य गडद करीत जातो.

● ग्रंथजगत सभासदांना : १८७रु. ● टी-बुक क्लब सभासदांना : १२५रु.

पृष्ठे : ३७४ ● किंमत : २५०रु. ● पोस्टेज : २०रु.

मराठी साहित्यक्षेत्रात ही कादंबरी आपल्या वेगळया विषयमांडणीमुळे लक्षवेधी ठरेल असे वाटते

डॉ. आनंद यादव

मोहिनी

पारू मदन नाईक

१६० रु.

'मोहिनी' खानदानी संस्कारांनी संपन्न असलेली स्त्री. पती प्रतापरावांसमवेत पारंपरिक संस्कार, जीवनमूल्ये जपत मनसोक्त आनंद व सुख उपभोगत असते.
मोहिनीला एकापाठोपाठ एक अशा दोन मुली होतात. मग इनामदारांच्या वंशाला वारस कोण...?
मोहिनीच्या मनात हे भय खोलवर रुजते. कारण त्यामुळे तिची प्रतिष्ठा पणाला लागते. तिच्या भावी जीवनाचे अस्तित्व त्यावर अवलंबून राहते.
बऱ्याच कालावधीनंतर तिला मुलगा होतो मात्र तो अल्पायुषी ठरतो.
मोहिनी स्क्रिझोफ्रेनियाने ग्रस्त होते.
मनोरुग्ण नायिकेचे रंगरूप उलगडून दाखवणारी श्रीमती पारू नाईक यांची पहिलीच स्वतंत्र कलाकृती.

मार्गदर्शनपर पुस्तके

घरच्या घरी शिका... नवनवीन फॅशन्स!

सलवार कमीज, स्कर्ट ब्लाऊज, इव्हिनिंग गाऊन्स, मिडी

शिवणकला - एक छंद

हेमा कळके

८०रु.



शिवणकला - एक छंद
स्मॉकिंग

१००रु.

हेमा कळके

क्रोशा -- विणकाम

प्रभावती पुरम

२००रु.

सार्धसुधं...

संमीलन

प्रमोदिनी वडके-कवळे

खूप दिवसांनी सुधाकडे गेले होते. आमच्या गप्पा ऐन रंगात आलेल्या असताना रितू - तिची मुलगी शाळेतून रडत आली. रितूला हुंदके अगदी अनावर झाले होते कारण गॅदरिंगच्या नाचात भाग घ्यायचा असताना त्यांच्या मिसनी तिला जबरदस्तीने समूहगीतात लोटून दिलं होतं.

सुधा म्हणाली, 'अगं या छोट्या संमेलनांना काही महत्त्व नसतं. तू चांगली तयारी कर आणि पुणे फेस्टिव्हलमधे चमकून दाखव म्हणजे तुझ्या त्या मिसची आणि सगळ्या मुलींची चांगली जिरेल.'

सुधाची ही भूमिका मला अजिबात पटली नाही. पण तिला समजावयला गेले तर तिने जोरदार संमेलनविरोधी सूर लावला. अगदी राष्ट्रीय पातळीवर उतरून ती थेट साहित्यसंमेलनापर्यंतच पोचली. संमेलनांच्या नावाखाली खरं म्हणजे गोंधळ आणि गळचेपीच कशी चालते ते ती मलाच पटवून द्यायला लागली.

'ते सगळं खरं ग. पण या मोठ्या संमेलनात आपोआप जमून येणाऱ्या छोट्याछोट्या संमीलनांचं काय?' मी विचारलं

'संमीलन?' तिला हा शब्दच नवा होता.

तिला त्याचा अर्थ समजावून द्यायला पुढे झाले आणि मला आमच्या शाळेचं एका वर्षीचं संस्मरणीय स्नेहसंमेलन आठवलं. त्यावर्षी ऐन जानेवारीत प्रचंड पाऊस पडला. पण उघड्या स्टेजवरच्या 'सातवी अ' च्या मुलांनी पावसातही त्यांचं नाटक तसंच चालू ठेवलं. आमच्या मुख्याध्यापक जानोरकर सरांनी त्या मुलांचा विशेष सत्कार केला होता. आख्ख्या शाळेसमोर त्यांना रणांगणातल्या लढवय्याची उपमा देऊन कौतुकाचं भाषण केलं होतं. केवळ त्या स्नेहसंमेलनातल्या नाटकामुळे दुर्वासमुनी असा लौकिक असणाऱ्या जानोरकर सरांशी सातवी अ मधल्या पाच मुलांचं एक वेगळंच नातं जडून गेलं होतं.

मला तर स्नेहसंमेलनाचं फार आकर्षण होतं. पण नाटक नाच गाणं वगैरे आघाड्यांवर माझी शस्त्र टाकून शरणागती! मात्र संमेलनाच्या उत्सवी उत्साहाची जबरदस्त ओढ. मग त्यासाठी स्वयंसेवक होणं हाच एक मार्ग उरायचा. तीच शाळा, तेच शिक्षक, तीच मुलंमुली पण स्नेहसंमेलनाचं अत्तर शिंपडल्यावर तिथे एक अनाम सुगंध दरवळायचा. स्नेहसंमेलन संपल्यानंतरही कित्येक दिवस तो जाणवत रहायचा.

मी भोजनसमितीत असताना आम्हा चार मुलींवर तीस किलो कोबी चिरण्याची

कामगिरी आली होती. त्या वेळी भाजी व्यवस्थित कशी चिरावी याबद्दल गणिताच्या बाईनी दिलेल्या सूचना आणि प्रात्यक्षिकं मला आजही भाजी चिरताना उपयोगी पडतं. वर्गात कोरड्या स्वरात प्रमेय समजावणाऱ्या बाई त्यावेळी अगदी सैंपाक शिकवणाऱ्या आईसारख्याच वाटल्या होत्या. एकदा मी बॅकस्टेजला होते. रंगमंचावरचं तीन अंकी नाटक सुरळीत चालू झाल्यावर देवरे सरांनी आम्हाला शाळेच्या गच्चीवर आकाशातल्या नक्षत्रांच्या आकृत्या दाखवल्या होत्या. जानेवारीतलं निरभ्र आभाळ, हवेतला सुखद गारवा आणि मनात दाटलेलं काहीतरी वेगळं शिकल्याचं समाधान. . . त्या रत्नजडित क्षणांची चमक अजूनही मनात जशीच्या तशीच आहे. त्या दिवसानंतर कधीही आम्ही देवरे सरांना पी. टी. चे फालतू सर म्हणून हिणवलं नाही.

प्रत्यक्ष नाटकात भूमिका केली नाही तरी, आम्हा स्वयंसेवकांना तिथे लुडबुडायचं लायसन्स असायचं. नाटकाच्या उशिरापर्यंत चालणाऱ्या तालमी, भांडणं, चिडणं- चिडवणं, समजावण्याचं, संघभावनेचं आणि स्पर्धेचं अंगात संचारलेलं बेभान वारं. . . ते क्षण या दुनियेतले नसायचेच जसे काही!

कॉलेजमधल्या स्नेहसंमेलनाला तर वेड्या तरुणाईची भरजरी किनार लाभलेली . त्या संमेलनातली मजा काही वेगळीच. तिथे नाटकातल्या भूमिकेबरोबरच कधीकधी आयुष्यभराचीही जोडी जमून जायची. गाण्याला साथ करताना मनाचेही सूर जुळून यायचे आणि अवघं आयुष्यच गाणं बनून जायचं. मित्रमैत्रिणींमधली जुनी भांडणं मिटवायला तर स्नेहसंमेलनाइतका चांगला दुसरा मुहूर्त नाही. खांद्याला खांदा लावून काम करताना कधी हातमिळवणी झाली हे दोन्ही पक्षांच्या लक्षात यायचं नाही.

गेल्या महिन्यात मला फोनवरून एका संमेलनाचं आमंत्रण मिळालं. मी अर्जुनराव पाटील बोलतोय. यावर्षीच्या आमच्या तरुणाईच्या संमेलनात तुम्ही कथाकथन करावं अशी आमची इच्छा आहे. संमेलनाच्या तारखा आहेत...

कोणत्याही आमंत्रणाच्या तारखा ऐकल्या की, माझ्या मेंदूत रविवार, जोडून सुटी, ऑफिसच्या मीटिंगचा दिवस असे खिळे जुळवत आपोआप कॅलेंडरची छपाई सुरू होते. या संमेलनाच्या तारखा मला सोयीच्या वाटत नव्हत्या.

मी तसं सांगताच पलीकडून ते अर्जुनराव पाटील म्हणाले, पहिल्या दिवशी नाही आलात तरी चालेल. तुमच्या सोयीने या. पण नक्की या. या अर्जुनराव पाटलांचं नावआडनाव आणि आवाजही असा होता की माझ्या डोळ्यासमोर डोईला पटका गुंडाळलेला, भरघोस मिशांचा बागाईतदार शेतकरीच उभा राहिला. नंतर कळवते म्हणून मी फोन ठेवला. माझ्या मनात कुठेतरी या प्रवाहाबाहेरच्या संमेलनांबद्दलच्या पूर्वग्रहाची टोचणी होती. अशा संमेलनातून

दिसणारी अव्यवस्था, सावळा गोंधळ, संयोजकांची साहित्याशी असलेली फारकत, कार्यक्रमातून स्पष्टपणे जाणवणारी एखाद्या राजकीय पक्षाची दाट सावली. . एकूणच या आमंत्रणाबद्दल मला फारसा उत्साह नव्हता.

पण माननीय अर्जुनराव पाटील ऐकेचनात. शेवटी समारोपापर्यंत न थांबण्याच्या अटीवर मी जायचं कबूल केलं. आणि आणखी एका 'संमीलना' चा आगळा अनुभव माझ्या खात्यावर जमा झाला.

स्टेशनवर उतरताच पस्तिशीच्या वयाची एक रुबाबदार व्यक्ती माझ्यासमोर येऊन उभी राहिली. नमस्कार ताई. आवाजात कमालीची आदब आणि नम्रता.

माझ्या डोळयातलं प्रश्नचिन्ह बघून ते हसले. मी अर्जुनराव पाटील.

अं..अं.. मी अवाक्. नावाआडनावाआवाजावरून व्यक्तिमत्त्व रेखाटणारी माझी कल्पनाशक्ती पार जमीनदोस्त झाली. त्यानंतरचा प्रत्येक क्षण माझ्या अंदाजांना चूड लावणारा ठरला. रहाण्याची व्यवस्था अतिशय उत्तम. कुठेही 'पाहुणे आता आपल्याच तर ताब्यात आहेत. झाली जराशी गैरसोय तरी जातील कुठे?' अशी खास संयोजकीय बेफिकिरी नाही.

याच संमेलनात मला साकीकर भेटले. लेखक म्हणून त्यांचं नाव ऐकून असले तरी आजवर माझी त्यांच्याशी थेट ओळख नव्हती आणि तशी करून घेण्याची फारशी उत्सुकताही नव्हती. कारण साकीकर (पुण्यातसुद्धा) अतिशय फटकळ म्हणून प्रसिद्ध. त्यांच्या लिखाणातही अगदी अंगावर येणारा थेटपणा असायचा. मी आपली कौटुंबिक कथा लिहिणारी समाजमर्यादांना वचकून रहाणारी लेखिका. त्यामुळे आजवर आमची ओळख होण्याचा प्रश्नच आला नव्हता. चहा घेताना आमची कुणीतरी ओळख करून दिली. नुकत्याच गाजलेल्या एका सिनेमाच्या कथेवर त्यांची एका प्राध्यापकांशी चर्चा चालू होती. चहा पिता पिता ती तशीच पुढे चालू झाली. त्यात त्यांनी मलाही ओढलं आणि मग ती चर्चा इतकी रंगली की पुन्हा चहा मागवण्याची वेळ आली. त्या क्षणापासून आम्ही अगदी एकाच कॉलेजमधे शिकलो असू असे मित्र झालो. त्या दीड दिवसात साहित्यावर, साहित्येतर विषयांवर जोरदार चर्चा केल्या. हिरीरीने आपापली मतं माडली. तावातावाने दुसऱ्यांची मतं खोडली आणि तो जोश शमल्यावर स्वतःच्या आवेशाला मिळून हसलोसुद्धा.

कान आणि डोळे यात चार बोटांचं अंतर असतं या बिरबलाने शिकावलेल्या धड्याची सत्यता मला नव्याने पटली.

दुपारच्या सत्रासाठी औरंगाबादहून निर्मलाताई आल्या. निर्मलाताईंच्या लेखनाबद्दल मला विलक्षण आदर आणि त्या व्यक्तिमत्त्वाबद्दल मनात

तेवढाच दबदबाही. कारण त्यांच्या लेखनातून त्यांच्या ज्ञानाचं जे प्रतिबिंब दिसायचं ते बघताना वाटायचं, बाई आपल्यासारखं वरवर आणि हलकंफुलकं लेखन करणारीकडे नजर उचलून बघणार सुद्धा नाहीत.

पण पुनः एकदा मला भूकंपाचा जोरदार धक्का. लीनाताईंचा स्वभाव कमालीचा बडबड्या आणि मिश्कीलसुद्धा. आमचं दोघींचं गोत्र छान जुळलं. संध्याकाळच्या पाहुण्यांचं विद्वत्जड भाषण चुकवून आम्ही वर्गातल्या उनाड मुलींसारख्या भटकून आलो. सिद्धेश्वर मंदिराच्या शांत परिसरात तलावातल्या पाण्यात पाय बुडवून मस्तपैकी गप्पा मारल्या. आणि आम्हाला शोधत तिथे आलेल्या कार्यकर्त्यांची गंभीर चेहऱ्याने माफी मागून एकमेकींकडे बघून हळूच डोळे मिचकावले.

रात्री एका खोलीत राहिल्यामुळे तर आमच्या गप्पांना वेळेचाही अडसर उरला नाही. सकाळी लौकर उठायचंय हं. असं एकमेकींना बजावत आम्ही दोन वाजेपर्यंत अखंड तोंडं चालवली.

दुसऱ्या दिवशी भोजनमंडपात साकीकर, निर्मलाताई आणि मी गप्पा मारत असताना साकीकरांच्या ओळखीचे एक गृहस्थ तिथे आले. साहजिकच ते दोघं बोलत राहिले. आमच्या दोघींच्या गप्पांचा ओघ जरा बाजूला सरकून तसाच मागील पानावरून पुढे चालू झाला. गप्पा संपत आल्यावर एक उपचार म्हणून साकीकरांनी आमची त्या गृहस्थांशी ओळख करून दिली. माझा चेहरा प्रश्नांकित झाला. नुकतंच कुठल्यातरी संदर्भात त्यांचं नाव माझ्या कानावरून गेलेलं होतं. पण संदर्भ कुठला ते मात्र नेमकं आठवेना.

पण माझं नाव ऐकताच ते आनंदाने उद्‌गारले. अरे वा! तुमचं लेखन मला फार आवडतं. दोन महिन्यापूर्वी तुमच्या एका लेखासंबंधात मी तुम्हाला पत्र लिहिलं होतं. आठवतंय.

हो हो . . मी प्रचंड खूष. असं भर गर्दीत अवचित आपला एखादा फॅन भेटणं म्हणजे केवढा सन्मान. केवढी थोरवी. . मग काय! गप्पांचं आणखी एक सत्र.

त्यातून लक्षात आलं हे गृहस्थ नुसतेच वाचक नाहीत तर साहित्यासाठी मनापासून धडपडणारे आहेत. आज दुपारच्या सत्रात त्यांचं अभिवाचन होणार आहे.

अर्थातच मी माझी समारोपापर्यंत न थांबण्याची अट बदलून दुपारच्या त्यांच्या कार्यक्रमासाठी थांबले.

एका चांगल्या कार्यक्रमाचा आनंद आणि साहित्यपुण्य पदरात बांधून घेतलं आणि भरल्या मनाने उशिराच्या गाडीत बसले.

संमीलन म्हटल्यावर मला हे सगळं सगळं आठवलं. पण संमेलनाच्या कार्यक्रमपत्रिकेबाहेरची ही संमीलनं सुधाला समजावून मात्र देता येईनात मला.

चौकटीतल्या बंदिस्त कल्पनांच्या मोजमापाने समारंभाचं तथाकथित यशापयश मोजणाऱ्यांना संमीलन म्हणजे काय ते कसं समजावणार?

— — — — — — — — — — —

प्रमोदिनी वडके-कवळे
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

नवीन आवृत्त्या

वपुर्झा
व. पु. काळे
१८०रु.

दोस्त
व. पु. काळे
१२०रु.

विश्वसाहित्यात बेस्टसेलर मधेही बेस्ट ठरलेले
हिलरी क्लिन्टनचे आत्मकथन आता मराठीत...!

लिव्हिंग हिस्ट्री

हिलरी रॉडहॅम-क्लिन्टन
अनु. सुप्रिया वकील



४०० रु.

सलग आठ वर्षे अमेरिकेसारख्या सर्व सामर्थ्यसंपन्न राष्ट्राची प्रथम महिला.
खंबीर पत्नी, प्रेमळ माता, संवेदनशील समाज कार्यकर्ती आणि त्याही पलीकडे जाऊन पतीच्या व स्वत:च्या आयुष्यात आलेल्या वादळी प्रसंगांना कणखरपणे सामोरी जाणारी धीरोदात्त स्त्री.
पाश्चात्य जगतातील राजकारणात प्रभावशाली महिलांपैकी एक असलेल्या हिलरी क्लिन्टनचे अनुभवकथन.

प्रा. डॉ. आनंद यादव यांना सूर्योदय साहित्य गौरव पुरस्कार जाहीर

जळगाव शहरातील सूर्योदय सर्वसमावेशक मंडळाचा प्रतिष्ठेचा सूर्योदय साहित्य गौरव पुरस्कार साठोत्तरी कालखंडातील मराठी ग्रामीण साहित्यिकांच्या पहिल्या पिढीतील नामवंत लेखक प्रा. डॉ. आनंद यादव (पुणे) यांना जाहीर करण्यात आलेला आहे.

साहित्य क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाबद्दल डॉ. आनंद यादव यांना या पुरस्काराने लवकरच गौरविण्यात येणार असल्याचे मंडळाचे अध्यक्ष सतीश जैन यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. या आधी डॉ. यशवंत पाठक, कवी वि. भा. नेमाडे यांना या पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे.

* कवी यशवंत पुरस्कार

जीवनाचा चौफेर आणि सकस शोध घेणे, हाच कोणत्याही कलेचा गाभा असतो. वेगाने बदलणाऱ्या आजच्या जगातही मराठी कविता संवेदनशील माणसांना मोठा आधार देत आहे, असे प्रतिपादन पुणे 'लोकमत'चे संपादक अनंत दीक्षित यांनी केले. 'महाराष्ट्र कवी यशवंत' यांच्या नावाचा पुरस्कार मराठवाड्यातील नामवंत नवोदित कवी श्रीधर नांदेडकर यांना देण्यात आला.

साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष गं. ना. जोगळेकर यांनी प्रास्ताविक केले. परीक्षक अंजली कुलकर्णी व मनोहर सोनवणे यांनी नांदेडकरांच्या, 'सुफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून' या काव्यसंग्रहाचा परिचय करून दिला. परीक्षणाचे निकष व कवितेतील आशय स्पष्ट केला.

दीक्षित पुढे म्हणाले, ''साध्या माणसाच्या भावना साध्या शब्दांमध्ये मांडण्याचा पायंडा कवी यशवंत यांनी पाडला. मराठीमध्ये कवी यशवंत यांच्याप्रमाणे माणसाच्या मनाच्या तळाशी जाणाऱ्या कविता फार थोड्या आहेत. नांदेडकरांच्या कवितेत वर्तमानाची झळझळीत पार्श्वभूमी असल्याने ती चटकन मनाशी संवाद साधू शकते. त्यांची कविता कागदावर उतरण्यापूर्वी भावनांचा, कल्पनांचा रियाज होतो, हे प्रकर्षाने जाणवते. केवळ भाषेचा अभ्यासक, तत्त्वज्ञानाची जाणीव स्वत:ला तपासण्यासाठी अपुरे असतात. वास्तवाकडे डोळसपणे पाहिल्याशिवाय

चांगली कलाकृती बनत नाही.''

नांदेडकर म्हणाले, ''कवी यशवंत यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारामुळे स्वत:विषयी शोधन करण्याची वेगळी दृष्टी मिळाली. सध्या मराठी साहित्यात स्त्री-पुरुष संबंधांबद्दल येणारे लिखाण केवळ रतिभावकेंद्रित असते. त्यामधील भडकपणा टाळून नातेसंबंधांचे वेगवेगळे पैलू लिखाणामध्ये आणावेत.''

नंदा सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. परिषदेचे कार्यवाह दीपक करंदीकर यांनी आभार मानले.

* अशोक जैन यांना साहित्य अकादमी पुरस्कार

ज्येष्ठ पत्रकार अशोक जैन यांच्या 'अंतस्थ' या अनुवादित पुस्तकाला उत्कृष्ट अनुवादासाठी दिला जाणारा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी लिहिलेल्या 'इनासायडर' या आत्मकथनाचे जैन यांनी 'अंतस्थ' या नावाने मराठीत भाषांतर केले आहे. परचुरे प्रकाशनने प्रकाशित केलेले हे पुस्तक मराठी विभागात निवडले गेले. २० हजार रुपये आणि ताम्रपट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

* डॉ. काशिनाथ घाणेकर पुरस्कार

डॉ. काशिनाथ घाणेकर स्मृती विश्वस्त प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या डॉ. काशिनाथ घाणेकर पुरस्कारासाठी ज्येष्ठ अभिनेत्री आशालता यांची निवड झाली आहे. १० हजार रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र अशा स्वरूपाचा हा पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक राजदत्त यांच्या हस्ते २ मार्च रोजी देण्यात आला.

प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा दुसरा डॉ. काशिनाथ घाणेकर पुरस्कार श्रीमती प्रतिभा बारगीर यांना जाहीर झाला असून रुपये ७ हजार, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे त्याचे स्वरूप आहे. ५ हजार व मानपत्र अशा स्वरूपाचा तिसरा पुरस्कार विलास कुडाळकर यांना जाहीर झाला आहे.

* प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानचे पुरस्कार

वैद्यकीय सेवाकार्यातील अग्रगण्य अशा प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून मराठी भाषेतील उत्कृष्ट पुस्तकासाठी पुरस्कार दिले जातात. यंदाच्या पुरस्कारासाठी कविता महाजन, डॉ. मधुकर वाकोडे, मनीषा साधू, मंगला खिंवसरा आणि सदानंद पुंडगे यांची निवड झाली आहे.

'ब्र' कादंबरीच्या लेखिका कविता महाजन यांना पुरस्कार आणि साहित्य व संशोधन क्षेत्रातील अंजनगाव सुर्जी येथील डॉ. मधुकर वाकोडे यांना प्रत्येकी ५१११ रु. रोख, पुरस्कार म्हणून देण्यात येतील.

या दोन मुख्य पुरस्काराशिवाय अन्य तीन साहित्यकृतींना प्रसाद बन ग्रंथ गौरव पुरस्कार देऊन गौरविले जाते. नागपूरच्या कवयित्री मनीषा साधू यांचा

'धुक्याच्या पलिकडे' हा काव्यसंग्रह, औरंगाबादच्या मंगला खिंवसरा यांचे 'स्त्री मुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा सहभाग' आणि हिंगोली येथील सदानंद पुंडगे यांचे 'गँगमन' यांना प्रत्येकी रु. दोन हजार रोख देण्यात येतील.

चंद्रकांत मांढरे कला अकादमीतर्फे देण्यात येणाऱ्या पुरस्कारांसाठी मुंबईतील चित्रकार विजय दशरथ आचरेकर आणि सिनेनाट्य अभिनेते अरुण नलावडे यांची निवड करण्यात आली.

रोख ११ हजार रुपये आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती अकादमीच्या संचालक शशिकला मांढरे यांनी दिली.

* डॉ. चौसाळकर यांच्या ग्रंथास पुरस्कार

ग्रीक व महाभारतातील तत्त्वज्ञानाचा चांगला अभ्यास करून त्याचे तुलनात्मक विश्लेषण 'न्याय आणि धर्म' या ग्रंथात चांगल्या प्रकारे करण्यात आले आहे, असे उद्‌गार न. म. जोशी यांनी काढले.

पुणे नगर वाचन मंदिर यांच्यातर्फे दिला जाणारा श्री. ना. बनहट्टी पुरस्कार शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. अशोक चौसाळकर यांच्या 'न्याय आणि धर्म' या ग्रंथास देण्यात आला.

* खेळता खेळता एकांकिकेला चंद्रसूर्य रंगभूमी पुरस्कार

नाटकातून केवळ नट घडविणे हे उद्दिष्ट ठेवता कामा नये, तर नाटकाच्या माध्यमातून चांगला उमदा माणूस घडवायला हवा, अशी अपेक्षा ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांनी व्यक्त केली.

चंद्र-सूर्य रंगभूमीतर्फे आयोजित आंतरशालेय एकांकिका स्पर्धेचे पारितोषिक वितरण त्यांच्या हस्ते झाले. मॉडर्न हायस्कूल इंग्लिश मीडियम स्कूलने सादर केलेल्या 'खेळता खेळता' या एकांकिकेस सर्वोत्कृष्ट एकांकिकेचे पारितोषिक देण्यात आले. आमदार रमेश बागवे अध्यक्षस्थानी होते.

तेंडुलकर म्हणाले, लहान मुलांसारखी दुसरी कोणतीही गोष्ट प्रेक्षणीय नाही. मुळातच माणसामध्ये नाटक आहे. माणूस हा उपजत नट आहे. माणूस कसा नसतो ते दाखविण्याचा प्रयत्न तो लहानपणापासूनच करतो. नाटकातून नट, दिग्दर्शक निर्माण होतात. नाटकातून राजकीय नेतेही निर्माण होतात. लहान मूल आपल्या आई-बाबांना बघत असते. त्यांचे गुण लहान मुले उचलतात. अशा स्पर्धांमुळे मुलांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत असते. कला म्हणून नाटक करताना केवळ नट बनविणे हे उद्दिष्ट ठेवता कामा नये. चांगला उमदा माणूस घडविण्याचे काम नाटकातून व्हायला हवे.

माणूस आयुष्यात नेहमी नाटक करत असतो. अनेक प्रकारचे गुन्हे घडत असतात. त्यात एक प्रकारचे नाटकच असते. न्यायालयात साक्षीदार साक्ष देतो.

साक्ष देणे म्हणजे एक प्रकारचे नाटकच आहे. अगदी राजकीय नेतेही चांगले नाटक करतात.

ॲड. राजेंद्र सूर्य यांनी प्रास्ताविक केले, तर पूनम देशमुख यांनी आभार मानले.

* सुमित्रा भावे यांना जीवनगौरव पुरस्कार

''चित्रपटातून समाजाला शिकण्यासारखे खूप काही असते. गंभीरपणे माध्यमाकडे पाहिले नाही, तर जीवनाचा विचार करण्याची शक्ती नष्ट होईल,'' असे मत ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शिका सुमित्रा भावे यांनी व्यक्त केले.

'रोटरी क्लब'च्या महिला अध्यक्षांनी महिला दिनानिमित्त सुमित्रा भावे यांना 'जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. सबीना संघवी यांनाही हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे मुक्ता पुणतांबेकर, उज्ज्वला लवाटे, स्मिता जोशी, सुमन काटे, रत्ना गणपती आणि मीरा बडवे या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या सहा महिलांचा या वेळी गौरव करण्यात आला.

'डिजिटल तंत्रज्ञाना'मुळे सध्या चित्रपटनिर्मिती सुलभ झाली असल्याचे सांगून त्या म्हणाल्या, ''चित्रपटाचा व्याप खूप मोठा असला तरी नव्या युगातील तरुणी या व्यवसायाकडे वळतात, ही स्वागतार्ह गोष्ट आहे. चित्रपटात यशस्वी होण्यासाठी कलात्मकता, व्यवहार आणि व्यवस्थापन यांचा समन्वय व्हावा लागतो.

आशा राशिंगकर (रोटरी पुणे, गांधी भवन), अंजली संघवी (पुणे रिव्हरसाईड), अंजली सहस्रबुद्धे (पुणे मेट्रो), अवलोकिता माने (पुणे फार ईस्ट), अदिती राहणे (पुणे हिलसाईड) आणि रेखा पाटील (पुणे युनिव्हर्सिटी) या सहा महिला अध्यक्षांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजिण्यात आला होता.

* अंत्योदय पुरस्कार

''विदर्भातील एका खेड्यात राहणाऱ्या माझ्यासारख्या सामान्य माणसाची आठवण ठेवून सन्मान केल्याचे समाधान मोठे आहे. खरे तर हे समाजाचे आमच्यावरील मोठे ऋण आहे.'' अशी भावना अमरावती जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते सुनील देशपांडे यांनी व्यक्त केली.

'डी. एच. गोखले आणि श्यामला गोखले न्यासा'च्या वतीने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचा 'अंत्योदय पुरस्कार' खासदार बाळासाहेब आपटे यांच्या हस्ते देशपांडे व त्यांच्या पत्नी निरुपमा यांना देण्यात आला. एक लाख रुपये व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

देशपांडे म्हणाले, ''अमरावती जिल्ह्यातील लवादा या आदिवासी खेड्यात आम्ही काम करतो. आदिवासींना रोजगार मिळावा, स्वत:च्या पायावर उभे राहता यावे या भूमिकेतून संपूर्ण बांबू केंद्राची सुरुवात केली. या माध्यमातसून बांबूपासून विविध वस्तू बनवून त्याला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे काम आम्ही